द्धीझालियापूर्ण ॥ मगरावणींनाटोपे ५९ तोचारवेळायेऊन ॥ रणींगेलाजयघेऊन ॥ आतांहोमविध्वंसुन ॥ आधींसत्वरटाका
वा ६० विलंबकरितांयेथ ॥ तिकडेंनिघेलअग्निरथ ॥ रथनिघाल्याइंद्रजित ॥ काळत्रयींनाटोपे ६१ द्वादशवर्षैंनिराहारी ॥ अ
सेलजोब्रह्मचारी ॥ तयाचेहातेंशक्रारी ॥ मरेलअसेंभाष्यआहे ६२ ऐसेंऐकतांरघुनंदन ॥ सौमित्राकडेपाहेविलोकुन ॥ धनु
ष्याचढऊनगुण ॥ वेगेंलक्ष्मणउठिला ६३ बंधूचींबाल्यदशादेखोनी ॥ स्नेहभरितहोयचापपाणी ॥ अनुजासहृदयींधरूनी॥

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

मंत्रकर्णीसांगतसे ६४ कोण्यामंत्रेंकोणतेंअस्त्र ॥ समयींप्रेरावेंकोणतेंशस्त्र ॥ तेंसर्वराजीवनेत्र ॥ सौमित्रासीदेताजाहाला ६५
मस्तकींठेविलाकृपाहस्त ॥ ह्मणेसत्वरवधोनिइंद्रजित ॥ विजयश्रीघेऊनअद्भुत ॥ कल्याणरूपयेइंजे ६६ सवेंमारुतीबिभी
षण ॥ बुद्धिमंतकळाप्रवीण ॥ रामेंधरूनीलक्ष्मण ॥ तयाचेहातींदीधला ६७ नळनीळजांबुवंतअंगद ॥ गवयगवाक्षवृषभमैंद ॥
पनसकेसरीद्विविद ॥ वीरअगाधनिघाले ६८ आणिअसंख्यवानरगण ॥ पुढेंमार्गदावीबिभीषण ॥ निकुंबळागडपरमकाठि
ण ॥ मगबिभीषणबोलत ६९ अंगदस्कंधींलक्ष्मण ॥ जैसागजेंद्रावरीसहस्त्रनयन ॥ पुढेंकडेलागलेकठिण ॥ लंकेहूनिअगाध
७० ह्मणेअवघेघ्याउड्डाण ॥ निकुंबळावोलांडून ॥ शक्रजितकरीहवन ॥ आधींविध्वंसोनिटाकावें ७१ मगनिराळपंथेंतेचाल
ले ॥ निकुंबळेंतप्रवेशले ॥ तोंसैन्यदुर्गसबळें ॥ सातभोंवतेरक्षिती ७२ ऋषभगवयहनुमंत ॥ घेऊनियांविशाळपर्वत ॥ जेंथेह
वनकरीइंद्रजित ॥ त्याविवरांतप्रवेशले ७३ तोंसभोंवतींभुतेंरक्षिती ॥ तयांसपळवीमारुती ॥ तंवइंद्रजितपापमूर्ती ॥ वज्रास
नींबैसला ७४ रक्तोदकेंस्नानकरूनी ॥ रक्तवस्त्रनेसलारावणी ॥ सप्तद्रीतेंपसरूनी ॥ त्यावरीआसनघातलें ७५ पिंगटजटा
मोकळ्यादिसती ॥ रक्तेंथपथपांगळती ॥ नेत्रालाऊनिआहुती ॥ टाकीतसेंअवदानें ७६ ब्राह्मणाचींशरीरेंबहुत ॥ त्यांचाजव
ळींकेलापर्वत ॥ अस्थीमाळागळांडोलत ॥ मृतउरगशिरींवेष्टिले ७७ द्विजदंताच्यालाह्याकरुनी ॥ साजुकमासघालीहवनीं ॥
रथनिघालाअग्नींतुनी ॥ तरणीहुनीतेजाळ ७८ प्राप्तहोतांदिव्यनिधान ॥ अभाग्यवरीपडेविघ्न ॥ तैसेंहनुमंतेंपर्वतटाकून ॥ हो
मकुंडाविध्वंसिलें ७९ अग्नीचहूंकडेविखुरत ॥ कोपलेंआराध्यदैवत ॥ अग्नीनेंगिळिलारथ ॥ परमअनर्थझालाअसे ८० इंद्रजि

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

ताच्यापृष्ठीवरी ॥ वृषभदेहधर्मातेंकरी ॥ यज्ञपात्रेंफोडीझडकरी ॥ होमद्रव्येंउलंडी ८१ गजरकानींपडतांबहुत ॥ सावधजा
लाशक्रजित ॥ देखोनियांतेंविपरीत ॥ परमदुःखीतेवेळे ८२ ह्मणेदैवतक्षोभलेंसबळ कैसींवैरियांनींसाधलीवेळ माझेंआयुष्य
सिंधूजळ ॥ आजपासूनिआटलें ८३ वानरतेथेंगेलेसमस्त ॥ परमकोपलाइंद्रजित ॥ वेगेंआणूनिदिव्यरथ ॥ वरीआरूढेतेका
ळीं ८४ अद्भुतघेऊनियांदळा ॥ निकुंबळेंबाहेरआला ॥ तोंकपीभारेंसींउभाठाकला ॥ सौमित्रदेखिलातेवेळे ८५ भगणामाजी
रोहिणीवर ॥ कींकर्णचक्रींदिवाकर ॥ तैसावानरांतसौमित्र ॥ सिध्दउभायुद्धासी ८६ जैसामेरूकुळाचळांत ॥ तैसारथीइंद्रजि
त ॥ तोंराक्षसलोटलेसमस्त ॥ वांनरांवरीतेकाळीं ८७ शिळाद्रुमपर्वतघेउनी ॥ कपीधांवलेतेक्षणीं ॥ राक्षसदळाहोयआटणी ॥
प्रेतेंरणींपाडिती ८८ शूलअसिलताशक्ती ॥ हींआयुधेंघेऊनिहातीं ॥ वानरांअसुरखोंचिती ॥ कपीपळतीविकळपैं ८९ तों
नळनीळजांबुवंत ॥ प्रतापरुद्रअंजनीसुत ॥ यांचामारअतिअद्भुत ॥ आटलेबहुतनिशाचर ९० अरीप्रतापदेखोनिअत्यद्भुत ॥
परमक्रोधावलाइंद्रजित ॥ विषादावाढलाअसेबहुत ॥ दांतखातकरकरां ९१ लाथेनेंताडितांउरग ॥ कींशुंडापिळितांमातं
ग ॥ नासिकींताडितांसवेग ॥ माहाव्याघ्रजेविखवळे ९२ कींतपस्वीअपमानिला ॥ हुताशनघृतेंशिंपिला ॥ तैसाइंद्रजितक्षोभ
ला ॥ वेगेंलोटिलारथपूढें ९३ दृष्टींदेखतांवारण ॥ खवळेजैसापंचानन ॥ तैसाक्षोभलालक्ष्मण ॥ जोभोगेंद्रअवतार ९४ वि
द्युत्प्रायचापचढवून ॥ वरीयोजिलादिव्यबाण सिंहनादेंगर्जोन ॥ रामानुजसरसावला ९५ मांडिलेंतेव्हांवज्रठाण ॥ कौतुक
पाहातीसुरगण ॥ सौमित्रासहोऊकल्याण ॥ हेंचदेवचिंतिती ९६ इंद्रजितह्मणेसौमित्रासी ॥ मजसींयुद्धकरूंपाहसी ॥ जैसा

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

हरिणशार्दुलासी ॥ झोंबीध्यावयापातला ९७ सुपर्णावरीधांवेअळिका ॥ कींमातंगावरीगोवत्सदेखा कींबळेंधांवेपिपीलिका
कनकाचळउचलावया ९८ ऊर्णनाभीइच्छीमनीं ॥ स्वतंतूनेंझांकीनमेदिनी ॥ वृश्चिकपुच्छउभारुनीं ॥ ताडीनह्मणेखदिरां
गारा ९९ सूर्यजिंकीनह्मणेखद्योत ॥ मक्षिकाभूगोलहालवूंपाहात ॥ वडवानळधगधगित ॥ पतंगधांवेग्रासावया १००
मजसींतैसायुद्धासी ॥ मानववंशींतूआलासी ॥ माझेबाणकेंवींसाहसी ॥ समरंगणींनकळेतें १ यावरीबोलेलक्ष्मण ॥ तु
झेदृष्टीदिसतोलाहान ॥ भस्मेंआच्छादिलाअग्न ॥ क्षणेंकाननजाळीत २ दृष्टीसनभरेकेसरी ॥ परीक्षणेंगजाविदारी ॥ व
ज्रधाकुटेंपरिकरी ॥ चूर्णसकळनगांचें ३ खुजटादिसेवामन ॥ परीढेंगेंतआटीत्रिभुवन ॥ घटोद्भवाचीतनूसान ॥ परीसागरप्रा
शिला ४ चिमणाचंदिसेचंडांश ॥ परीसकळसृष्टीकरीप्रकाश ॥ तेवींनरवीररायवेश ॥ त्याचादासमीअसें ५ तुजआजसिमरं
गणीं ॥ खंडविखंडकरीनबाणीं ॥ इंद्रादिदेवपाहतांगगनीं ॥ मनोरथत्यांचापुरवीन ६ ऐकतांक्षोभलाशक्रारी ॥ दिव्यबाणते
अवसरीं ॥ सोडीरामानुजावरी ॥ प्रळयचपळेसारिखा ७ जैसेंविवेकेंकरून ॥ ज्ञानीक्रोधटाकीखंडून ॥ तैसातोडिलातोबाण
निजशरेंसौमित्रें ८ परमक्षोभलाइंद्रजित ॥ पर्जन्यबाणाचापाडित ॥ एकेबाणेंचसुमित्रासुत ॥ पीठकरूनटाकितसे ९ उगव
तांवासरमणी ॥ भगणेंलोपतीजेवींगगनीं ॥ कींजलदजाळतत्क्षणीं ॥ प्रभंजनविध्वंसी ११० बोधप्रकटतांअंतरीं ॥ सर्वपात
केंसंहारी ॥ कींआत्मज्ञानीजिवीहरी ॥ संसारदुःखेंअनेक ११ तैसेशत्रूचेशरपाहीं ॥ जनकाचाकनिष्ठजांवाई समस्तछेदूनिल
वलाही पाडीतसेंएकीकडे १२ सौमित्रसोडीएकशर ॥ त्यापासूनबाणनिघतीअपार जैसाएकुलताएकपुत्र संततीवाढेबहु

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

 त्याची १३ कींतैलबिंदूजळींपडतां ॥ पसरेचहूंकडेतत्वता कींसत्पात्रींदानदेतां कीर्तींप्रगटेसर्वत्र १४ कुलवंतावरीउपकार
 करितां ॥ यशप्रगटेनसांगतां ॥ तैसाएकबाणसोडितां ॥ अनेकहोऊनपसरती १५ लक्षांचेलक्षबाण ॥ सोडीसुमित्रानंदन ॥
इंद्रजितातितुकेछेदून ॥ एकीकडेपाडित १६ इंद्रजिततुकावीमान ॥ ह्मणेधन्यवीरलक्ष्मण ॥ रणधीरनचळेठाण ॥ योद्धानिपु
णहोयहा १७ असोइंद्रजीतजपोनीमंत्र ॥ सोडीतेव्हांपर्जन्यास्त्र ॥ हस्तशुंडेऐसीधार ॥ मेघअपारवर्षत १८ ऐसेंदेखोनिल
क्ष्मण ॥ वातास्त्रजपोनीउडवीपर्जन्य ॥ जैसेंवैराग्यप्रगटतांपूर्ण ॥ संसारदुःखवितुळेपैं १९ वातसुटलाअद्भुत ॥ इंद्रजिताचेंक
टकउडत ॥ रावणीजपेपर्वतास्त्र ॥ आडघातलावायूसी १२० जैसेंमायाजाळअद्भुत ॥ तैसेआडदिसतीपर्वत ॥ मगसौमित्रेंप्रे
रूनिवज्रास्त्र ॥ नगसमस्तफोडिले २१ करितांसारासारश्रवण ॥ कामक्रोधजातीपळोन ॥ तैसेसौमित्रेंपर्वतफोडून ॥ पिष्टव
तूचूर्णकेलेपैं २२ मगतोसुलोचनावर ॥ सोडीवडवानळास्त्र ॥ त्यावरीदाशरथीवीर सागरास्त्रसोडीतसे २३ अगस्तीमंत्रज
पेरावणी ॥ सागरशोषिलामुळींहूनी ॥ निःशेषजळआटोनी ॥ क्षणमात्रेंटाकिले २४ पापास्त्रसोडीइंद्रजित ॥ नाममंत्रजपेसु
मित्रासुत ॥ माहेश्वरीरावणीप्रेरित ॥ सौमित्रजपेब्रह्मास्त्र २५ ब्रह्मास्त्रश्रेष्ठसर्वांत ॥ तेणेंमाहेश्वरीग्रासिलीसमस्त ॥ जांबुवंत
आणीहनुमंत ॥ तटस्थकौतुकपाहाती २६ परमक्रोधावलारावणी ॥ पांचबाणकाढीनिवडूनी ॥ किंवापांचसौदामिनी ॥ मेघा
बाहेरनिघाल्या २७ तेअनिवारपांचबाण ॥ सोडिलेआकर्णवोढून ॥ तेअकस्मातयेऊन ॥ सौमित्रहृदयींसंचारले २८ मेरू
मांदारहोतीचूर्ण ॥ तैसेकठोरपांचबाण भोगेंद्रावतारलक्ष्मण ॥ तेणेंचतेसाहिले २९ सवेंचितोलक्ष्मण ॥ सोडिताझालानवबा

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

ण ॥ इंद्रजिताचेंकपाळफोडून ॥ आंतसंपूर्णरूतले १३० इंद्रजितयोद्धादारुण ॥ बाल्यदशालक्ष्मण ॥ स्नेहदाटोनीबिभीषण
गदाझेलीतपुढेंआला ३१ गदाफिरऊनतेवेळीं ॥ इंद्रजितावरीटाकिली ॥ येरेंशरसोडोनिपाडीली ॥ एकीकडेआडवीते ३२
मेघनादेंसोडूनीपंचबाण ॥ हृदयींखिळिलाबिभीषण ॥ जांबुवंतेंतेंदेखोन ॥ पुढेंधांवेकाळजैसा ३६ पर्वतींवज्रपडेंअकस्मात
तैसाधांवेजांबुवंत ॥ हस्तचपेटेंत्याचारथ ॥ अश्वासहितचूर्णकेला ३४ विरथहोऊनइंद्रजित ॥ भूमीसउभायुद्धकरित ॥ तोंहनु
मंतेंविशाळपर्वत ॥ रावणीवरटाकिला ३५ नळनीळवृषभअंगद ॥ शरभगवयगवाक्षकुमुद ॥ केसरीपावकलोचनमैंद ॥ एक
दांचउठावले ३६ शिळापर्वततेअवसरीं ॥ टाकितिबळेंचिशक्रारिवरी ॥ देवपाहातीअंबरीं ॥ कौतुकपरमयुद्धाचें ३७ इंद्रजित
चतुरबहुत ॥ पराक्रमीरणपंडित ॥ तितुक्यांचेंफोडीपर्वत ॥ बाणजाळघालूनियां ३८ तंवइंद्रजितउडाला मेघाआडजाऊनि
लपाला ॥ तेथोनियांवर्षोंलागला ॥ बाणजाळफारकपीवरी ३९ सौमित्राचेंउड्डाणगोजिर ॥ मगकायकरीवायुकुमर ॥ तळहा
तींसुमित्राकुमर ॥ उभाकरूनीउडाला १४० द्वादशगांवेंइंद्रजित ॥ शतयोजनेंउंचहनुमंत ॥ संग्रामकेलाअद्भुत ॥ उतरेइंद्र
जितपृथ्वीवरी ४१ खालींउतरलालक्ष्मण ॥ तोंसमस्तदेवऋषिगण ॥ सौमित्रासीचिंतितीकल्याण ॥ विजयीपूर्णहोआजी ॥
४२ पाठिसीवानरांचेभार ॥ आवेशेंगर्जतीवारंवार ॥ मांडलेंपरमघनचक्र ॥ अनिवारवीरदोघेही ४३ सिंहनादेंकरून ॥ दो
घेहीगाजवितीगगन ॥ महाआवेशेंसंपूर्ण ॥ ब्रंह्मांडग्रासूंधांवती ४४ दोघांआंगींरुपलेशर ॥ जैसींपिच्छेंपसरीमयूर ॥ कींपर्व
तावरीतृणांकुर ॥ तैसेवीरदिसतीदोघे ४५ याउपरीसौमित्रवीर ॥ तूणीरांतूनकाढीतदिव्यशर ॥ जैसातृतीयनेत्रींच वैश्वान

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

र ॥ अकस्मातप्रगटला ४६ जैसामाध्यान्हींचागभस्ती ॥ तैसींबाणमुखींदीप्ती ॥ तयाचेकिरणनिश्चिती नलक्षवेकोणातें ४७
रामनाममुद्रांकित ॥ दैदीप्यमानसमर्थ ॥ सुमित्रासुताचेमनोरथ ॥ पूर्णकर्तानिर्धारें ४८ तोबाणधनुष्यावरी ॥ सौमित्रेंयोजि
लाझडकरी ॥ आकर्णवोढोनिसत्वरी ॥ कायचिंतिताजाहला ४९ ह्मणेपूर्णब्रह्मसनातन ॥ मायातीतशुद्धचैतन्य ॥ तोसूर्यवं
शरिघुनंदन ॥ जरींहेंसाचअसेल १५० मींस्त्रीअसोनिब्रह्मचारी ॥ चतुर्दशवर्षेंनिराहारी ॥ कायावाचामनेंअंतरीं ॥ रामउपा
सकजरीअसे ५१ मंगळभगिनीजगन्माता ॥ सत्यअसेलपतिव्रता ॥ रामदास्यत्वहनुमंता ॥ जरींघडलेंअसेल ५२ शिवकं
ठींचेंहाळाहळ ॥ नामेंशमलेंअसेलसकळ ॥ तरीयाबाणेंशिरकमळ ॥ इंद्रजिताचेंखंडेल ५३ ऐसेंचिंतोनिनिजमनीं ॥ बाणसोडि
लातत्क्षणीं ॥ शक्रारीचाकंठलक्षोनी ॥ गगनमार्गेंजातसे ५४ यावरीविंशतिनेत्रपुत्र ॥ बाणदेखोनिपरमतीव्र ॥ धनुष्यावरी
घालीशर ॥ आकर्णवोढूनिसोडिला ५५ तंवइतक्यांतअकस्मात ॥ बाणपावलाकृतांतवत ॥ तेणेंकंठआणिभुजात्वरित ॥ छे
दोनिनेलेगगनातें ५६ वक्रसुरीनेंत्वरित ॥ कृषीवलकणसेंछेदित ॥ तैसेंशिरभुजेसहित ॥ बाणेनेलेंतेकाळीं ५७ भुजउसळूनअ
द्भुत ॥ लंकेवरजाऊनपडत ॥ शिरभूमंडळींउतरत ॥ कंदुकवततेकाळीं ५८ तोंवृषभेंधांवोनिसत्वर ॥ वरिचावरीझेलिलेंशिर
झालाएकचिजयजयकार ॥ सुमनेंसुरवरवर्षती ५९ इंद्रसंतोषलाबहुत ॥ ह्मणेआजिभाग्यउदित ॥ दशापावलोंयथार्थ ॥ सु
मित्रासुतप्रसादें १६० शक्राचाहर्षतेकाळीं ॥ नमायेचनभमंडळीं ॥ दुंदुभीचीघाईलागली ॥ ऋषिमंडळीआनंदत ६१ पुष्पवृ ५
ष्टीवारंवार ॥ सौमित्रावरीकरीदेवेंद्र ॥ इंद्राचाआनंदलामुखचंद्र ॥ निष्कलंकभयरहित ६२ इंद्रजितपडिलामेदिनी ॥ दीनव

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

दनपळेवाहिनी ॥ प्राणजातांतिचक्षणीं ॥ अवयवजैसेनिस्तेज ६३ दीपगेलियाप्रभाहारपे ॥ शशीमावळतांचांदिणेंलोपे ॥ कींगा
यनराहतांसंपे ॥ स्वराकारसर्वही ६४ कींवृक्षउन्मळतांक्षिती ॥ अंडजस्थानसोडूनिपळती ॥ शक्रारीपडतांतेरीती ॥ सेनास
मुदायफुटलाअसे ६५ जयपावोनसंपूर्ण ॥ परतलावीरलक्ष्मण ॥ वारंवारबिभीषण ॥ स्तुतीकरीसौमित्राची ६६ मगहनुमं
ताचेस्कंधावरी ॥ सौमित्रबैसलातेअवसरीं ॥ तनुजर्जरशरप्रहारीं ॥ झालीअसेतेधवां ६७ सुवेळागिरीलक्षून ॥ चालिलेतेव्हां
वानरगण ॥ समस्तांसांगेबिभीषण ॥ आल्यापंथेंचलावें ६८ इंद्रजिताचेंविशाळशिर ॥ झेलींतनेतवृषभवानर ॥ दृष्टी
नेंपाहीलरघुवीर ॥ म्हणोनिसंगेंघेतलें ६९ असोइकडेश्रीराम ॥ स्कंदतातमनविश्राम ॥ सौमित्राकारणेंपरम ॥ चिंताक्रांतजाहा
ला ७० सुग्रीवाप्रतीरघुनंदन ॥ म्हणेनिकुंबळेंसीलक्ष्मण ॥ तेथेंकैसेंवर्तमान ॥ झालेंअसेकळेना ७१ इंद्रजिताचेंयुद्धकठीण ॥
आह्मांसमवेतपैंजाण ॥ शरजाळींसेनासंपूर्ण ॥ खिळोनियांपाडिली ७२ योद्धाइंद्रजितविशेष ॥ बाळदशासौमित्रास ॥ असें
बोलेअयोध्याधीश ॥ अश्रुनयनींआणिले ७३ सुग्रीवह्मणेरघुपती ॥ खेदनकरावाचित्तीं ॥ शत्रूसवधोनीत्वरितगती ॥ आतां
येईलसौमित्र ७४ ऐसींचिंताकरितांअकस्मात ॥ वानरआलेपुढेंधांवत ॥ सांगतीआलासौमित्र ॥ इंद्रजितवधोनियां ७५ प
रमआनंदलारघुवीर ॥ सामोराधांवेसूर्यकुमर ॥ तोंसमीपदेखिलासौमित्र ॥ बाळसूर्यजयापरी ७६ हनुमंताचेस्कंधावरून ॥
खालींउतरलालक्ष्मण ॥ सुग्रीवआणीबिभीषण ॥ हस्तधरूनचालत ७७ हळूहळूचालेलक्ष्मण ॥ शरआंगींरुतलेतीक्ष्ण ॥
दृष्टीदेखोनिरघुनंदन ॥ केलेंनमनसाष्टांगीं ७८ मगउठोनिराजीवनेत्र ॥ प्रीतीनेंहृदयींधरीसौमित्र ॥ वृत्रवधितांसहस्रनेत्र ॥

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

गुरूजैसाआलिंगी ७९ श्रीरामह्मणेसौमित्रातें ॥ तुवांवधोनिइंद्रजितातें ॥ ब्रह्मांडभरिलेंपुरुषार्थें ॥ पराक्रमकरूनियां १८० कोणासनाटोपेरावणी ॥ तोत्वांवधिलासमरंगणी ॥ देवांसहितवज्रपाणी ॥ आनंदमयझालातेवेळीं ८१ ऐसेंबोलोनीरघुनाथ ॥ सौमित्रमस्तकींठेवीहस्त ॥ तेणेंश्रमहापरलासमस्त ॥ आनंदभरितलक्ष्मण ८२ बिभीषणजांबुवंत ॥ समस्तांसिभेटेरघुनाथ ॥ शब्दवचनेंगौरवित ॥ धन्यपुरुषार्थतुमचापैं ८३ पुढेंठेऊनिशत्रूचेंशिर ॥ वृषभेंकेलानमस्कार ॥ मगह्मणेसीतामनोहर ॥ धन्यधन्यवृषभातूं ८४ आरक्तपुष्पेंपूजाकरून ॥ हेंशीरठेवावेंजतन ॥ मागोंयेईलतियेलागुन ॥ द्यावेंलागेलशिरहें ८५ सुषेणासीह्मणेरघुवीर ॥ तूंवैद्यआणिप्रतापशूर ॥ करींसौमित्रासीउपचार ॥ देहजर्जरबाणेंजाहाला ८६ मगसुषेणानेंऔषधीआणून ॥ दिव्यदेहधारीकेलालक्ष्मण ॥ असोयावरीबिभीषण ॥ वर्तमानसर्वसांगे ८७ केलाझालासंग्राम ॥ कोणीकायकेलापराक्रम ॥ तेंऐकोनिमेघश्याम ॥ आश्चर्यपरमकरीतसे ८८ ह्मणेधन्यइंद्रजितवीर ॥ पुरुषार्थासीनाहींपार ॥ दीनकरूनिदेवसमग्र ॥ बंदीजेणेंघातले ८९ याउपरीसुलोचना ॥ शिरमागेलराजीवनयना ॥ तेसुरसकथाऐकतांश्रवणा ॥ सौख्यहोईलसमस्तां १९० रामविजयग्रंथप्रचंड ॥ त्यांतरसभरितयुद्धकांड ॥ श्रवणेंपुरेसर्वकोड ॥ नाहींचाडआणिकांची ९१ ब्रह्मानंदाश्रीरामा ॥ जगद्वंद्यापूर्णब्रह्मा ॥ श्रीधरवरदाअनामा ॥ पूर्णकामासर्वेशा ९२ स्वस्तिश्रीरामविजयग्रंथसुंदर ॥ संमतवाल्मिकीनाटकाधार ॥ सदांपरिसोतभक्तचतुर ॥ नवविंशतिमोध्यायगोडहा १९३ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

छ छ छ छ छ

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

॥ अथ त्रिंशोध्याय प्रारंभः ॥

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri



CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

श्रीगणेशायनमः ॥ ॥ श्रीसीतारामचंद्राभ्यांनमः ॥ जोपद्मिणीवल्लभकुळभूषण ॥ पद्मजातजनकपद्मलोचन ॥ विषकंठ
हृदयदशकंठदळण ॥ सच्चिदानंदतनूजो ॥ १ ॥ जोरविकुळकमळदिवाकर ॥ जोदशमुखकुळविपिनवैश्वानर ॥ जोभक्त
हृदयाब्जमिलिंदभ्रमर ॥ लीलावतारधरीजो २ जोषड्गुणैश्वर्यसंपन्न ॥ यशश्रीकीर्तिविज्ञान ॥ जोऔदार्यवैराग्यपूर्ण॥
सत्यज्ञानशाश्वतजो ३ जोनिर्विकल्पअनंत ॥ हेतवदृष्टांतविवर्जित ॥ तोसुवेळाचळींरघुनाथ ॥ राक्षसवधार्थपातला ४ भ
वगजविदारकमृगनायक ॥ मोक्षफळाचापरिपाक ॥ तोरामताटिकांतक ॥ सुरपाळजगद्गुरू ५ गतकथाध्यायानिरूपण॥
गुणसिंधूचाबंधुलक्ष्मण ॥ इंद्रजिताचावधकरून ॥ शिरघेऊनपैंआला ६ शरीराचेंप्राक्तनविचित्र ॥ ऋषभानेंसुवेळेसनेलें
शिर ॥ धडधरणीभुजसत्वर ॥ लंकेवरीपडियेलो ७ भुजआपटोनिमागुतीउडत ॥ जैसाकंदुकआदळत ॥ तैसाभुजदंडअ
कस्मात ॥ निकुंबळेपडियेला ८ सुलोचनेचेआंगणीं ॥ भुजदंडपडिलातेक्षणीं ॥ तोंरावणस्नुषाअंतरसदनीं ॥ सुखरूपबै
सलीअसे ९ तेदशशतवदनाचीकुमरी ॥ कींलावण्यसागरींचीलहरी ॥ ज्येष्ठस्नुषानिर्धारीं ॥ राघवारिचीतीहोय १० जेनगा
रिशत्रूचीराणी ॥ निशाचरांचीस्वामिणी ॥ जीचेंस्वरूपलावण्यदेखोनी ॥ सुरांगनालज्जित ११ देवगणगंधर्वराजकुमरी॥
सेवाकरितीअहोरात्री ॥ सहस्रनेत्राचीअंतुरी ॥ नपवेसरीइयेची १२ आंगींचासुवासअद्भुत ॥ धांवेएककोशपर्यंत ॥ वि
षकंठरिपुचीकांतायथार्थ ॥ तुळतांनपुरेइयेसी १३ नैषधजायापरमसुंदर ॥ वर्णितीकाव्यकर्तेचतुर ॥ परीशेषकन्येसीसाचा
र ॥ उपमाद्यावयापुरेना १४ आंगींचाप्रभेनेंभूषणें ॥ झळकतीअत्यंतदिव्यरत्नें ॥ कींनरकन्यागायनें ॥ मधुरस्वरेंजवळकरी

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

ती १५ एक शृंगारसांवरिती ॥ एकचामरेंवारिती ॥ एकउपभोगआणोनिदेती ॥ संतोषवितीनानाशब्दें १६ सुलोचनेंगृहीं आनंदू ॥ तोंअमृतीपडेविषबिंदू ॥ तैसातोभुजसुबुद्धु ॥ अंगणींयेऊनपडियेला १७ ठणत्कारहोतांतेक्षणीं ॥ दूतीआल्या धांवोनी ॥ येऊनिपाहातीतिंवआंगणीं ॥ भुजअद्भुतदेखिला १८ तेकाचबंदआंगणांत ॥ वीरपाणीपडिलाअद्भुत ॥ देखो निदासीभयाभीत ॥ आल्यासत्वरसांगावया १९ ह्मणतीनवलवर्तलेंहोसाजणी ॥ महावीराचातुटोनिपाणी ॥ येऊनपडि लासेआंगणीं ॥ निराळमार्गेंअकस्मात २० ऐकोनिदासीचेंवचन ॥ दचकलेंसुलोचनेचेंमन ॥ रत्नपादुकात्वरेंकरून ॥ अं घ्रियुगुलींलेइली २१ तडित्प्रायझळकेअंबर अंगणांतआलीसत्वर ॥ उतरलाअसेमुखचंद्र ॥ विव्हळनेत्रजाहले २२ आंग झालेंसेविकळ ॥ पुढेंनघालवेचिपाउल ॥ वदनींचेंकाढोनितांबूल ॥ एकीकडेभिरकाविलें २३ सखियांसीह्मणेसुलोचना ॥ प्राणपतीआजगेलेरणा ॥ सीतेलागींअयोध्याराणा ॥ सुवेळाचळींबेसला २४ ऐसेंबोलतांशेषनंदिनी ॥ भुजेसमीपयेतांक्ष णीं ॥ तंवतोशक्रजिताचापाणी ॥ पतिव्रतेनेंओळखिला २५ पंचांगुळींमुद्रिकामंडित ॥ वरीकंकणेंविराजत ॥ दंडकीर्तींमु खझळकत ॥ चपळेहूनिविशेष २६ ह्मणेआजिजाहाजबुडालें ॥ ह्मणोनीवदनहातींपिटिलें ॥ परमआकांततेवेळे ॥ वा टेबुडालेंब्रह्मांड २७ सुमनकळिकेवरीसौदामिनी ॥ पडतांउरनिउरेतेक्षणीं ॥ तैसीनिस्तेजहोउनी ॥ भोगेंद्रनंदिनीपडिये ली २८ लोभयाचेंगेलेंधन ॥ कींजळचरेंजीवनाविण ॥ तैसीपतीवियोगेंकरून ॥ सुलोचनातळमळी २९ ह्मणेविपरीतका ळाचीगती ॥ मृगजळींबुडालाअगस्ती दीपतेजेंरोहिणीपती ॥ आहाळोनपडियेला ३० तमकूपींबुडालातरणी ॥ पाडसोंसिं १

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

हधरिलावनीं ॥ पिपीलिकेमुखेंधरूनीं ॥ मेरूकैसारगडिला ३१ अळिकेनेंगिळिलासुपर्ण ॥ मशकींग्रासिलामहाअन्न ॥ भू
तांनींकाळधरून ॥ समरंगणींमारिला ३२ मगसुलोचनेसउचलोनी ॥ बैसवितीसांवरूनी ॥ पतीचाभुजत्हृदयींधरूनीं ॥
आक्रंदेसुलोचना ३३ भुजेप्रतिबोलेवचन ॥ कैसेंप्राणपतीसआलेंमरण ॥ तरितेंसर्ववर्तमान ॥ लिहूनमजविदितकरीं ३४
पतीचरणींमाझेंमन ॥ जरीअसेलरात्रंदिन ॥ तरीचपत्रींलिहून ॥ वर्तमानश्रुतकरीं ३५ मसीपात्रपुढेंठेविलें ॥ भूर्जपत्रस
रसावलें लेखनीहातींदितांशीघ्रकाळें भुजेनेंलिहिलेंतेसमयीं ३६ नवलअद्भुतवर्तलें सर्ववर्तमानपत्रींलिहिलें सुलोचनेनेंपत्र
घेतलें मस्तकींवंदिलेंतेवेळे ३७ नयनींलोटलेअश्रुपात शेषकन्यापत्रवाचित भोंवत्याललनासमस्त ऐकतीनिवांततेकाळीं
३८ ऐकेंदशशतमुखकन्यके सकुमारेचंपककलिके ममानसरोवरमराळिके प्राणवल्लभेसुलोचने ३९ जयआशाअंतरीं
धरून ॥ गूढस्थळींकरितांहवन ॥ अग्नीतूननिघालादिव्यस्यंदन ॥ अर्धबाहेरनिघाला ४० फळप्राप्तीचासमयलक्षुन ॥ श
त्रुआलेतेथेंधांवून ॥ चंडशिळावरीघालोन ॥ आराध्यदैवतक्षोभविलें ४१ पर्वतचढलासंपूर्ण ॥ शिखराहूनदिधलाढकलून ॥
कींनदीअवघीउतरून ॥ तीरासमीपबुडाला ४२ प्रगटतांवैराग्यज्ञान ॥ वरीविषयघालापडेयेऊन ॥ प्राप्तहोतांनिधान ॥
विवसियेऊनीवरीपडे ४३ कष्टेंकेलेंवेदाध्ययन ॥ वरीधाडघालीअभिमान ॥ सूर्यसर्वअंबरक्रमून ॥ सांपडलाराहुमुखीं ॥
४४ वल्लभेतैसेंयेथेंजाहालें ॥ शत्रूनींशेवटींवैरसाधिलें ॥ प्रारब्धबळउणें पडलें ॥ होणारनटळेकल्पांतीं ४५ पुढेंदारुणसं
ग्राममांडला ॥ परीजयआह्मासपारखाझाला ॥ जाऊनिसौमित्रासीमिळाला ॥ शत्रूचावाढलापराक्रम ४६ सौमित्रपरम

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

निधडावीर धनुर्विद्यात्याचीअपार देखोनिउचितादिधलेंशिर राममित्रजोडला ४७ देहआशाधरून ॥ भयेंगेलाबिभीषण
स्यादेहत्रयनिरसून ॥ विदेहजामातमित्रकेला ४८ मगमीकृपणताटाकून ॥ निजशरीराचेंकेलेंदान तेणेंरामचरणीनिऊन ॥
शिरमाझेंसमर्पिलें ४९ सौमित्रतपस्वीपूर्णविप्र ॥ बहुतदिवसनिराहार ॥ उतरूनियांसिंधुसमग्र ॥ मागोंशिरपातला ५०
शरीरउभेंआहेरणी ॥ शिरपाहूंगेलेंचापपाणी ॥ तुजमूळधाडिलापाणी ॥ विवेकेंकरूनयेईंकां ५१ मायानदीउल्लंघूनिदुर्घ
ट ॥ पाहेंपैलतीरींतुझीवाट ॥ प्राणवल्लभेयेऊनिभेट ॥ सत्वरआतांमजलागीं ५२ दुःखरूपपरमसंसार रामचरणींसुखअ
पार ॥ हेंजाणोनिधाडिलाकर ॥ येईंसत्वरप्राणप्रिये ५३ असोतेधराधरकुमरी ॥ पत्रवाचूनतेअवसरीं ॥ शरीरटाकूनिध
रित्रीवरी ॥ शोककरीअपार ५४ आजिबळाचासमुद्रआटला ॥ कींधैर्याचामेरूखचला ॥ प्रतापवृक्षउन्मळला ॥ समरभू
मीसीअकस्मात ५५ इंद्रजितसूर्याच्याकिरणें ॥ मावळतीशत्रूचींतारांगणें ॥ तोआजिसौमित्रराहूनें ॥ खग्रासकेलासमूळीं
५६ रणसरोवरींशत्रुकमळें ॥ तूंवारणेंछेदिलींनिजबळें ॥ सौमित्रसिंहेस्वबळें ॥ विदारूननेलेंशिरमुक्त ५७ऐरावतीसहपा
कशासन ॥ समरींपाडिलाउलथोन ॥ तयाआजीमानवलक्ष्मण ॥ येऊनमारीसमरभूमी ५८ माझेंसौभाग्यभांडार॥ वरी
सौमित्रपडिलातस्कर ॥ माझेंभाग्याचासमुद्र ॥ सौमित्रअगस्तीनेंप्राशिला ५९ इंद्रजितमाझारोहिणीवर ॥ सौमित्रप्रता
पराहुथोर ॥ कळासहितलोपलाचंद्र ॥ नदिसेपुनःमागुती ६० वृत्रारिशत्रूचीअंतुरी ॥ ऐसानानाविलापकरी ॥ पशुपक्षी
तेअवसरीं ॥ रडतीकरुणाऐकोनि ६१ सख्याह्मणतीसुलोचने ॥ आतांव्यर्थकांशोककरणें आपुलेंपरत्रसाधनदेखणें ॥ सं

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

सारमायात्यजोनी ६२ जेंदिसेंतेंनाशिवंत ॥ मिथ्याअहिकुंडलवत ॥ पदींनेपुरेंबांधोनीनाचत ॥ मीनभूमीसींमिथ्यापैं ६३
उदिमासगेलावंध्यासुत ॥ मृगजळींमच्छधरित ॥ गंधर्वनगरवाटत ॥ मिथ्यासमस्ततैसेंहें ६४ असोनगारिशत्रुगृहीणी ॥
प्रवेशोनीआत्मसदनीं ॥ नानासंपत्तीदेखोनी ॥ मनविटेतत्काळ ६५ परापवादेंविटतीसज्जन ॥ कींचिळसीयेदेखोनिवम
न ॥ कींसुंदरललनादेखोन ॥ विटेजैसाविरक्त ६६ तैसीनानावस्तूदेखतां ॥ विटलीशक्रारीचीकांता ॥ शुकपक्ष्यादिसमस्तां
मुक्तकेलें स्वहस्तें ६७ सदनासीनमनकरूनी ॥ सिबिकेंभ्रतारहस्तघालोनी ॥ चपळअश्विनीवरींबैसोनी ॥ लंकेसतेंव्हांचा
लिली ६८ तोंपुढेंदूतयेऊन ॥ सांगतीसर्ववर्तमान ॥ मगलघुकपाटेंउघडून ॥ सुलोचनाप्रवेशली ३९ अस्तागेलावासर
मणी ॥ प्रवर्तलीघोररजनी ॥ रजनीचरतेक्षणीं ॥ नगरदुर्गींचेंगजबाजिलें ७० सभेसबैसलालंकानाथ ॥ तोंस्नुषादेखेअक
स्मात ॥ गजबजिलामयजानाथ ॥ चिन्हविपरीतदेखोनी ७१ सुलोचनासद्गदहोउनी ॥ मस्तकठेवीश्वशुरचरणीं ॥ रावण
ह्मणेवोसाजणी ॥ मायेकिमर्थआलीस ७२ तोंभुजेसहितपत्र ॥ श्वशुरापुढेंठेविलेंसत्वर ॥ ह्मणेस्वर्गागेलेभ्रतार ॥ त्यांसमा
गमेजाईनमी ७३ ऐसेंऐकतांचिरावण ॥ घेतवक्षस्थळबडवून ॥ खालतापडेसिंहासनावरून ॥ महाद्रुमउन्मळेजेवी ७४
मृत्तिकाघेउनिलंकानाथ ॥ दाहाहिमुखींतेंव्हांघालित ॥ वर्तलायेकचिआकांत नाहींअंतमहाशब्दा ७५ गजरएकोनितयेवे
ळीं ॥ मयकन्यातेथेंपावली ॥ वार्तापुत्राचीऐकिली ॥ मूर्च्छितपडलीधरणीये ७६ ऐशींसहस्त्रराजअंगना ॥ आल्यामहा
मंडपस्थाना ॥ शोककरीमयकन्या ॥ सर्वहितयेससांवरिती ७७ मंदोदरीह्मणेस्नेहाळा ॥ मेघनादामाझियाबाळा ॥ मज

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

नपुसतांरणमंडळा ॥ सखयाकैसागेलासी ७८ त्रिभुवनशोधितांसमग्र ॥ नदेखोंतुजऐसाधनुर्धर ॥ बंदीघातलेंसमस्तसुरव
र ॥ शत्रूसमग्रत्रासिले ७९ पूर्वींतीव्रतपेंआचरलीं ॥ पूर्णनहोतांमध्येंसोडिलीं ॥ ह्मणूनिऐसीहानीझाली ॥ आडठांकलें
पूर्वकर्म ८० कींम्याकेलापंक्तीभेद ॥ संतांसबोलिलेंदोषशब्द ॥ कींअपर्णावरआणिमुकुंद ॥ वेगळेदोघेभाविले ८१ हरि
कीर्तनरंगमोडिला ॥ क्षुधार्थीपात्रींचाउठविला ॥ कींपरद्रव्याचाअभिलाषकेला किंवाघडलागुरुद्रोह ८२ परलाभाचिकेली
हानी ॥ कींदूषणदिल्हेंगंगेलागुनी ॥ कींकुरंगिणीपाडसावनीं ॥ विघडपूर्वींम्यांकेला ८३ भिक्षानघालितांसाचार ॥ दारीं
चादवडिलायतीश्वर ॥ ह्मणोनिइंद्रजिताऐसापुत्र ॥ गेलानिश्चितत्यादोषें ८४ असोदशशतमुखकुमरी ॥ दशकंठजायाहृद
यींधरी ॥ शोककेलातेणेंधरित्री ॥ कंपितझालीतेधवां ८५ मगशेषकन्याह्मणेतयालागुन ॥ मजद्यावेंजीशिरआणून ॥ पती
चीवाटपाह तांनयन ॥ शिणलेजाईनसांगाती ८६ ऐसेंबोलतांसुलोचना ॥ क्रोधआलादशवदना ॥ घावघातलानिशाणा
ह्मणेसेनासिद्धकरा ८७ आजसंग्रामकरूननिर्वाण ॥ रामसौमित्राचींशिरेंआणीन ॥ अथवापुत्रपंथलक्षून ॥ मीजाईनआ
तांची ८८ दशमुखकोपलादेखोनी ॥ मयजासांगेसुनेच्याकर्णीं ॥ ह्मणेतूंचतेथेंजाऊनी ॥ शिरमागोनघेईंकां ८९ मंगळजन
नीकुमरीवर ॥ तयापासींतूंमागेंशिर ॥ तोभक्तवत्सलपरमउदार ॥ दयासिंधूदीनबंधू ९० जोयाचराचराचेंजीवन ॥ जन
कजावेगळीकरून ॥ सकळस्त्रियामातेसमान ॥ एकबाणीएकवचनी ९१ दुःखामाजीसुखथोर ॥ दृष्टीपाहेंवैदेहीवर ॥ इतु
केनसार्थकसंसार ॥ इहपरत्रसर्वही ९२ पुण्यपरायणश्रीरामभक्त ॥ सुग्रीवजांबुवंतहनुमंत ॥ न्यायसिंधूबिभीषणतेथ ॥

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

पाठिराखेसर्वस्वें ९३ ऐसेंबोलतांमयकन्या ॥ आलेंसुलोचनेच्यामना ॥ मगश्वशुरासीमागेआज्ञा ॥ सुवेळाचळाजावया ९४
दशद्वयनेत्रबोले ॥ तुजजरीत्यांहीठेऊनघेतलें ॥ कैसेंकरावेंतयेवेळे ॥ सांगवहिलेंआह्मातें ९५ उरगबैसलाधुसधुसित ॥
तयामुखींकेवीघालवेहात ॥ यावरीशेषकन्याबोलत ॥ दशकंठासीतेंऐका ९६ परसतीचाअभिलाषसमूळ ॥ करीऐसाकोण
चांडाळ ॥ त्याचावंशभस्महोईल ॥ विपरीतकर्मआचरतां ९७ परस्त्रीचाअभिलाषधरून ॥ कोणपावलाजयकल्याण ॥ रा
वणबोलेअधोवदन ॥ तरीअवश्यजाइजे ९८ तुजसींविपरीतकरितांजाण ॥ शत्रुअवघेभस्मकरीन ॥ शेषतनयानिकेंह्मणू
न ॥ तत्काळतेनिघाली ९९ बृहस्पतीऐसेविचक्षण ॥ घेतलेशिष्टबंदीजन ॥ सहस्त्रार्धदासीघेऊन ॥ अश्विनीवरीआरूढली
१०० संसारमायाटाकुन ॥ संतस्वरूपींहोतीलीन ॥ तैसीलंकाउपेक्षून ॥ चालिलीशरणश्रीरामचंद्रा १ परमवेगेंतेवेळीं ॥
आलीरामसभेजवळी ॥ कृपाब्धीसमिळोंआली ॥ पुण्यगंगासुलोचना २ कींसंतांचेगृहाप्रती ॥ विश्रांतीसयेईशांती ॥ तै
सीशेषकन्याझालीयेती ॥ सीतापतीलक्षूनियां ३ कनकाद्रीभोंवतेतरुवर ॥ तैसेराघवावेष्टितवानर ॥ कोटिकंदर्पलावण्यसुंद
र ॥ अवनिजावरदेखिला ४ भोंवतेकपीयंत्राकार ॥ उभेअसतीजोडूनिकर ॥ मध्येंरघुनाथपीठपवित्र ॥ घवघवीतविराज
मान ५ अश्विनीखालीउतरूनिजाणा ॥ मनींआठवींकैलासराणा ॥ हंसगतीसुलोचना ॥ शेषकन्याचालत ६ एकधांवो
निवानरयेती ॥ हर्षेंश्रीरामासीसांगती ॥ रावणेंपाठविलीसीतासती ॥ भयाभीतहोऊनियां ७ मगबोलेचापपाणी ॥ राव
णपडिलानाहींजोंरणीं ॥ तोंवरीजनकनंदिनी ॥ दृष्टीनपडेतुमच्यापैं ८ शेषकुमरीजवळदेखोन ॥ बिभीषणाकडेपाहेरघुनं

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

दन ॥ तेणेंआसुवेंभरलेनयन ॥ सद्गदकंठजाहला ९ ह्मणेजगद्वंद्याराजीवनेत्रा ॥ हीशक्रजितललनासत्पात्रा ॥ इचेंनामघेतां
विषकंठमित्रा ॥ सर्वदोषहरतील ११० कर्मगतीपरमगहन ॥ जीचेअंगुष्ठींसूर्यकिरण ॥ शेषकन्यासकुमारपूर्ण ॥ आलधिां
वूनशिरालागीं ११ तोंसुलोचनाजवळयेऊन ॥ विलोकूनश्रीरामध्यान ॥ जयजयकारेंलोटांगण ॥ राघवचरणींघातलें १२
रामचरणकमळावरी ॥ शेषकन्याझालीभ्रमरी ॥ ज्याचेचरणरजेंनिर्धारी ॥ पद्मजाततनयाउद्धरली १३ दरिद्रीयाससांपडे
धन ॥ कींजन्मांधासीआलेनयन ॥ कींमेघवळलादेखोन ॥ मयूरजैसाआनंदे १४ किंप्रवाहींबुडोनजातसे ॥ त्यासप्राण
सखालाधिकांसे ॥ कींयोगीपावेवृत्तिदशे ॥ निजमनजिंकोनी १५ तैसादेखोनिश्रीरामचंद्र ॥ उल्हासेसुलोचनाचकोर ॥ कीं
रघुनाथहोयदिनकर ॥ कमळिणीतेसुलोचना १६ संसारतापेंतापोनी ॥ दृढजडलीश्रीरामचरणीं ॥ तेथोनिउठावयामनीं ॥
आळसयेतसुलोचने १७ आतांहेसुखसांडोनी ॥ पुढतीकायपाहूंनयनीं ॥ सुलोचनारामपदावरूनी ॥ भाळसहसानुचली
च १८ जैसाअमृताचाबिंदू ॥ तेवींद्रवलाकृपासिंधु ॥ जोजगदीशदीनबंधू ॥ लाविलावेधूत्रिनेत्रा १९ ह्मणेमातेउठीझडक
री ॥ परमश्रमलीससंसारीं ॥ आतांसुखरूपराहेपरत्रीं ॥ अक्षयसुखभोगीतूं १२० ऐसेंऐकोनीझडकरी ॥ उभीठाकलीशे
षकुमरी ॥ पाणिद्वयजोडूनितेअवसरीं ॥ स्तवनकरीसद्भावें २१ ह्मणेजयजयरामाविषकंठमित्रा ॥ रघोत्तमाराजीवनेत्रा ॥
जलदवर्णाचारुगात्रा ॥ मित्रकुळमुकुटमणी २२ जगद्वंद्याजगन्नायका ॥ जनकजापतीजगरक्षका ॥ जन्ममरणभयमोच
का ॥ जनकजामाताजगद्गुरू २३ भार्गवजिताजलजनयना ॥ जगव्यापकादुःखहरणा ॥ जगदीश्वराजलजलोचना ॥ ज

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

न्मजरारहितंतूं २४ पुराणपुरुषारघुनंदना ॥ भक्तवत्सलाजगन्मोहना ॥ मायाचक्रचाळकानिरंजना ॥ निष्कलंकानिर्गु
णातूं १२५ अयोध्यापुरविहारा ॥ वेदवंद्यावेदसारा ॥ परमउदारारघुवीरा ॥ अहिल्योद्धारामखपाळका २६ जयजयरा
माविश्वपाळणा ॥ विश्वव्यापकाविश्वकारणा ॥ विश्वचाळकाजगर्ज्जीवना ॥ विश्वरक्षणाविश्वेशा २७ विबुधलल्लाटपटलेख
ना ॥ सनकसनंदनमनरंजना ॥ हेरघुवीरदानवदळणा ॥ भवभंजनाभवहृदया २८ मंगळरूपामंगळकारका ॥ जयमंगळ
जननीउद्धारका ॥ मंगळभगिनीप्राणनायका ॥ मंगळरहितामंगळधामा २९ कमलोद्भवजनकाकमलनयना ॥ कमळनाय
काकमळशयना ॥ कमळनाभाकमळवदना ॥ कमळसदनाकमळाप्रिया १३० नमोभववारणविदारकपंचानना ॥ नमोपा
पारण्यकुठारतीक्ष्णा ॥ हेश्रीरामत्रिविधतापशमना ॥ अनंतशयनाअनंता ३१ तुजस्तवितांचापपाणी ॥ शिणलीसहस्त्रव
दनाचीवाणी ॥ नेतिनेतिह्मणोनी ॥ चारीवेदतटस्थ ३२ तेथेंएकजिव्हेचेंस्तवन ॥ मांडेलमाझेंकोठून ॥ जैसेंभागीरथीस
संमार्जन ॥ थिल्लरोदकेंमांडिलें ३३ पितळेचेंपुष्पनेऊन ॥ केलेंकनकाद्रीचेंपूजन ॥ कींजलार्णवासीअर्घ्यदान ॥ कूपोद
केंपैंकेलें ३४ अर्कासवाहिलींअर्कीसुमनें ॥ मलयानिळासीअचेलपवन ॥ किंवाक्षीराब्धीपुढेंनेऊन ॥ तक्रजैसेंसमर्पिलें
३५ केवीहोयधरेचेंवजन ॥ स्तंभकैंचाठेवावयागगन ॥ सागरींचेंजीवन ॥ टिटवीसकेवींमोजवे १३६ सकळप्रकाशकरो
हिणीवर ॥ त्यासदशीवाहिलीअणुमात्र ॥ कींधत्तूरपुष्पींउमावर ॥ दरिद्रीयानेपूजिला १३७ तुझेदेखतांचीचरण ॥ मा
झादेहझालापावन ॥ होऊनठेलेंमनउन्मन ॥ जन्ममरणचुकलेंअसे ३८ घागरीआणिरांझणी ॥ एकचीबिंबलावासरम

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

णी ॥ तैसास्त्रीपुरुषअभिधानीं ॥ चापपाणीव्यापकतूं ३९ तरीयास्त्रीदेहाकृती ॥ शक्रजिताचीअंगनाह्मणती ॥ पतिशिर
सवेंरघुपती ॥ अग्नीमाजीघालिजे १४० हेअयोध्याधीशउदारा ॥ अनाथयाचकमीमागेंशिरा ॥ मीचातकतूंजलधरा ॥
कृपानिधीवर्षेंकां ४१ जेव्हांउदयपावेगभस्ती ॥ तेव्हांचक्रवाकांहोयतृप्ती ॥ तैसींचआतांकरींरघुपती ॥ मित्रकुळप्रकाश
का ४२ क्षीरआणिनीर ॥ वेगळेंकाढितीमराळ ॥ तैसाश्रीरामतमाळनीळ ॥ भवपुरींहूनिमजकाढीं ४३ पतीचेंऐकिलेंवर्त
मान ॥ तेव्हांचगेलेमाझेपंचप्राण ॥ परिशिराचेंनिमित्तकरून ॥ तुझेचरणपाहूंआल्यें ४४ तूंचित्तपरीक्षकरघुनाथ ॥ जा
णसीसर्वांचेमनोरथ ॥ ऐसेंसुलोचनाह्मणत ॥ जगन्नायकतटस्थझाला ४५ ह्मणेधन्यधन्यसहस्त्रवदन ॥ ऐसेंहृदयींजन्म
लेंरत्न ॥ भोगेंद्राचेंतपपूर्ण ॥ कन्यारत्नप्रकटलें ४६ सुलोचनेचेंचातुर्यदेखोन ॥ सर्वकपीतुकावितीमान ॥ श्रीरामासीह्म
णेमित्रनंदन ॥ ईतेंशिरदेऊनिबोळवा ४७ जांबुवंतह्मणेहेपुण्यसरिता ॥ अंगदह्मणेधन्यपतिव्रता ॥ मारुतीह्मणेइचेंनाम
घेतां पापनुरेसहसाही ४८ सायोज्यमुक्तीसमवेत ॥ इसीशिरद्यावेंत्वरित ॥ असोंयावरीजनकजामात ॥ पुसेदशकंठस्नुषे
तें ४९ आह्मीयेथेंआणिलेंशिर ॥ तुजकळलाकेंवींसमाचार ॥ येरीह्मणेपतिकरेंसाचार ॥ पत्रलिहूनदीधलें १५० भुंजपत्र
दाखविलेंत्वरित ॥ आश्चर्यकरीकौसल्यासुत ॥ तोंवानरह्मणतीसमस्त ॥ आह्मासीसत्यनवाटे ५१ निर्जीवहस्तेंलिहिलें
पत्र ॥ तरीचआह्मीमानूंसाचार ॥ जरीहेंहांसवीलशिर ॥ प्राणपतीचेंयेकाळीं ५२ रामह्मणेइचामहिमाथोर ॥ कायएक
नकरीनिर्धार ॥ ऋषभाहस्तेंआणविलेंशिर ॥ अर्कपुत्रेंतेकाळीं ५३ महाविशाळभयंकर ॥ जिव्हालोळेंमुखाबाहेर ॥ ह्मां

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

किलाअसेसव्यनेत्र ॥ भाळींशेंदुरचर्चिला ५४ बाबरझोंटीधरून ॥ ऋषअंठेविलेंआणोन ॥ तेंसुलोचनेनेधरून ॥ हृदयी
तेंव्हांआलिंगिले ५५ स्फुंदस्फुंदोनिसतीरडत ॥ त्रिभुवनींबळियाइंद्रजित ॥ त्याचेंशिरपडिलेंयेथ ॥ कर्मविचित्रपूर्वीचें ५६
खालींपसरीउत्तरीवस्त्र ॥ त्यावरीबैसविलेंतेंव्हांशिर ॥ सतीनेंकरूनिनमस्कार ॥ विनवीकरजोडूनियां ५७ अयोध्यानाथ
श्रीरामचंद्र ॥ पाहातोस्वर्गीचेसुरवर ॥ तरीतुह्मीहास्यकरावेंसत्वर ॥ जेणेंश्रीरामधन्यह्मणे ५८ मजसींविनोदनानारीती
करीतसाप्राणपती ॥ तरीआजिक्रोधचित्तीं ॥ कायह्मणोनीधरियेला ५९ आजिअपराधसमस्त ॥ समर्थेंघालावेपोटांत ॥ मा
झापतिव्रताधर्मबहुत ॥ रघुपतीसींदाविजे १६० होमविध्वंसिलाह्मणोन ॥ तेणेंक्रोधेंधरिलेंमौन ॥ समरींजयनदेखोन ॥ ह्म
णोनिखेदमनींवाटला ६१ कींरामदर्शनाशिरआणिलें ॥ सायोज्यपदप्राप्तझालें ॥ ह्मणोनिबोलणेंखुंटलें ॥ जन्ममरणतुटलें
पैं ६२ इत्यादिभावतेअवसरीं ॥ बोलिलीफणिपाळकुमरी ॥ किंचित्‌विनोदहीकरी ॥ सुलोचनाहंसवावया ६३ शूर्पनखातु
मचीआत ॥ जनस्थानीगौरविलीबहुत ॥ कर्णनासिकसुमित्रासुत ॥ घेऊनिगेलाआरंभीं ६४ भगिनीचेंदेखोनिभूषण ॥
आनंदलापितृव्यकुंभकर्ण ॥ तेणेंनासिकआणिकर्ण ॥ सुग्रीवासीसमर्पिले ६५ ऐसाविनोदकरितां परीशिरनहासेसर्वथा ॥
मगसहस्रवदनदुहिता खेदपरमकरीतसे ६६ ह्मणेपूर्वीचुकल्येयथार्थ जरींपितासाह्यआणित्येंयेथ तरीतुमचेशत्रुसमस्त ॥
पराभविताक्षणार्धें ६७ ऐसेंऐकतांचमात ॥ गदगदांतेंव्हांशिरहांसत ॥ सव्यनेत्रउघडोनीपाहत ॥ जेवींविकासेकमळ
णी ६८ श्रीरामासपुसतीवानर ॥ कायगोष्टीसहांसलेंशिर ॥ याउपरीराजीवनेत्र ॥ कायबोलताजाहला ६९ ह्मणेइचा

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

पितासहस्त्रवदन ॥ तोचिअवतरलालक्ष्मण ॥ त्याश्वशुरेंमजमारिलेंपूर्ण ॥ शिरहांसलेंगदगदां १७० अज्ञानरूपवामन
यन ॥ मीत्यासनादिसेंसगुण ॥ ज्ञानमयसव्यनयन ॥ उघडोनिमजविलोकी ७१ वानरडोलवितीमान ॥ सुलोचनादेवीध
न्य ॥ हीसतियांमाजीनिधान ॥ शिरअचेतनहांसविलें ७२ तंवतोवरिलक्ष्मण ॥ व्यापिलामायामोहेंकरून ॥ सुलोचने
कडेपाहोन ॥ अश्रुनयनींभरियेले ७३ रघूत्तमाप्रतीबोलत ॥ अन्यायकेलाम्यांयथार्थ ॥ प्रत्यक्षमारूनजामात ॥ कन्यासु
लोचनाश्रमविली ७४ ऐसाशोकार्णवींलक्ष्मण ॥ पडतांदेखोनिरघुनंदन ॥ ह्मणेबारेक्षत्रियधर्मदारुण ॥ देवेंपूर्वीचनिर्मि
ला १७५ बंधूअथवापितापुत्र ॥ समरींआलियासमोर ॥ त्यासिवधितांअणुमात्र ॥ दोषनसेसहसाही ७६ सौमित्रह्मणे
श्रीरामा ॥ विश्वफलांकितद्रुमा ॥ अजअजितपूर्णब्रह्मा ॥ तुह्मीबोलिलांतेंसत्य ७७ मायाचक्रमोहदुर्गम ॥ प्रियवियोगें
वाटेश्रम ॥ सीतिलागींतुह्मीपरम ॥ वृक्षपाषाणआलिंगिले ७८ ऐसीऐकतांचिमात ॥ कृपेनेंद्रवलारघुनाथ ॥ ह्मणेमीउठ
वीनइंद्रजित ॥ करीनऐक्यउभयतांसी ७९ इंद्रकरींआणूनअमृत ॥ अतांचिउठवूंशेषजामात ॥ ऐकतांमहावीरतेथ ॥ ग
जबजिलेतेकाळीं १८० खूणदावीसूर्यनंदन ॥ हेंमनींनधरावेंआपण ॥ विमानींदेवसंपूर्ण ॥ भयाभीतजाहाले ८१ अंगद
दावीकरपल्लवीं ॥ बिभीषणमानहालवी ॥ जांबुवंतनेत्रसंकेतदावी ॥ नकाहेंकरूंअघटित ८२ निर्भिडउत्तरदेवायुतनय ॥
बोलिलाजेंसर्वांसीप्रिय ॥ ह्मणेंतुमचेंठेवाऔदार्य ॥ एकीकडेनेउनी ८३ अजाह्मणोनीपाळिजेवृक ॥ मित्रह्मणोनयेदंदशू
क ॥ विषतरूचेंकायसार्थक ॥ दुग्धघालोनिवाढवितां ८४ इंद्रजिताचेबळेंदेव ॥ रावणेंघातलेबंदीसर्व ॥ याचीकापटयवा ६

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

सव ॥ तोहीनेणेसर्वथा ८५ सौमित्रबोलिलावचन ॥ जेणेंहोयसर्वांचेंसमाधान ॥ तैसेंकरावेंआपण ॥ रघुनंदनअवश्यह्म
णे ८६ सुलोचनेसीह्मणेमित्रपुत्र ॥ पतीचेंशिरनेईंसत्वर ॥ निराशादेखोनिउत्तर ॥ सतीसुलोचनाबोलतसे ८७ दृष्टींदे
खिलारघुनाथ ॥ इतुकेनसर्वकृतकृत्य ॥ ह्मणोनिचरणींठेवित ॥ मस्तकआपुलेंसुलोचना ८८ सव्यघालोनिरघुवीर ॥ मागु
ताघालीनमस्कार ॥ उभीराहेजोडूनिकर ॥ कायबोलेतेधवां ८९ आदिपुरुषावैकुंठनायका ॥ मच्छरूपावेदोद्धारका ॥
कमठरूपासृष्टिपाळका ॥ आदिवराहकूर्मरूपातूं १९० तोतूंस्तंभोद्भवनरहरी ॥ वामनरूपमधुकैटभारी ॥ तीनिसप्तकवेळ
धरित्री ॥ केलीनिःक्षत्रीतुवांची ९१ तोतूंचिआतांरघुनाथ ॥ कौसल्यात्मजजनकजामात ॥ मातापिताबंधूवित्त ॥ तूंचिमा
झेंजगद्वंद्या ९२ मदनशत्रुहृदयआरामा ॥ परत्रींचासोयराश्रीरामा ॥ दीनबंधूसर्वोत्तमा ॥ पूर्णब्रह्माजगद्गुरू ९३ लंकेक
डेआजितत्वता ॥ कपिनिपाठवावेसर्वथा ॥ मजअग्निप्रवेशकरितां ॥ विक्षेपकोणींनकरावा १९४ अवश्यह्मणेजगदोद्धार ॥
तिचेमस्तकींठेऊनिकर ॥ सुलोचनावारंवार ॥ करीनमस्काररराघवा १९५ नेत्रद्वारेंन्याहाळून ॥ हृदयींरेखिलारघुनंदन ॥
जयजयरामह्मणोन ॥ शिरघेऊनचालिली ९६ मगरणासियेऊनीसत्वर ॥ घेतलेंपतीचेंशरीर ॥ समुद्रतीरींभयंकर ॥ वि
स्तीर्णकुंडराचियेलें ९७ मंदोदरीसहितलंकानाथ ॥ सहपरिवारेंपातलातेथ ॥ विमानींदेवसमस्त ॥ पाहातीकौतुकसतीं
चें ९८ सुलोचनेनेंकरूनिस्नान ॥ सौभाग्यकारकदेतवाण ॥ कुंडींपतीचीतनूघालून ॥ महाअग्निचेतविला ९९ प्रदक्षिणा
करूनयेरी ॥ धर्मशिळेवरीशेषकुमरी ॥ उभीठाकूनितेअवसरीं ॥ अंबरींन्याहाळूनिपाहे २०० धडकतदुंदुभीचीध्वनी ॥

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

सुरांचीदाटीझालीविमानीं ॥ सकळसुरांगनागगनीं ॥ अक्षयवाणेंघेऊनिउभ्या १ तोंदिव्यशरीरहोउनीं ॥ इंद्रजितदेखे
विमानीं ॥ ऐसेंदेखतांचिनयनीं ॥ प्राणझालाकासाविस २ शरीरटाकूनीत्वरितगती ॥ आंतूननिघालीआत्मज्योती ॥ दि
व्यदेहपावोनीनिश्चिती ॥ पतीसंगेंपावली ३ मगाशिरकमळउचलोन ॥ अग्निमुखींघातलेंनेऊन ॥ तेव्हांमंदोदरीआणिरा
वण ॥ शोककरितीअत्यंत ४ सिंधुसंगमींकरूनिस्नान ॥ सहपरिवारेंपरतलारावण ॥ सकळस्त्रियाकरितीरुदन ॥ लंकेमा
जीप्रवेशला ५ घरोघरींलोकवानित ॥ म्हणतीयशस्वीश्रीरघुनाथ ॥ एकपत्नीव्रतसत्य ॥ केलेंसार्थकसुलोचनेचें ६ अग्नि
पुराणींसत्यवतीसुत ॥ बोलिलाकथाहेसमस्त ॥ तेंचिबोलिलोंयेथ ॥ नाहींविपरीतसर्वथा ७ कथारसिकबहुपाहीं ॥ म्ह
णूनियोजिलीश्रीरामविजयीं ॥ श्रोतेधरोतसदांहृदयीं ॥ ब्रह्मानंदेंकरूनियां ॥ पुढेंकथागोडगहन ॥ अहिरावणमहिरा
वणआख्यान ॥ पाताळासीरामलक्ष्मण ॥ चोरूनियांनेतील ९ तेथेंधावण्याधांवेलहनुमंत ॥ तेकथापरिसाप्रेमळभक्त ॥
परमानंदअद्भुत ॥ होईलश्रवणकेलिया २१० श्रीधरवरदाब्रम्हानंदा ॥ पुराणपुरुषाअनादिसिद्धा ॥ निर्गुणाजगदंकुरकं
दा ॥ जगद्वंद्याअभंगा ११ स्वस्तिश्रीरामविजयग्रंथसुंदर ॥ संमतवाल्मिकीनाटकाधार ॥ सदांपरिसोतभक्तचतुर ॥ त्रिं
शतिमोध्यायगोडहा ॥ २१२ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ शुभंभवतु ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

॥ अथ एकत्रिंशतितमोऽध्याय प्रारंभः ॥

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri



अध्याय ३१ वा.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

श्रीगणेशायनमः ॥ श्रीसीतारामचंद्राभ्यांनमः ॥ जोरणरंगधीररघुवीर ॥ रविकुळमंडणराजीवनेत्र ॥ रजनीचरांतक
रमणीयगात्र ॥ राजेश्वररमापती १ आत्मारामअयोध्यानाथ ॥ आनंदरूपअव्यक्त ॥ अपरपारअमलअनित्य ॥ आद्यअ
नंतअनादीजो २ कर्ममोचककैवल्यदानीं ॥ करुणासमुद्रकार्मुकपाणी ॥ बंधछेककल्मषजाळूनी ॥ करीकल्याणभक्तांचें ३
परमानंदापुराणपुरुषा ॥ पद्मजातजनकापयोनिधिवासा ॥ पंकजनेत्रापरमहंसा ॥ शिवहृदयजीवना ४ मनमोहनामं
गळधामा ॥ मुनिजनहृदयमनविश्रामा ॥ मायातीतामेघश्यामा ॥ मानववेशधारका ५ दीनदयाळादशरथनंदना ॥ दशमु
खांतकादुष्टदळना ॥ दानवकुळछेदना ॥ दशावतारधारका ६ तिसावेअध्यायींअनुसंधान ॥ सुलोचनाप्रवेशलीअग्न ॥ या
वरीविंशतीनयन ॥ चिंताक्रांतशोककरी ७ बंधूपुत्रपडलेरणीं ॥ आतांपाठीराखेनाहींकोणी ॥ तोंविद्युज्जिव्हतयेक्षणीं ॥
प्रधानबोलताझालासे ८ ह्मणेअहिरावणमहिरावण ॥ पाताळींआहेतदोघेजण ॥ तेकपटविद्येकरून ॥ रामसौमित्रनेती
ल ९ काळिकेपुढेंतत्काळीं ॥ समर्पितीलदोघांचाबळी ॥ ऐसेंऐकतांदशमौळी ॥ परमसंतोषपावला १० पत्रपाठविलेंलिहून
तत्काळप्रकटलेदोघेजण ॥ कींतेकामक्रोधचियेऊन ॥ अहंकारासीभेटले ११ त्यादोघांसीआलिंगून ॥ मयजापतीकरीरु
दन ॥ इंद्रजिताचेंवर्तमान ॥ दोघाजणासीसांगीतलें १२ यावरीतेदोघेबोलत ॥ आतांगतशोकतेबहुअसोत ॥ सौमित्रआ
णिरघुनाथ ॥ रजनीमाजीनेऊंतया १३ मगवरकडसेनेचासंहार ॥ करावयाकायउशीर ॥ ऐकतांदशद्वयनेत्र ॥ परमसंतो
षपावला १४ तोंबिभीषणाचेदोघेप्रधान ॥ गुप्तरूपेंगोष्टीऐकून ॥ तयानीवेगेंजाऊन ॥ कथिलेंरावणानुजासी १५ तेणेंनळ

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

नीळजांबुवंत ॥ मारुतीसकेलेंश्रुत ॥ तयानेंपुच्छदुर्गअद्भुत ॥ सेनेंभोंवतारचियेला १६ वेढियावरीवेढघालूनी ॥ वज्रदुर्गउं
चविलागगनीं ॥ वरीठांयींठांयींद्रुमपाणी ॥ गातबैसलेसावध १७ निशाग्रहणीतेकाळीं ॥ पांघुरलीकाळपुरुषाचीकांबळी ॥
जगावरीखोलघातली ॥ अज्ञानाचीअविद्येनें १८ निशीमाजीपक्षीबहुत ॥ वृक्षींनानाशब्दकरित ॥ रीसवाघुळेंतेथ ॥ लो
ळकंबतीशाखेवरी १९ भूतेंआणियक्षिणी ॥ गोंधळघालितीमहावनीं ॥ महाज्वाळारूपदाखउनीं ॥ गुप्तहोतीतेधवां २० स्म
शानींमातलेप्रेतगण ॥ भयानकरूपेंदारुण ॥ छळितीअपवित्रालागोन ॥ पवित्रदेखोनपळताती २१ पिंगळेथोरकिलबिलती ॥
भालुवादिवाभीतेंबोभाती ॥ चक्रवाकांचेशब्दउमटती ॥ टिटवेशब्दकरितीपैं २२ कुमुदिनीमिळेनीसवेग ॥ मस्तकींम
ण्याचेनिघतीउरग ॥ निधानेंप्रकटोनीसांग ॥ येऊंह्मणतीसभाग्यगृहा २३ असोऐसीनिशाथोर ॥ तोंपातलेदोघेअसुर ॥
दुर्गावरीगर्जतीवानर ॥ मार्गअणुमात्रदिसेना २४ असुरकरींतीक्ष्णशूळ ॥ फोडोंपाहातीदुर्गसबळ ॥ तोंशुळमोडलेंतत्का
ळ ॥ नव्हेवाटवज्रासी २५ मगतेऊर्ध्वपंथेंउडोनीं ॥ दुर्गमर्यादावोलांडूनी ॥ जेथेंनिजलेलक्ष्मणकोदंडपाणी ॥ उतरलेतेथेंअ
कस्मात २६ तोंकनकहरिणचर्मावरी ॥ निद्रिस्थदोघेलीलावतारी ॥ कींशिवआणिविष्णूशेजारीं ॥ अवनीवरीनिजेले २७
आधिचनिद्रासुखघन ॥ वरीराक्षसेंघातलेंमोन ॥ शय्येसहितउचलोन ॥ मस्तकींघेउनचालिले २८ तेथेंचकोरिलेंविवर ॥
लांबयोजनेंसप्तसहस्र ॥ सप्तघटिकेंतयामिर्नाचर ॥ घेऊनिगेलेदोघांसी २९ पुढेंतेरासहस्रयोजन ॥ दधिसमुद्रवोलांडु
न ॥ महिकावतीनगरपूर्ण ॥ लंकेहूनिविशेष ३० कामक्रोधदोघेजण ॥ आत्मयासिधास्तीआवरण ॥ तैसेरामलक्ष्मण ॥ स

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

दनींदृढरक्षिले ३१ नगरामध्यभागींदेऊळ ॥ दशयोजनेंउंचसबळ ॥ तेंभद्रकाळीचेंमुख्यस्थळ ॥ महाविशाळभयानक ३२
असोदधिसमुद्रतीरींजाण ॥ वीसकोटीपिसिताशन ॥ मकरध्वजबलिवंतपूर्ण ॥ दृढरक्षणठेविला ३३ महिकावतीउभयरत्नें
निद्रिस्थआणिवरीमौन्य ॥ त्यावरीनागपाशींबांधून ॥ बैसतीरक्षणअहिमही ३४ असोइकडेसुवेळेसीजाण ॥ कायझालेंवर्त
मान ॥ निशीसंपतांचंडकीर्ण ॥ उदयाचळापातला ३५ घ्यावयाश्रीरघुनाथाचेंदर्शन ॥ समस्तपावलेवानरगण ॥ तोंशय्ये
सहितपूर्ण ॥ दोन्हींनिधानेंनदिसतीपैं ३६ तोंदेखिलेंभयानकविवर ॥ घाबरेपाहतीवानर ॥ सुग्रीवादिकपीसमग्र ॥ गजबजि
लेंदेखोनी ३७ मगपाहतीवानर ॥ तोंद्वादशगांवेंपायथोर ॥ असुरांचेंउमटलेभयंकर ॥ श्रीरामभक्तपाहाती ३८ याचराचरा
चेंजीवन ॥ कमळोद्भवाचेंदेवतार्चन ॥ निशाचरींचोरिलेंजाण ॥ हृदयपिटीसुग्रीव ३९ सकळवानरतैंआक्रंदती ॥ धरणिव
रीअंगघालिती ॥ आक्रोशेंहांकाफोडिती ॥ धांवरघुपतीरघुपतीह्मणोनी ४० जगद्वंद्याराजीवनेत्रा ॥ कांउबगलासीआह्मावा
नरां ॥ तूंपरात्परविश्वाचासोयरा ॥ कोठेंगेलासिउपेक्षूनी ४१ तोंबिभीषणआलाधांवोन ॥ ह्मणेस्थीरस्थीरअवघेजण ॥ ही
गोष्टीजातांबाहेरपूर्ण ॥ येईलरावणयुद्धासी ४२ रामावीणसेनासमग्र ॥ जैसेंप्राणावीणशरीर ॥ तरीफुटोंनद्यावासमाचार ॥
पुढेंविचारकराआतां ४३ पिंडब्रह्मांडतत्वांसहित ॥ शोधीतजैसासद्गुरूनाथ ॥ ममवस्तूजीशाश्वत ॥ सीताकांतशोधातै
सा ४४ कींधुळींतहारपलेंमुक्त ॥ झारीनिवडीसावचित्त ॥ कींवेदार्थपंडित ॥ उकलोनियांकाढीजेवीं ४५ कींसमुद्रांतपडिले
वेद ॥ तेमच्छरूपेंसाधीमुकुंद ॥ तैसासीताहृदयाब्जमिलिंद ॥ शोधोनियांकाढावा ४६ तुह्मीरघुपतीचेप्राणमित्र ॥ भगीर

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

थप्रयत्नकरूनिथोर ॥ तुमचाप्रतापरोहिणीवर ॥ निष्कळंकउदयपावूंचा ४७ तुमचेआग्यासीनाहींपार ॥ जोंसुखरूपआहे वायुपुत्र ॥ तोक्षणमात्रेंरघुवीर ॥ काढीलआतांशोधूनी ४८ मगमारुतीपुढेंवानर ॥ घालितीसाष्टांगनमस्कार ॥ ह्मणतीतुजवीणरघुवीर ॥ ठांयींनपडेसर्वथा ४९ रामप्राप्तीसिकारण ॥ तूंसद्गुरूआह्मासीपूर्ण ॥ कामक्रोधअहीनिवटोन ॥ आत्मारामदाखवीं ५० पूर्वींसीताशुद्धीकेलीपाहीं ॥ आतांश्रीरामासीपाडींठांयीं ॥ ऐसेंऐकतांतेसमयीं ॥ राघवप्रियबोलत ५१ ह्मणेनलगतांएकक्षण ॥ विरंचीगोळहाशोधीन ॥ उभयतांरामलक्ष्मण ॥ असुरनिवटोनीआणितों ५२ मगह्मणेसुग्रीवाबिभिषणा ॥ तुह्मीरक्षावीकपिसेना ॥ विजयश्रीअयोध्याराणा ॥ असुरनिवटोनिआणितों ५३ नळनीळअंगदजांबुवंत ॥ घेऊनप्रवेशेविवरांत ॥ सातसहस्रयोजनेतेथ ॥ अंधःकारथोरपै ५४ चौघेकासावीसहोऊन ॥ मार्गींपडिलेमूर्च्छायेऊन ॥ मगतेमारुतीनेबांधोन ॥ आणिलेउचलोनबाहेरी ५५ लागतांसीतळपवन ॥ सावधझालेचौघेजण ॥ मकरध्वजबैसलारक्षण ॥ दारींतेव्हांविवराचे ५६ वीसकोटीराक्षसगण ॥ मकरध्वजेसींरक्षण ॥ तंवयाहींवेशपालटून ॥ कापडीहोऊनचालिले ५७ असुरदटावितीतयातें ॥ कोठेंजातायेणेपंथें ॥ तेह्मणतीजातोंतीर्थातें ॥ महिकावतीपहावया ५८ अंतरिक्षकरूंउड्डाण ॥ घेऊंकालिकेचेंदर्शन ॥ ऐसेंऐकतांचिवचन ॥ सर्वराक्षसक्षोभले ५९ सबळदंडउचलून ॥ कपींसीकरितीताडण ॥ मगहनुमंतेंपायींधरून ॥ आपटोनिमारिले ६० ऐसेंदेखतांविपरीत ॥ राक्षसधांवलेसमस्त ॥ प्रतापरुद्रहनुमंत ॥ जैसाकृतांतक्षोभला ६१ असंख्यातकुंजरभारी ॥ प्रवेशतीपांचकेसरी ॥ तैसेपांचजणवीरीं ॥ राक्षससर्वमारिले ६२ पांचवीरींभारेबांधोन

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

पृथ्वीवरीआपटोन ॥ चक्राकारभोंवंडोन ॥ समुद्रांतभिरकाविले ६३ तोंमकरध्वजधांवून ॥ भिडलामारुतीसीयेऊन ॥ मु
ष्टीप्रहारेंकरून ॥ एकाएकाताडिती ६४ सप्तपाताळेंदणाणित परमक्षोभलाहनुमंत ॥ हृदयींदेऊनिमुष्टिघात ॥ मकरध्व
जपाडिला ६५ मारुतीवक्षस्थळीबैसोन ॥ ह्मणेआतांसोडवीलकोण ॥ येरूह्मणेअंजनीनंदन ॥ जवळीनाहींयेकाळीं ६६
तोजरीयेताधांवोन ॥ तरीतुजकरिताशतचूर्ण ॥ तोमाझापिताजाण ॥ ऐकोनीमारुतीशंकला ६७ मगत्यासहातींधरून ॥
ह्मणेसांगकैसेंवर्तमान ब्रह्मचारीवायुनंदन ॥ तूंसूतकैसाझालासी ६८ येरूह्मणेलंकादहन ॥ करूनिश्वेदटाकिलाजाण ॥
तोगिळिलामगरीनेयेऊन ॥ मीजन्मलोतियेउदरीं ६९ मगह्मणेमीचहनुमंतरुद्रावतार ॥ तूंह्मणविसीमाझाकुमर ॥ सांगा
तीहांसतीसाचार ॥ मारुतीचकितपाहातसे ७० ऐसावृत्तांतसांगोनि ॥ पुत्रमस्तकठेवीचरणी ॥ तोमगरीआलीधांवूनी ॥ वल्ल
भासीपहावया ७१ ह्मणेआतांस्वरूपदिसतेंलाहान ॥ जेव्हांकेलेंलंकादहन ॥ त्याकाळींचेंस्वरूपपूर्ण ॥ प्रकटोनिसंशयफेडा
वा ७२ मगभीमरूपधरितांतेक्षणीं ॥ मगरीलागेदृढचरणी ॥ ह्मणेचिंतानकरावीमनीं ॥ अयोध्यानाथसुखीअसे ७३ अ
हिमहीकपटीदोघेजण ॥ घेऊनिआलेराममलक्ष्मण ॥ उदयीकदेवीपुढेंनेऊन ॥ बळिसमर्पितीदोनप्रहरां ७४ आपणदेउ
ळांतजाऊन बैसावेंगुप्तरूपेंकरून ॥ त्यास्थळींराममलक्ष्मण ॥ भेटतीलतुह्मासी ७५ ऐसेंऐकतांचिवचन ॥ वधूचेमस्तकीं
हस्तठेऊन ॥ ह्मणेअसुरांतेंवधून ॥ तृप्तकरीनपुत्रतुझा ७६ येरीह्मणेमहिकावतीनगर ॥ त्रयोदशसहस्त्रयोजनेंदूर ॥ आ
डवासमुद्रदुस्तर ॥ तरिविचारएकऐका ७७ तुह्मींपांचहीबलिवंत ॥ बसावेंमाझेवदननौकेंत ॥ महिकावतीसनेऊनत्वरि

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

त ॥ पुढतीआणीनयास्थळीं ७८ नळनीळअंगदजांबुवंत ॥ ऐकत्तांझालेभयाभीत ॥ ह्मणतीमगरमिठीअद्भुत ॥ भक्षिलिउ
दकांतनेउनी ७९ तरीमारुतीऐकवचन ॥ आह्मींरक्षितोंहेंस्थान ॥ तुजवांचूनिसिंधूलंघन ॥ सर्वथानव्हेकोणासी ८० मग
सिंधूतीरायेऊन ॥ हनुमंतेंचिंतिलेश्रीरामचरण ॥ जयजययशस्वीश्रीरामह्मणोन ॥ अकस्मातउडाला ८१ मनोवेगेंहनुमं
त ॥ आलामहिकावतींत ॥ परिकोणाएकासमात ॥ रक्षकांसनकळेची ८२ अणुरेणूहूनिलाहान ॥ झालासीताशोकहरण
भद्रकाळीचेंस्थळदेखोन ॥ आंतसंचरलातेकाळीं ८३ कापटयअनुष्ठानेंबहूत ॥ राक्षसकरितीदेउळांत ॥ मद्यमांसविप्रप्रेत ॥
पूजनासीठेविलें ८४ भ्रष्टशास्त्रेंकाढिती ॥ एकासिएकवचनदेती ॥ ऐसेंकरितांमोक्षप्राप्ती ॥ प्रमाणग्रंथींलिहिलेंअसे ८५
ऐसेंऐकतांश्रीरामभक्त ॥ ह्मणेयांसीकैंचामोक्षप्राप्त ॥ आतांकपाळमोक्षत्वरित ॥ पावतीहस्तेंमाझिया ८६ असोदेवालयीं
महारुद्र ॥ जाउनिदेवीउचलोनीसत्वर ॥ नाहाणींतटाकूनिद्वार ॥ दृढझांकिलेंहनुमंतें ८७ वज्रकपाटेंदेऊनी ॥ आपणबै
सलादेवस्थानीं ॥ सर्वांगींशेंदुरचर्चोनी ॥ झालाभवानीहनुमंत ८८ देवीमारुतीकडेपाहात ॥ तोंभयानकरूपदिसेअद्भुत ॥
जैसाहरणीचेगृहांत ॥ महाव्याघ्रप्रवेशला ८९ तोंयेरीकडेअसुरबहुत ॥ षड्रसअन्नाचेपर्वत ॥ पूजासामग्रीसमस्त ॥ घे
ऊनिदैत्यपातले ९० तोंवज्रकपाटेंदीधलीं ॥ तीनउघडतीकदाकाळीं ॥ एकह्मणतीदेवीक्षोभली ॥ ह्मणूनिस्तुतीकरिता
तीं ९१ ऐसालोटलाएकमुहूर्त ॥ तोंरुद्ररूपिणीआंतबोलत ॥ ह्मणेधन्यतुह्मींभक्त ॥ बळीसीरघुनाथआणिता ९२ लंकेपु
ढेंबहुतांचेप्राण ॥ मीचघेतलेसत्यवचन ॥ तुमचेंकरावयाभोजन ॥ येथेंसाक्षेपेंपातलों ९३ माझेंरूपबहुतीव्र ॥ पाहतांजा

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

तीलतुमचेनेत्र ॥ तरीपाडूनिगवाक्षद्वार ॥ पूजाआर्धीसमर्पा ९४ ऐसेंदेवीबोलेआंतुनी ॥ अहिमहीहर्षलेतेक्षणीं ॥ ह्मणती
आह्मींत्रिभुवनीं ॥ भक्तशिरोमणिदोघेही ९५ मगदेऊळमस्तकींविशाळ ॥ गवाक्षपाडिलेंतत्काळ ॥ पंचांमृताचेघटसकळ ॥
स्नानालागींवोतिले ९६ तोंमुखपसरूनिहनुमंत ॥ घटघटांप्राशीपंचामृत ॥ पाठीशुद्धोदकवोतित ॥ प्रक्षाळितमुखतेणे ९७
धूपदीपवाहातीतिसमयीं ॥ देवींतेंह्मणेहेतूंघेंई ॥ सवेंचह्मणेलवलाहीं ॥ नैवेद्यझडकरीयेऊंद्या ९८ अन्नेवोतितीएकसरें ॥
जयजयदेवीह्मणोनिगजरें ॥ राक्षसगर्जतीएकसरें ॥ मगमारुतीकायकरी ९९ सव्यअपसव्यहस्तेंकरुनी ॥ स्वाहाकरीरु
द्ररूपिणी ॥ जैसादावाग्निचेतवूनी ॥ तोनानाकाष्ठेंभक्षित १०० पंचभक्षपरमान्न ॥ बहुतरंगांचेंवोदन ॥ शाखालवणशाखा
आणून असंख्यातरिचविती १ दधीघृतनवनीत ॥ त्याचेपाटसोडिलेबहुत ॥ जैशावर्षाकाळींसरिताधांवत ॥ सागरासी
भेटावया २ पुजारेलोहदंडेंकरुनीं ॥ मोकळीकरितीतेव्हांनाहाणी ॥ प्रसादयावाह्मणोनी ॥ प्रयत्नकरितीबहुसाल ३ दे
वीबैसलीतेथ ॥ तिजवरीलोहदंडआदळत ॥ तीह्मणेसंकटबहुत ॥ मजयेथेंवोढवलेंपा॥ असुरींआणिलेदशरथसुत ॥ नैवे
द्यग्रासितोहनुमंत ॥ मजलागींताडणहोत ॥ अनर्थथोरमांडला ५ नाहाणीमोकळीकरितीअसुर ॥ परीकाहीचनयेबाहेर
ह्मणतीआजिदेवीनेसमग्र ॥ अन्नसर्वग्रासिलें ६ वृद्धवृद्धअसुरबोलत ॥ कैचीदेवीमांडिलाअनर्थ ॥ चोरूनिआणिलारघु
नाथ ॥ बरवाअर्थदिसेना ७ रावणेंचोरिलीसितासुंदर ॥ तेथेंएकआलावानर ॥ तेणेंनगरजाळूनिसमग्र ॥ केलासंहारबहु
तांचा ८ तैसेंचमांडलेंयेथ ॥ ऐसेबोलोनिबुद्धिमंत ॥ निजस्थानासीत्वरित ॥ जातेझालेंतेधवां ९ असोइकडेअन्नाचेपर्वत

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

वोतितांअसुरभागलेसमस्त ॥ परीदेवीचनव्हेतृप्त ॥ पुरेनह्मणेसर्वथा १० मगघातलेशुद्धजळ ॥ सर्वेचिअर्पिलेंतांबूल ॥
तेंव्हांहाकफोडोनिप्रबळ ॥ रुद्ररूपिणीबोलतसें ११ ह्मणेमीतुष्टल्येंआजिपूर्ण ॥ तुम्हासिअक्षयपददेईन ॥ तुम्हीआणि
लंकापतीरावण ॥ करीनसमानदोहींचें १२ माझीप्रसन्नतालवलाह्या ॥ आतांचयेईप्रत्यया ॥ ऐसेशब्दपरिसोनियां ॥ शा
हाणेचालिलेगृहासी १३ देवीह्मणेयाउपरी ॥ रामसौमित्रआणाझडकरी ॥ सगळेचिघालादेउळाभीतरीं ॥ त्याउपरीकौ
तुकपाहा १४ सच्चिदानंदरघुवीर ॥ जयाचियास्वरूपानाहींपार ॥ जोवेदशास्त्राअगोचर ॥ त्यासिगिळीनसगळेंची १५ ऐ
सेशब्ददेवीचेऐकोन ॥ हर्षलेअहिमहीदोघेजण ॥ तीसकोटीअसुरघेऊन ॥ चालिलेरामआणावया १६ रविकुळींचींनि
धानेंदोनी ॥ ठेविलींनागपाशींआकर्षुनी ॥ तेसोडोनियांतेक्षणीं ॥ रथासीदृढबांधिले १७ मगकाढिलेंमोहनास्त्र ॥ सावध
झालेरामसौमित्र ॥ राजिवाक्षउघडीनेत्र ॥ तोंसभोंवतेअसुरदाटले १८ श्रीरामसौमित्रासींबोले ॥ वारेशत्रूनींआपणाआ
णिलें ॥ धनुष्यबाणहिरूननेले ॥ रथींबांधिलेंदृढआह्मां १९ जानकीसारिखेंचिद्रत्न ॥ गेलेंदुःखसागरींबुडोन ॥ भरतत्या
गीलआतांप्राण ॥ वर्तमानहेंजातांची २० कौसल्यासुमित्रादोघीजणी ॥ प्राणदेतीलऐकतांक्षणीं ॥ वसिष्ठादिमहामुनी ॥
दुःखचक्रींपडतील २१ बिभीषणसुग्रीवहनुमंत ॥ नळनीळअंगदज्यांबुवंत ॥ माझेप्राणसखेसमस्त ॥ प्राणदेतीलऐकतां
२२ देवसमस्तबंदींपडिले ॥ त्यांचेंधैर्यदुर्गखचलें ॥ क्षुधितपात्रावरूनउठविलें ॥ तैसेंझालेंदेवांसीं २३ आतांअसावेंधैर्य
धरून ॥ संकटींपावेलउमारमण ॥ तरीहेंक्षणमात्रेंविघ्न ॥ निरसोनियांजायील २४ जोसाक्षांतरुद्रावतार ॥ आमुचाहनु

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

मंतसाचार॥ येथेंजरीपावतासत्वर॥तरीअसुरसंहारिता २५ साक्षांतशेषनारायण ॥ लीलावतारीरामलक्ष्मण॥समयासा
रिखेंवर्तून ॥ दावीतखुणदाशरथी २६ असोराक्षसींरामसौमित्र ॥ रथींबांधिलेदृढसत्वर ॥ शिंदूरवर्णपुष्पहार ॥ गळांघात
लेतेधवां २७ वरीउधळितीशेंदुर ॥ पुढेंहोतवाद्यांचागजर ॥ नग्नशस्त्रेंकरूनिसमग्र ॥ असुरह्याकाफोडिती २८ चालविलेमि
रवित ॥ नगरलोकआलेसमस्त ॥ पाहावयाश्रीरघुनाथ ॥ एकचढतीगोपुरीं २९ देखतांदोघेसकुमार॥ लोकांसिनधरवेग
हिंवर ॥ नेत्रींश्रवोंलागलेंनीर ॥ हाहःकारजाहला ३० नरनारीआक्रंदत ॥ एकचिवर्तलाअकांत ॥ चराचरजीवसमस्त ॥
पाहूनिशोककरिताती ३१ तीनप्रदक्षिणाकरून ॥ देऊळीआणिलेदोघेजण ॥ देवीचींकपाटेंउघडोन ॥ आंतलोटूनदीधले
३२ कपाटेंदेऊनपुढती ॥ राक्षसगोंधळघालिती ॥ हातींदिवटयाघेऊनिनाचती ॥ मद्यप्राशितीउन्मत्त ३३ इकडेदेउळांत
रामलक्ष्मण ॥ पाहातीजंवविलोकून ॥ देवीचेंपसरिलेंवदन ॥ मुखजैसेंकाळाचें ३४ हाकदिधलीभयंकर ॥ ह्मणेदोघेराज
पुत्र ॥ तुह्मासिगिळितेंयेंसत्वर ॥ तरीस्मरणकराआपुलें ३५ तुमचाप्राणसखाअसेलपाहीं ॥ त्यासचिंतादेहांतसमयीं ॥ ऐ
सेंऐकोनिलवलाहीं ॥ रघुवीरबोलतसे ३६ जरीअनर्थीपडिलेभक्त ॥ तरितेमाझेंस्मरणकरित ॥ तोमीआजिरघुनाथ ॥
संकटींस्मरूंकोणातें ३७ तरीमाझियाप्राणाचाप्राण ॥ जिवलगसखावायुनंदन ॥ तोअसतातरीविघ्न ॥ कदानहोतेंआह्मा
सी ३८ आतांअसोबोलणेविशेष ॥ मातेअतांकरींकृपाकटाक्ष ॥ कींजननीपाळीबाळकास ॥ प्रीतीबहूतधरूनियां ३९ ऐ
कतांरघुपतीचेंवचन ॥ कपीचेनेत्रींलोटलेंजीवन ॥ स्फुंदस्फुंदोनिवायुनंदन ॥ धरीचरणश्रीरामाचे ४० तेणेनयनोदकेंकरू

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

रा०वि० न ॥ प्रक्षालिलेश्रीरामचरण ॥ मगतोसीताशोकहरण ॥ रूपआपुलेंप्रकटकरी ४१ दृष्टींदेखतांवायुनंदन ॥ प्रेमेंदाटलारघु अ०३१
५ कुळभूषण ॥ हृदयींधरिलाआलिंगुन ॥ कायदृष्टांतदेऊंयेथे ४२ कवीनीतर्ककाढिलेबहुत ॥ परित्यासुखासनाहींदृष्टांत ॥
पाठिराखाकैंवारीभक्त ॥ मारुतीऐसानव्हेची ४३ मारुतीसह्मणेरघुवीर ॥ त्वाघेतलेअनंतअवतार ॥ परीतुझेनविसरेंउप
कार ॥ कल्पांतींहीहनुमंता ४४ तुझियाउपकारानाहींमिती ॥ कायकायआठवूंमारुती ॥ असोयावरीउर्म्मिळापती ॥ हनु
मंतासीभेटला ४५ श्रीरामह्मणेहनुमंता ॥ कैसेंशत्रूवधावेअतां ॥ येरूह्मणेतुह्मींचिंता ॥ नकराकांहींमानसीं ४६ तुह्मीमा
गेंअसालपोन ॥ एकएकअसुरबोलावून ॥ तयाचींशिरेंछेदून ॥ करीनचूर्णयेथेंची ४७ श्रीरामह्मणेधनुष्यबाण ॥ जरीदेसी
लमाझेआणून ॥ तरिहेअसुरसंहारीन ॥ क्षणमात्रनलागतां ४८ तंवबोलेवायुनंदन ॥ मीमारीनअहिरावण ॥ मगकपाटें
उघडोन ॥ महिरावणवधातुह्मीं ४९ तेव्हांगुप्तरूपेंजाऊन ॥ दोघांचेंआणिलेधनुष्यबाण ॥ पाठीसीलपवोनिदोघेजण ॥
आपणदेवीजाहला १५० मगह्मणेअहिरावणा ॥ तूंआधींघेईंमाझियादर्शना ॥ ऐकतांचिऐसीयावचना ॥ संतोषेंप्रवेशेदे
उळीं ५१ जैसापंचाननाचेजाळींत ॥ वारणप्रवेशेउन्मत्त ॥ कींव्याघ्राचेविवरांत ॥ मृगअकस्मातसंचरे ५२ भुजंगाचेबीळीं
देख ॥ प्रवेशलाजैसामूषक ॥ कींमरणदेखोनीपतंगमूर्ख ॥ दीपासिभेटोंपातला ५३ तैसाप्रवेशेअहिरावण ॥ भयानकदे
वीदेखोन ॥ धाकेंधाकेंचिनमन ॥ करिताझालातेधवां ५४ देवीचरणीमस्तकठेविला ॥ देखोनिमहारुद्रक्षोभला ॥ असुरपा ५
यींरगडिला ॥ शतचूर्णकेलामस्तक ५५ हस्तपादझाडीतिक्षणीं ॥ तेणेंदणाणिलीमंगळजननी ॥ तोदणाणभयंकरऐकोनी ॥

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

शाहाणेउठोनिपळाले ५६ अहिरावणाचागेलाप्राण ॥ मगमहीरावणबोलेवचन ॥ च्यारघटिकाझाल्यापूर्ण ॥ बंधूबाहेरन
येचो ५७ कायतोपाहावयावृत्तांत ॥ पूजारीजायदेऊळांत ॥ तयाचादायादहीजात ॥ त्याचेपाठीहळूहळू ५८ देउळींअन्न
प्रसादसमूळ ॥ तोचिअवघापैंनेईल ॥ ह्मणोनियांउतावेळ ॥ तोदेउळींउतरला ५९ पुढीलपूजारीतेवेळां ॥ देवीसनमाव
यागेला ॥ मत्कुणप्रायरगडिला ॥ पायांतळींहनुमंतें ६० ऐसेंदेखोनीविपरीत ॥ दुसराचळचळांकापत ॥ ह्मणेहाहोयहनु
मंत ॥ लंकाजेणेंजाळिली ६१ आंगींमुरकुंडीवळोन ॥ दारांतआपटलायेऊन ॥ दोंहींहस्तेंकरून ॥ शंखकरीआक्रोशें ६२
ह्मणेजेणेलंकाजाळिली ॥ तोचकाळबैसलादेउळीं ॥ देवीमोरींतसारिली ॥ पूजाघेतलीसर्वतेणें ६३ पूजारीसांगेमहीराव
णा ॥ बंधूयमसदनपावलाजाणा ॥ ऐसेंऐकतांराक्षसगणां ॥ पळसुटलातेकाळीं ६४ राक्षसांझालाआकांत ॥ एकएकातें
धरूनहनुमंत ॥ चूर्णकरूनीटाकित ॥ कितेकपळतीदशदिशा ६५ मगशस्त्रेंकवचेंबांधोन ॥ सेनासमग्रएकवटोन ॥ सिद्ध
झालामहिरावण ॥ युद्धालागींतेकाळीं ६६ ह्मणेबाहेरयेरेमर्कटा ॥ कोठेंप्रवेशलासीमहाधीटा ॥ आजिमृत्युपुरींचावांटा ॥
रामासहिततुह्मांअसे ६७ तोंदेउळामाजीवायुपुत्र ॥ स्कंधींघेतरामसौमित्र ॥ कींतेविष्णूकर्पूरगौर ॥ एकवहनींबैसले ६८
कींशशीआणिदिनपती ॥ बैसलेदिसतीएकरथीं ॥ कींपाकशासनआणिवाचस्पती ॥ एकवहनींआरूढले ६९ तैसेदोघे
स्कंधींबैसोन ॥ बाहेरयेतवायुनंदन ॥ पादप्रहारेंकरून ॥ कपाटेंफोडिलींतत्काळ ७० बाहेरप्रकटतांतत्काळ ॥ पुच्छेंउडवू
निदेउळ ॥ आकाशींभिरकाविलेंसकळ ॥ जेवीबाळकंदुकटाकी ७१ देवालयविदारूनी ॥ देवीसहितसमुद्रजीवनी ॥ टा

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

कितांराक्षसमिळुनी ॥ अंजनीतनयवेढिला ७२ खालींरामसौमित्रउतरले ॥ श्रीरामेकोदंडचढविलें ॥ अचळठांणमांडिलें
बाणलाविलाचापासी ७३ महिरावणासीरामह्मणे ॥ करिनजर्जरतुलाआपुलेबाणे ॥ कपटियातुझेंकरचीनपेणे ॥ अहिरा
वणासमीप ७४ तोंराक्षसेंधनुष्यवोढून ॥ रामावरीसोडितबाण ॥ रघुनाथेंशरछेदोन ॥ क्षणमात्रेंटाकिले ७५ नरवीरश्रेष्ठ
रघुनंदन ॥ महिवरीसोडीशतबाण ॥ त्याचेलल्लाटींजाऊन ॥ एकपंक्तीसबैसला ७६ परीनवलवर्तलेंअद्भुत ॥ रुधिरबिंदुखा
लींपडत ॥ त्याचेमहीरावणहोत ॥ एकसारिखेसर्वेही ७७ लक्षाचेलक्षमहिरावण ॥ त्यावरीरामटाकीबाण ॥ त्यांचियाबिं
दूपासोंन ॥ कोटयानकोटींनिपजती ७८ तितुकेहीरामावरीअसुर ॥ करितेझालेशस्त्रमार ॥ मगघायटाळीतरघुवीर ॥ च
कितपाहेचहूंकडे ७९ मगबोलेचापपाणी ॥ वैरीवधावेशस्त्रेंकरूनी ॥ तंवआगळेचिहोतीतेक्षणीं ॥ नकळेकरणीकैसीहे ८०
तंवतोनिर्वाणीचाभक्त ॥ वज्रदेहीवीरहनुमंत ॥ दृष्टीदेखिलेंसर्वविपरीत ॥ चिंताक्रांतपडियेला ८१ मगतोलोकप्राणेशनंद
न ॥ मगरीपासीआलाउठोन ॥ तीसपुसेवर्तमान ॥ समूळमहीरावणाचें ८२ तीह्मणेरंभादेवांगना ॥ जातहोतीइंद्रभुवना ॥ तं
वभृगुऋषीजाणा ॥ तीणेअकस्मातदेखिलें ८३ ह्मणेवृत्धकुरूपब्राह्मण ॥ तंवतोश्रेष्ठतपोधन ॥ ऐसेंऐकतांचिवचन ॥ शाप
दारुणदिधलातीतें ८४ ह्मणेतूंहोसीलसर्पिणी ॥ विचरसीसदाघोरवनीं ॥ धांवूनयेरीलागेचरणी ॥ ह्मणेमजउशापदेईजे
८५ येरीह्मणेहोसीलसर्पिणी ॥ क्षणएकदिससीपद्मिणी ॥ सूर्यरतपडतांक्षणी ॥ जासीत्वरितनिजपदा ८६ मगतेअहिरूपाहिं
डेवनीं ॥ क्षणएकझालीअसेपद्मिणी ॥ तोसूर्याचेवीर्यवरुनीं ॥ अकस्मातपडतांउत्धरली ८७ रंभागेलीउत्धरून ॥ परीर ६

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

कबिंदूचेहोतोअहिरावण ॥ हेंचंद्रसेनेसवर्तमान ॥ जाऊनियांपुसावें ८८ अहीचेमुखींवीर्यपडत ॥ तोअहिरावणझालाय
थार्थ ॥ महीवरीपडलेंरेत ॥ महिरावणतोझाला ८९ अहिरावणाचीपत्नी ॥ चंद्रसेनासत्यवचनी ॥ हेंहनुमंतेंऐकोनी
॥ उडेमारुतितेथोनियां ९० महिकावतीसयेउनी ॥ प्रवेशलाराजसदनीं ॥ तोंचंद्रसेनाबैसलीध्यानीं ॥ चापपाणी
विद्युल्लतेसारिखेध्वजतेथ ॥ देउळावरीउभारिले ७१ चंदनाचेसडेघालुनी ॥ वाटारंगविल्याकुंकुमेंकरूनी ॥ दद्दशाकोण।
लागुनी ॥ अयोध्येमाजीनसेची ७२ नानातीर्थांचींकारंजीबहुत ॥ घरोघरींऊर्ध्वउडत ॥ नीळांचेमयूरधांवत ॥ बिदो
बिदीलवलाहें ७३ आळोआळीपाहातांमंदिरें ॥ एकाहूनएकसुंदरें ॥ तयांप्रतीगोपुरें ॥ एकाहूनिएकशोभती ७४ असो
ऐसीअयोध्यादेखोन ॥ तटस्थपाहतीवानरगण ॥ तंवपूर्वद्वारेंरघुनंदन ॥ अयोध्येच्यापातला ७५ महाद्वारींगणेशसरस्व
ती ॥ त्यांचीपूजाकरूनश्रीरघुपती ॥ आंतप्रवेशलात्वरितगती ॥ सकळनृपांसमवेत ७६ जैसानदसमुद्रींमिळाला ॥ नंदन

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

वनींभ्रमरसंचरला ॥ चतुर्मुखाचेंहृदयींभरला ॥ वेदजैसाषडांगेसी ७७ कींवृत्रासुरमर्दून ॥ निजमंदिरींप्रवेशेशचीरमण
तेवींसकळासहितरघुनंदन ॥ अयोध्येंतप्रवेशला ७८ देवअंबरींविमानींयेती ॥ असंख्यदाटलेनृपती ॥ किरीटासकिरीट
आदळती ॥ रत्नेंविखुरतीचहूंकडे ७९ अयोध्येच्यासमस्तनारी ॥ जैशादेवांगनासुंदरी ॥ रत्नदीपघेऊनियांकरीं ॥ ओवा
ळूंआल्यारामातें ८० लक्षानुलक्षनगरललना ॥ ह्मणतीराघवाचिन्मयलोचना ॥ जयलाभतुझियाचरणा ॥ जवळवावना
हींजावया ८१ ह्मणोनिआपुल्यागोपुरावरूनी ॥ वोंवाळितीसकळकामिनी ॥ त्याह्नूनिश्रीरामाचेवदनीं ॥ प्रभाविशेषवि
राजे ८२ त्यांकडेपाहूनिरघुनाथ ॥ सुमंतासभ्रूसंकेतदावित ॥ तोत्यासीसमजलाअर्थ ॥ जेंकांहृद्गदरामाचें ८३ वस्त्रेंअळं
कारआणुनी ॥ तत्काळगौरविल्याकामिनी ॥ तोंनगरलोकधावलेतेक्षणीं ॥ मंडपघसणीजाहली ८४ तयांशीवेत्रधारीमा
रित ॥ तेंदृष्टीदेखोनिरघुनाथ ॥ तत्काळपरतेकेलेदूत ॥ ह्मणेंजनसर्वत्रयेऊंद्या ८५ ऐसीअज्ञाहोतांचिजाण ॥ जवळआलेस
कळजन ॥ पाहोनिश्रीरामाचेंवदन ॥ चरणींमिठ्याघालितीं ८६ लक्षूनिश्रीरघुनाथा ॥ नारीटाकितीवरीअक्षता ॥ एकनिं
बलोणतत्वता ॥ मुखावरूनउतरती ८७ एकह्मणतीतुजवरून ॥ राघवाजाऊंवोवाळून ॥ एकह्मणतीहेंवदन ॥ पुनःदृष्टीस
पडेना ८८ दिव्यसुमनाचेसंभार ॥ वर्षावकरितीसुरवर ॥ असोजगद्वंद्यरघुवीर ॥ निजमंदिरींप्रवेशला ८९ जाऊनीअं
तरगृहांत ॥ देवांसपुष्पांजुळीसमर्पित ॥ राजयांच्यासेनासमस्त ॥ अयोध्याप्रदेशींउतरल्या ९० अष्टादशपद्मेंवानर ॥
आणिलंकेचेअसुर ॥ तितुक्यासीआदरउपचार ॥ सुमंतशत्रुघ्नकरितातीं ९१ बिभीषणादिराजेसकळी ॥ तेसदांअसती

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

रामाजवळी ॥ वसिष्ठेंसामर्थ्यीसिद्धकेली ॥ राज्यपदाचीतिथवां १२ श्वेतचामरश्वेतछत्र ॥ श्वेतगजश्वेततुरंगथोर ॥ चतुःसमु
द्रींचेंआणिलेंनीर ॥ सप्तपल्लवसप्तमृत्तिका १३ सभामंडपदैदीप्यमान ॥ तेथेंमांडिलेंदिव्यसिंहासन ॥ मिळालेसकळवि
द्वज्जन ॥ आणीनृपतीसर्वहीं १४ वसिष्ठह्मणेराजीवनयना ॥ जलजगात्रामनमोहना ॥ जगद्वंद्याअनंतशयना ॥ राज्य
आताअंगिकारी १५ भरतरामाप्रतीबोले ॥ चतुर्दशवर्षेंतपकेलें ॥ तेंआजिशीघ्रकाळें ॥ सफळझालेंपाहिजे १६ सिं
हासनीं बैसावेंआपण ॥ मगअक्षयभांडारेंफोडून ॥ द्रव्यअपारदेऊनिदान ॥ याचकसुखीकरावे १७ मगवसिष्ठेंहा
तींधरून ॥ मंडपासीआणिलारघुनंदन ॥ सीतेसहितबैसवून ॥ अभिषेककेलावेदमंत्रीं १८ घनश्यामपूर्णरघुवीर ॥ तप्तकां
चनवर्णपीतांबर ॥ लेवविलेदिव्यअलंकार ॥ मुकुटकुंडलेंकौस्तुभादि १९ जानकीसहितरघुनंदन ॥ सिंहासनीं बैसलाआ
पण ॥ सकळभूपतीयेऊन ॥ अक्षतामस्तकींलाविती १०० सुमुहूर्तवेळासाधूनसत्वर ॥ उभारिलेंदिव्यछत्र ॥ सकळवाद्यां
चागजर ॥ होताझालातेकाळीं १ झालाएकचिजयजयकार ॥ सुमनेंवर्षतीसुरवर ॥ सकळरायानींकरभार ॥ राघवापुढें
समर्पिला २ सर्वनृपानींकरूनिनमन ॥ उभेठाकतीकरजोडून ॥ भरतेंभांडारफोडून ॥ याचकजनगौरविले ३ उदारधी
रघुवीर ॥ ज्याचाबंधूभरतवीर ॥ मोटाबांधूनिअपार ॥ द्रव्यदेतयाचकां ४ पुरेपुरेहेंचबोलतीसमस्त ॥ हयगजरत्नेंरथ ॥
वस्त्राभरणेंअपरिमित ॥ दिधलेंबहूतयाचकां ५ गोदानेंभूदानेंअपार ॥ जेंवेदींबोलिलेंसार ॥ तितकेंदेऊनिद्विजवर ॥ सु
खीकेलेतेकाळीं ६ ऐसेंषोडशदिनपर्यंत ॥ सोहळाहोतसेअद्भुत ॥ कळापात्रेंयेऊनितेथ ॥ विद्यादावितरामापुढें ७ लक्ष्म

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

४ णआणिभरत ॥ शत्रुघ्नआणिसुमंत ॥ युवराज्यचौघासींदेत ॥ श्रीरघुनाथतेसमयीं ८ वस्त्रेंभूषणेंदेऊन ॥ चौघेकेलेमुख्यप्र
धान ॥ तुमचेअनुमतेंकरून ॥ राज्यचालवीनह्मणेराम ९ असोदिव्यअन्नेंनिर्मून ॥ सकळरायांसीदिधलेंभोजन ॥ वस्त्रालं
कारींपूर्ण ॥ सेनेसहितगौरविले १० मगश्रीरामाचीआज्ञाघेती ॥ सेनेसहितसकळनृपती ॥ स्वदेशाप्रतीतेव्हांजाती ॥
गुणवर्णितराघवाचे ११ सुग्रीवआणिबिभीषणास ॥ रामेंठेविलेएकमास ॥ नित्यभोजनपंक्तीस ॥ नानाविलासहोतीपैं १२
सिंहासनींबैसेश्रीरघुनाथ ॥ भोंवतेंबंधूआनंदभरित ॥ भक्तिरसेंशत्रुघ्नभरत ॥ चामरेंवरीवारिती १३ तोंगवाक्षद्वारेंतेसम
यीं ॥ अवलोकितअसेकैकेयी ॥ ह्मणेत्रिभुवनींशोधितांपाहीं ॥ अभागिनाहींभरताऐसा १४ चवदावर्षेंभिकारी ॥ जाऊनि
बैसलावनांतरीं ॥ शेवटींबंधूचेंदास्यत्वकरी ॥ चामरेंवरीवारितो १५ माझेंपूर्वपापफळासिआलें ॥ ऐसेंभरताचीमाताबो
ले ॥ वसिष्ठासबोलावूनतेवेळे ॥ कैकेयीसांगेएकांतीं १६ ह्मणेमाझेपोटींभरत ॥ दरिद्रीजन्मलाअत्यंत ॥ बंधूचेंदास्यत्व
करित ॥ मजहेंदुःखवाटतें १७ मगबोलेब्रह्मसुत ॥ अजूनितरींराहेंनिवांत ॥ ग्रासिलाराजादशरथ ॥ वनारघुनाथदवडि
ला १८ सच्चिदानंदब्रह्मपूर्ण ॥ तोहाअवतरलारघुनंदन ॥ शतमूर्खेंतुजनाहींज्ञान ॥ अध्यापकांहींचकळेना १९ जेब्रह्मादि
देवांचीध्यानमूर्ती ॥ त्हदयींध्यातअपर्णापती ॥ हृदयकमळींवाहाती ॥ सनकादिकप्रीतीनें २० पुराणपुरुषरघुनंदन ॥ त्या
चेभजनीलावीमन ॥ आपुलीमतीबुजवून ॥ नसतीवचनेंबोलूंनको २१ तुजप्रतीसांगावेंज्ञान ॥ जैसेंकाननामाजीरुदन ॥ ४
कीलसणासनेऊन ॥ कर्पूरांतघातला २२ पुष्पवाटिकेंतपलांडूउपजला ॥ परितोगुणनसांडीआपुला ॥ नित्यदुग्धेंवायस

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

धुतला ॥ परीकृष्णवर्णनजाय २३ शर्करेचेंअळेंकेलें ॥ त्यांतनिंबबीजघातलें ॥ परीशिवटींकडूयेतीफळें ॥ व्यर्थगेलेकष्टसर्व २४ खापरासपरीसघांसतां ॥ परीसुवर्णनहोयसर्वथा ॥ कींदुग्धामाजीरत्नेंघालितां ॥ मवाळतानयेची २५ तैसेंतुजप्रतीशिकविलें ॥ तेंसर्वहीव्यर्थगेलें ॥ आतांमनकरूनिउगलें ॥ भजेंसर्वदारघुनाथा २६ ऐसेंशिकवूनीतयेसी ॥ बाहेरआला वसिष्ठऋषी ॥ यावरीबिभीषणसुग्रीवासी ॥ निरोपदेतश्रीराम २७ वानरांसीश्रीरामह्मणे ॥ भोजनकरूनगमनकरणें ॥ तेंवचनमान्यकेलें ॥ अवश्यह्मणतीतेधवां २८ तेदिवसींमोटासोहाळा ॥ मेळऊनिद्विजांचामेळा ॥ वानरांसहितसकळां ॥ भोजनविधीहोतसे २९ प्रेमाचियागंधाक्षता ॥ लावीसर्वांसरसिजोद्भवपिता ॥ सुमनमाळातत्वता ॥ समस्तांअर्पितआदरें १३० चैतन्यपरिमळद्रव्येंबहुत ॥ सर्वांसचर्चिलींशोभिवंत ॥ अंतर्धूपदीपयथार्थ ॥ करूनिभोजनाबैसले ३१ श्रीरामगृहींचें दिव्यान्न ॥ सुवासालागींविधोन ॥ वसंतकरीप्रदक्षिण ॥ इच्छाभोजनतेथींचें १३२ त्याअन्नाचासुवासबहुत ॥ स्वर्गीं देवांसआवंतूंजात ॥ विबुधलाळघोंटितीसमस्त ॥ श्रीरामपंक्तीसजेवावया १३३ बैसावयासुवर्णपाट ॥ मांडिलेंदिव्यरत्नाचेंताट ॥ जडीतअडणियांथाट ॥ पडेतेजचहूंकडे ३४ सुगंधउदकभरूनियां ॥ जवळठेविल्याजडितझारिया ॥ पात्राप्रतीसमया ॥ लावियेलेरत्नदीप ३५ प्रथमविश्वाससंपूर्ण ॥ तेंचअर्धीवाढिलेंलवण ॥ विरक्तीच्यापुऱ्याजाण ॥ नानासाधनेंत्याचिशाका ३६ सत्कामाचियाकोशिंबिरी ॥ वाढिल्यानवविधाभक्तीपरी ॥ निश्चयशर्करात्यावरी ॥ ऐसियापरीशुद्धदिसे ३७ निजबोधाचाभातपूर्ण ॥ अक्षयशांतीचेंवरण ॥ तेथेंअभेदवडेकरून ॥ नानापरीचेवाढिले ३८ पूर्णप्र

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

त्तिचेमांडेथोर ॥ भूतकृपेच्याघारियासकुमार ॥ स्नेहतेलवरियाअपार ॥ मिष्टऐसींवाढिली ३९ तप्तघृतांततळून ॥ गुळव
रीयाअतिगोडपूर्ण ॥ क्षमाफेणियाशोभायमान ॥ समसमानसर्वांशीं १४० विवेकपापडचांगले ॥ वैराग्यअग्नीवरींभाजिले
विज्ञानअमृतफळें॥ वाढियेलींसत्वाचीं ४१ सर्वांभूतींसमताचोखडी ॥ तेचघमघमीतवाढिलीकढी ॥ सज्जनजाणतीतेचगो
डी ॥ वेदांतशास्त्रवेत्तेजे ४२ मुख्यगुरूकृपेचेंघृत ॥ त्याअन्नावरींसमस्त॥ प्रेमेंकरूनसद्यस्तप्त ॥ शुद्धकरितीअन्नातें ४३ जे
वणारबैसलेसद्भक्त ॥ स्वानंदेंकरूनपात्रेंप्रोक्षित ॥ देहबुद्धीच्याचित्रावळीतेथ ॥ पात्राबाहेरघातल्या ४४ सोहंगायत्रीज
पजपोनी ॥ देहबुद्धीनावेंसोडिलेंपाणी ॥ निवृत्तिआपोशनघेऊनी ॥ रामस्मरणींगर्जिनले ४५ पंचप्राणाच्याप्राणाहुती ॥
योगाभ्यासेंआर्धकिरिती ॥ शिखानामग्रंथी ॥ सत्वरसोडितीनिजहस्तें ४६ निराभिमानसंपूर्ण ॥ तेणेंचकेलेंकरक्षाळण ॥
नेत्रासीलाविलेंजीवन ॥ जगज्जीवनसर्वदिसे ४७ श्रीरामभक्तक्षुधाक्रांत ॥ स्वादघेऊनिप्रितीनेंजेवित॥ ब्रह्मासनघालोनि
निश्चिंत ॥ ग्रासामागेंग्रासघेती ४८ भवरोगेंजेवेष्टित ॥ तेटकमकांउगेचपाहात ॥ नाहींभावक्षुधापोटांत ॥ ग्रासएकनघे
वे ४९ चंद्रोदयींद्रवेसोमकांत ॥ इतरपाषाणकोरडेसमस्त ॥ तैसेश्रीरामपंक्तीसजेविलेभक्त ॥ अभाग्यासीतेंप्राप्तकैंचें ॥
१५० ऐसेजेवितीआनंदें ॥ नामेंगर्जतीमहाशब्दें ॥ भावेंचर्चाकरितीऋषीवेदें ॥ ज्याचेस्मरणेंकरूनियां १५१ जेदैवसिंपत्ती
नेंसभाग्यहोती ॥ तेचराघवपंक्तीसजेविती॥ तृप्तीचेढेंकरदेती ॥ ब्रह्मानंदेंकरूनियां १५२ जेत्रिभुवनपतीचीराणी ॥ वा
ढीजानकीत्रिजगज्जननी ॥ तेथेंन्यूनपदार्थाचीकाहणी ॥ कदाकाळीपडेना ५३ स्वानुभवअन्नसेऊन ॥ कर्मधर्मांचेंउत्तरापो ५

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

शन ॥ घेऊनउठिलेतेजन ॥ आंचवलेसर्वसंसारा ५४ अभिन्नत्वअदंभित्व ॥ हेंचविडेदेतीसमस्त ॥ निजवननामसुद्रांकि
त ॥ देतीदक्षिणायाचकां ५५ भक्तीचींभूषणेंवस्त्रें ॥ सद्भक्तांसीदिधलींराजीवनेत्रें ॥ तोसोहळावर्णावयावक्त्रें ॥ सहस्त्रवदना
शक्तीनव्हे ५६ ऐसेस्वपंक्तीसबैसवून ॥ सीतावल्लभेंदिधलेंभोजन ॥ मगसभामंडपासयेऊन ॥ रघुनंदनगौरवीतयां ५७
मुकुटकुंडलेंसर्वअळंकार ॥ आपणस्वयेंदेतरघुवीर ॥ तैसेइतरवानर ॥ गौरविलेरघुनाथें ५८ बिभीषणसुग्रीवहनुमंत ॥
यांच्यासेनाज्यासमस्त ॥ तितुक्यागौरवीरघुनाथ ॥ वस्त्रेंअळंकारदेउनी ५९ दोनसिंहासनेंदोनछत्रें ॥ बिभीषणसुग्रीवा
दिधलींराजविनेत्रें ॥ आणिउत्तमोत्तमवस्त्रें ॥ वस्तुनानाप्रकार १६० परिघुढेंअसेहनुमंत ॥ त्याकडेनपाहेरघुनाथ ॥ वान
रगणपाहतीसमस्त ॥ विपरीतार्थदेखोनी ६१ तिकडेनपाहेरघुनंदन ॥ तरिहनुमंताऐसेंनिधान ॥ हेंब्रह्मांडवोवाळुन ॥ त
यावरूनटाकावें ६२ ज्याचेउपकारअपार ॥ मेरूपरीसझालेथोर ॥ त्यासद्यावयाअळंकार ॥ दृष्टीनभरेरामाची ६३ मगउ
ठोनियांरघुपती ॥ बोलतसेमारुतीप्रती ॥ ह्मणेतवहृदयींनिश्चिती ॥ मीचसर्वदांअसेन ६४ तुजवेगळामीएकक्षण ॥ जि
वलगामीनसेंजाण ॥ हनुमंतेंधरिलेचरण ॥ ह्मणेमजहेंचदेयीं ६५ सीतेनेंवस्त्रेंअळंकार ॥ देऊनीगौरविलेसकळवानर ॥ प
रिआपुलेतीनदिव्यहार ॥ हनुमंतासीदीधले ६६ त्याहारासीतत्वता ॥ उपमानाहींसर्वथा ॥ त्रिभुवनींचेंमोलदेतां ॥ तेंही
उणेंतयांसी ६७॥ पृथ्वीचेंमोलसंपूर्ण ॥ एकएकमणीजाण ॥ तोहारजानकीनेंघेऊन ॥ गळांघातलामारुतीचे ६८ हनुमं
ततत्काळउडाला ॥ वृक्षावरीसमोरबैसला ॥ एकएकमणीफोडिला ॥ दाढेखालींघालुनियां ६९ जोमणीपाहेफोडून ॥ ह्म

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

णेयांतनाहींरघुनंदन ॥ ह्मणोनिदेतसेभिरकावून ॥ व्यर्थपाषाणकायकरूं १७० बोलतीसुग्रीवादिवानर॥ व्यर्थकांफोडिला
सीदिव्यहार ॥ मारुतीह्मणेरघुवीर ॥ याचेअंतरींदिसेना ७१ वानरह्मणतीतुझेत्हृदयीं ॥ रामदावींयासमयीं ॥ ऐसेंबोल
तांलवलाहीं ॥ कायकेलेंहनुमंतें ७२ त्हृदयकपाटउघडिलें ॥ उदरविदारूनदाविलें ॥ तोंआंतश्रीरामरूपसांवळें ॥ सम
स्तींदेखिलेंएकदांची ७३ जैसासिंहासनींरघुनाथ ॥ तैसामारुतीचेहृदयींदिसत ॥ मगवानरउठोनिसमस्त ॥ नमस्कारि
तीहनुमंता ७४ असोअयोध्येसीनिरंतर ॥ राहिलाअंजनीकुमर ॥ वरकडसित्धझालेवानर ॥ निजग्रामासीजावया ७५
लक्ष्मणभरतशत्रुघ्न ॥ यांहींसुग्रीवबिभीषण ॥ वस्त्राभरणींगौरविलेपूर्ण ॥ सदनाअपुलेनेऊनियां ७६ कौसल्यासुमित्रेप्र
ती ॥ सुग्रीवबिभिषणआज्ञापुसती ॥ ह्मणेमाताहोआह्मावरीप्रीती ॥ असोंद्यावीबहुसाल ७७ कौसल्यासुमित्राबोलत ॥
बारेतुमचेउपकारअमित ॥ विजयीकरूनरघुनाथ ॥ माझामजभेटविला ७८अमूल्यअळंकारदेऊन ॥ गौरविलेतेदोघेजण ॥
मगसुग्रीवआणिबिभीषण ॥ कैकेयीसदनाचालिले ७९ तोंआडवायेऊनभरत ॥ तिकडेनजावेंजीह्मणत ॥ विपरीतकैकेयी
बोलतांचित्त ॥ खेदपावेलतुमचेंपैं १८० ऐसेंभरतेंबोलोन ॥ परतविलेसुग्रीवबिभीषण ॥ रघुनाथाजवळीयेऊन ॥ आज्ञामा
गतीजावया ८१ उभेराहिलेजोडूनिकर ॥ सर्वांचेअश्रुनेंभरलेनेत्र ॥ ह्मणतीराघवानिरंतर ॥ अह्मांसर्वथानविसरावें ८२
राघवातवनिकटींअसावें ॥ परिहेंप्राचीननाहींबरवें ॥ जरीउत्तममनींधरावें ॥ प्राक्तनवोढीभलतीकडे ८३ राघवाकायआ
ठवावेतवउपकारू ॥ जन्मवरीआह्मींनविसरूं ॥ तुझेंगोडबोलणेंअतिमधुरू ॥ हृदयींराघवाआठवतें ८४ स्फुंदस्फुंदोनि

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

दोघेजण ॥ बोलतीसुग्रीवबिभीषण ॥ मगह्मणेरघुनंदन ॥ तुमचेहृदयींवसेंमी ८५ मगउठोनियांरघुनाथ ॥ दोघांचेमस्त
कींठेवीहात ॥ त्यांहींसव्यघालोनिसीताकांत ॥ निघतेझालेतेकाळीं ८६ तयांसीबोळवीतरघुवीर ॥ गेलाअयोध्येबाहेर ॥
मगसर्ववानरींनमस्कार ॥ रघुनाथासीघातला ८७ बिभीषणसुग्रीवजांबुवंत ॥ नळनीळशरभवाळीसुत ॥ यांहींसाष्टांगन
मूनिरघुनाथ ॥ जातेझालेतेकाळीं ८८ दक्षिणपंथेंचालिलेत्वरित ॥ मागुतीमाघारेंपाहात ॥ तेथोनिनमस्कारघालित ॥ स
द्गदाचित्तींहोऊनियां ८९ मगपवनवेगेंकरून ॥ कपीअसुरनिघालेतेथून ॥ किष्किंधेसीसूर्यनंदन ॥ राहिलाकपीसमवेत९०
तेणेंबिभीषणगौरविला ॥ मगघेऊनिअसुरमेळा ॥ रावणानुजलंकेसीआला ॥ स्वस्थराहिलानिजस्थानीं ९१ इकडेअयो
ध्येसरघुनाथ ॥ बंधूसहितराज्यकरित ॥ पृथ्वीसंपूर्णआनंदभरित ॥ दुःखकिंचितअसेना ९२ अकरासहस्त्रवर्षेंवरी ॥ अयो
ध्यानाथराज्यकरी ॥ लोकसर्वधर्माधिकारी ॥ पापतिळभरीअसेना९३ हरीअवतारउदंडधरी ॥ परीबहुतसुखरामावतारीं ॥
अकरासहस्त्रवर्षवरी ॥ अक्षयराज्यचालविलें ९४जरामृत्युदुःखदरिद्र ॥ राज्यांतनाहींअणुमात्र ॥ सीतेसहितराजीवनेत्र ॥
ब्रह्मानंदेंवर्ततसे ९५ वसिष्ठविश्वामित्रअगस्ती ॥ आणिकऋषीजैसेगभस्ती ॥ अयोध्येमाजीसदांवसती ॥ जनकजापती
चेसमीप ९६ अगस्तीचेमुखेंश्रवण ॥ नित्यकरीरघुनंदन ॥ सदांतृप्तयाचकजन ॥ सर्वांसतृप्तीदर्शनें ॥ ९७ सुरसरामवि
जयग्रंथ ॥ उत्तरकांडकथाअद्भुत ॥ राज्यींबैसलाराजीवनेत्र ॥ यज्ञकार्यार्थपरिसापुढे ९८ रामविजयाचेंएकआवर्तन ॥
करीसंपूर्णपापाचेंदहन ॥ आणितृप्तीजेसंपूर्ण ॥ ग्रंथश्रवणेंहोयपैं ९९ अज्ञानासहोयज्ञान ॥ निपुत्रिकांसपुत्रसंतान ॥

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

भवरोगजायविरून ॥ भावेंकरूनपरिसतां २०० अयोध्याप्रवेशझालापूर्ण ॥ पुढेंरसाळकथागहन ॥ श्रवणकरोतपंडितजन ॥ राघवींमनसमर्पूनियां १ अयोध्यापुरवासियारामा ॥ ब्रह्मानंदकल्याणधामा ॥ श्रीधरवरदापूर्णकामा ॥ नामाअनामातीततूं २ स्वस्तिश्रीरामविजयग्रंथसुंदर ॥ संमतवाल्मिकीनाटकाधार ॥ सदापरिसोतभक्तचतुर ॥ षट्त्रिंशतिमोध्यायगोडहा २०३ श्रीकृष्णार्पणमस्तु श्रीसीतारामचंद्रार्पणमस्तु श्रीमज्जगदीश्वरार्पणमस्तु शुभंभवतु

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

36

॥ अथ ~~[illegible]~~ सप्तत्रिंशतितमोऽध्याय प्रारंभः ॥

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

श्रीगणेशायनमः ॥ श्रीसीतारामचंद्राभ्यांनमः॥ जयजयराघवाकरुणाकरा॥ अवनिजाकुळभूषणमनविहारा ॥ रावणानुज पालनासमरधीरा॥ मित्रपुत्राहितप्रिया १ प्रतापसूर्यवंशविवर्धना ॥ मयजामातकुलकाननच्छेदना॥ सकळवृंदारकबंधमो चना॥ आनंदकंदाअक्षया २ कौसल्याह्रदयारविंदभ्रमरा॥ भरतनयनपद्मदिवाकरा॥ सौमित्रप्राणआधारा॥ अतिउदारा अयोध्याप्रभू ३ पंडितींऐकावेंसावधान॥ छत्तिसावेअध्यायींजाण॥ राजाधिराजरघुनंदन॥ राज्यासनींबैसला ४ एकादशस हस्त्रवर्षें॥ निर्विघ्नराज्यपुराणपुरुषें॥ अयोध्येचेंकेलेंसंतोषें॥ विश्वसकळआनंदभरित ५ विदेहराजनंदिनी ॥ जगन्माताप्रण वरूपिणी॥ तेअयोध्यापतीचीराणी॥ झालीगर्भिणीपहिल्यानें ६ साहामासभरतांजाण॥ वोटीभरीरघुनंदन॥ तोसोहळाव र्णितांपूर्ण॥ भागेवदनशेषाचें ७ वसंतकाळींक्रीडावनांत॥ राघवप्रवेशलासीतेसहित॥ अत्यंतवनतेंशोभिवंत ॥ नंदनवना हूनियां ८ वृक्षफळेंपुष्पेंयुक्तसघन॥ माजीनदिसेसूर्यकिरण॥ तेथेंसीतेचीअंगुलीधरून॥ राजीवनयनविचारीतसे ९ नाना वृक्षांच्याज्याजाती॥ सीतेसदावीत्रिभुवनपती॥ एकांतपाहूनसीतेप्रती॥ राघवपुसेप्रीतीनें १० ह्मणेसकुमारेजनकबाळे॥ तुजकायहोतातीअंतरडोहळे॥ मनाआवडेतेंयावेळे॥ सांगसर्वहीपुरवीन ११ मगकिंचितहास्यवदन ॥ जानकीदेतप्रतिवच न॥ ह्मणेएकआवडेरघुनंदन॥ नलगेआनपदार्थ १२ राजीवाक्षह्मणेलाजसांडूनी॥ डोहळेसांगमनींह्मुनी॥ जेंह्मणसीतेंयेक्ष णीं॥ पुरवीनजाणराजसे १३ जनकजाबोलेयाउपरी॥ ह्मणेगंगेचीयेतीरीं॥ पवित्रऋषिपत्न्यामाझारीं॥ पंचरात्रीराहावें १४ घालोनियांतृणासन॥ करावेंभूमीवरीशयन॥ कंदमूळेंभक्षून॥ शुचिर्भूतअसावें १५ मनांतह्मणेरघुनंदन॥ पूर्वींवनवास

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

भोगिलेदारुण ॥ अजूनिनधायेचिमन ॥ आवडेकाननइयेतें १६ पुढीलभविष्यार्थजाणोन ॥ अवश्यह्मणेरघुनंदन ॥ मनकाम
नापूर्णकरीन ॥ तुझीजाणसकुमारे १७ याउपरीएकदांरघुवीर ॥ पुरीरक्षकजेहेर ॥ त्यांसीएकदांपुसेश्रीधर ॥ दृढभावेंनिर्धा
रें १८ तुह्मीनगरींहिंडतानिरंतर ॥ आकर्णिताजनवार्तासमग्र ॥ तरीतेंसांगावेंनिर्धार ॥ लोककायह्मणतीआह्मा १९ वंदिती
किंवानिंदिती ॥ यशकिंवाअपेशस्थापिती अभयअसेतुह्माप्रती ॥ सांगानिश्चितीकायतें २० हेरह्मणतीनगरांत ॥ राघवातुझे
सर्वभक्त ॥ सकळलोकपुण्यवंत ॥ यशवर्णितीसर्वदां २१ परीरजकएकदुर्जन ॥ तेणेंस्त्रीसकेलेंताडण ॥ त्यायोगेंतीस्त्रीरुसोन
पितृसदनाप्रतीगेली २२ माहेरींहोतीबहुदिन ॥ मगपित्यानेंहातींधरून ॥ जामातगृहाप्रतीनेऊन ॥ घालिताझालातेकाळीं
२३ मगतोरजकक्रोधायमान ॥ श्वशुराप्रतीबोलेवचन ॥ ह्मणेईसमाझेंसदन ॥ प्रवेशोंनेदींसर्वथा २४ मीतोरामनव्हेंनिर्धारीं॥
रावणेंनेलीत्याचीअंतुरी ॥ षण्मासहोतीअसुरघरीं ॥ तेणेंमाघारीआणिली २५ आह्मीरजकशुद्धसाचार ॥ जगाचेडागकाढ
णार ॥ आमुचेजातींतनिर्धार ॥ विपरीतऐसेंसोसेंना २६ हेंअनुचितकेलेंरघुनाथें ॥ मागुतीनांदवितोसीतेतें ॥ तैसामीनव्हेंयेथें
वदनइचेंनपाहेंची २७ ऐसाचांडाळतोरजक ॥ बोलेलाऊनकलंक ॥ ऐसेंऐकतांरघुनायक ॥ परमसंतप्तजाहला २८ पाचारू
नियांलक्ष्मण ॥ त्याससांगेसर्ववर्तमान ॥ ह्मणेरजकेंनिंदिलेंमजलागून ॥ जानकीत्यागींनसौमित्रा २९ दशमुखमारूनिसह
कुळीं ॥ सुवेळींआणिलीजनकबाळी ॥ विधिपुरंदरचंद्रमौळी ॥ देवमंडळीसर्वहोती ३० सकळांदेखतांतेवेळे ॥ जानकीनेंदिव्य
दीधलें ॥ अद्यापिरजकलंछनबोले ॥ तेंमजलासोसेना ३१ तनुत्यागीजैसाप्राण ॥ कोपटाकीरेणुकारमण ॥ कींसंसारसंक

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

ल्पतपोधन ॥ त्यागीजैसासाक्षेपें ३२ संसारभयतत्वता ॥ योगीटांकीजैसीममता ॥ तैसीचत्यागीनमीसीता ॥ सुमित्रासु
तासत्यहें ३३ शेषपृथ्वीसांडीपूर्ण ॥ कींमौनीत्यागीवाचाळपण ॥ सत्पुरुषमनांतुन ॥ परमनिंदात्यागीजैसा ३४ श्रोत्रि
यत्यागीदुष्टाचार ॥ तैसीसीतात्यागींनसाचार ॥ यावरीसुमित्राकुमर ॥ कायबोलताजाहाला ३५ पाखंडीदुष्टदुर्मती ॥ स
दांनिंदितीवेदश्रुती ॥ परीपंडितकायत्यागिती ॥ जनकजापतीसांगहें ३६ मुक्तांसनिंदितीवायस ॥ परीनटाकितीराजहं
स ॥ दर्दुरनिंदितिभ्रमरास ॥ परितोपद्मिणीसटाकीना ३७ निंदकनिंदितीसंतांस ॥ परिविवेकीपूजीरात्रदिवस ॥ तस्क
रनिंदितीइंदूस ॥ परिचकोरविटेना ३८ ऐशाकारणेंजनकजामाता ॥ सहसानत्यागींगुणसरिता ॥ त्यारजकाचीतत्वता ॥
जिव्हाआतांछेदीन ३९ श्रीरामह्मणेविशेष ॥ तरिलोकनिंदितीलरात्रदिवस ॥ ह्मणतीदंडिलेंरजकास ॥ आंगीदोषह्मणो
नियां ४० आतांसौमित्राहेंचिजाण ॥ सीताटाकींवनींनेऊन ॥ नाहींतरीआपुलाप्राण ॥ मीत्यागींनआतांची ४१ ऐसेंबो
लतांनिर्वाण ॥ तत्काळउठिलालक्ष्मण ॥ ब्राह्मींमुहूर्तींतेंव्हांसदन ॥ जानकीचेंप्रवेशला ४२ परमविव्हळहोऊन ॥ जगन्मा
तेचेवंदिलेचरण ॥ ह्मणेपहावयातापसारण्य ॥ आज्ञादीधलीरघुत्तमें ४३ ऐसेंऐकतांचिश्रवणीं ॥ मगबोलेत्रिभुवनपतीची
राणी ॥ मागेंबोलिलेचापपाणी ॥ ह्मणोनिपाठविलेंलक्ष्मणा ४४ तरीपंचरात्रक्रमोनिजाणा ॥ त्वरेनेंयेऊंपरतोनदर्शना ॥
ऐसेंबोलतांलक्ष्मणा ॥ मगआपणघेईउपचार ४५ ऐसेंसौमित्रेंऐकतांकर्णीं ॥ अश्रुसांडीनयनींहुनी ॥ मनींह्मणेआतांपर
तोनी ॥ कैंचेंयेणेंघडेल ४६ असोजानकीहर्षयुक्त ॥ वस्त्राभरणेंबहुत ॥ सौभाग्यद्रव्येंसवेंघेत ॥ ऋषिअंगनापूजावया ४७

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

मंगळभगिनीसौभाग्यसरिता ॥ रथींबैसलीक्षणनलागतां ॥ लक्ष्मणेंरथझांकूनतत्वतां ॥ धुरेसअपर्णबैसला ४८ कोणा
सचवार्तानकळत ॥ जान्हवीतीरासआणिलारथ ॥ तेव्हांअपशकुनबहुत ॥ जगन्मातेसीजाणविती ४९ आडवेमहाउरग
धांवती ॥ पतीवियोगपिंगळेवदती ॥ वायसवामभागेंजाती ॥ शोकसांगतीअत्यंत ५० ऐसेअपशकुनदेखतां ॥ मनींदचके
जनकदुहिता ॥ देवराप्रतीपुसेतत्वता ॥ चिन्हेंविपरीतकांदिसती ५१ तंवतोभोगेंद्रअवतार ॥ सहसानेदीप्रत्युत्तर ॥ नय
नींवाहतसेनीर ॥ कंठसद्गदितजाहला ५२ सीताह्मणेबंधूसहित॥सुखरूपअसोजनकजामात ॥ त्याचेंअशुभदुःखसमस्त॥
तेंमजवरीपडोकां ५३ मगह्मणेदेवरासुमती ॥ विलोकूंवनआणिभागीरथी ॥ सत्वरजाऊंअयोध्येप्रती॥ रघुपतीसपाहाव
या ५४ परितोनबोलेचीसर्वथा ॥ तटस्थपाहेरघुवीरकांता ॥ पुढेंनौकेमाजींजनकदुहिता ॥ रथासहितघातली ५५
सुरनदीउतरूनितेवेळीं ॥ सत्वरपैलपारानेली ॥ मागुतीरथभूमंडळीं ॥ पवनवेगेंचालविला ५६ परमभयंकरकानन ॥
नाहींमनुष्यांचेंदर्शन ॥ सिंहसर्पव्याघ्रपूर्ण ॥ वास्तव्यकरितीत्यास्थळीं ५७ ह्मणेजानकीसौमित्राप्रती ॥ येथेंऋषी
आश्रमकांनदिसती ॥ कोठेंअसेभागीरथी ॥ नेतानिश्चितींमजकोठें ५८ विप्रवेदघोषकानीं ॥ कांऐकूंनयेतीअजुनी ॥
स्वाहास्वधावषट्कारध्वनी ॥ शब्दवनींनउठती ५९ तोंगहनवनींनेऊनिरथ ॥ सौमित्रतृणसेजकरित ॥ जानकीसउतरू
नित्वरित ॥ बसविलीतयेठायीं ६० भूगर्भीचेंदिव्यरत्न ॥ वनिताचक्रांतमुख्यमंडण ॥ लावण्यभूमीचेंनिधान ॥ वनींलक्ष्म
णटाकित ६१ तेंसौंदर्यनभीचेंनक्षत्र ॥ कींत्रिभुवनींचेंकृपापात्र ॥ आंगींच्यातेजेंअपार॥ वनतेव्हांउजळलें ६२ चंद्रींवसे

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

सदांकळंक ॥ त्याहूनिसुंदरजानकीचेंमुख ॥ चपळेहूनिअधिक ॥ अळंकारशोभती ६३ असोतृणसेजेसीसीताबैसवून ॥ सौमित्रकरीसाष्टांगनमन ॥ खालतेंकरूनिवदन ॥ स्फुंदतउभाराहिला ६४ प्रदक्षिणाकरूनिलक्ष्मण ॥ पुढतीदृढधरीचरण देवराचेंशुभवचन ॥ तटस्थऐकेजानकी ६५ सौमित्रह्मणेजगन्माते ॥ तुजवनींसोडिलेंरघुनाथें ॥ त्याचीआज्ञाप्रमाणमातें॥ घेऊनिआलोंह्मणोनी ६६ रजकेंनिंदिलेंह्मणोनी ॥ तुजसांडिलेंघोरवनीं ॥ आतांरघुपतीचेचरणमनीं ॥ आठवीतराहेंसुखें ६७ कमळणीसकुमारअत्यंत ॥ तयेवरीवीजपडेअकस्मात ॥ मगपद्मिणीचाहोयअंत ॥ तेवीमूर्छितपडेसीता ६८ रुदनकरीसौमित्र ॥ रथारूढझालासत्वर ॥ तेथूनिपरतलाउन्मिळावर ॥ कठिणमनकरूनियां ६९ वनदेवतावृक्षपाषाण ॥ वारण उरगपंचानन ॥ तयांसीविनवीलक्ष्मण ॥ जानकीजतनकराहे ७० पृथिवीआपतेजसमीर ॥ अवघियानोजतनकरासकुमार ॥ असोपवनवेगेंसौमित्र ॥ अयोध्यापुरापावला ७१ इकडेसीतामूर्च्छनासांवरून ॥ उघडोनपाहेपद्मनयन ॥ तोंदुरीगेलालक्ष्मण ॥ उभीठाकूनहांकफोडी ७२ बाह्याउभारूनतत्वता ॥ ह्मणेपरतवेगेंसुमित्रासुता ॥ माझाअन्यायकाहींनसतां कांहोटाकूनजातांमज ७३ सत्वरमाझावधकरोनी ॥ सांगरघुपतीसजाउनी ॥ मीएकलीदुस्तरवनीं ॥ कवण्याठायींजाऊंआतां ७४ ह्मणेधांवधांवरघुनाथा ॥ ह्मणोनिहांकफोडीजगन्माता ॥ वनींश्वापदेंवृक्षलता ॥ त्यांसगहिवरदाटला ७५ थरथरांकांपतमेदिनी ॥ पर्वतपक्षीरडतीवनीं ॥ नृत्यकळाविसरोनी ॥ अतिशोककरिताती ७६ हंसमुक्ताहारसांडोनी ॥ सीतादेखतांरडतीवनीं ॥ गजव्याघ्रमूर्च्छनायेउनी ॥ दुःखेंकरूनपडताती ७७ पक्षीश्वापदेंतेवेळीं ॥ सीतेवरीकरितीसाउली ॥

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

जळचंचूभरूनितेकाळीं ॥ जनकजेवरीशिंपिती ७८ वनगाईपुच्छेंकरून ॥ सीतेवरीघालितीपवन ॥ वनदेवताकरितीरुद
न ॥ सीतादेवीदेखोनियां७९वनचरेंतयाकांतारीं ॥ दुःखाश्रुढाळितीनेत्रीं ॥ वैरभावटाकोनिदूरी ॥ विचरतीमहाशोकें ८०
हेरामाराजीवनेत्रा ॥ मजकांत्यागिलेंपवित्रा ॥ तूंदीनदयाळसरोजनेत्रा ॥ विसरलासीयेकाळीं ८१ कायअन्यायझालाम
जपासुनी ॥ मजटाकिलेंघोरवनीं ॥ कृपासागराचापपाणी ॥ श्रुतमजत्वांनकेलें ८२ जन्मोनिनेणेंदोषातें ॥ स्वप्नींनातळे
दुर्बुद्धीतें ॥ परीजन्मांतरींचेंनकळेमातें ॥ तेंकांठाकुनीआलेंभोगा ८३ तूंअनाथबंधूकरुणाकर ॥ मीदासीहीनपामर ॥ मा
झानकीजेअव्हेर ॥ सकळगणगोततूंमाझें ८४ अगायेश्रीदाशरथी ॥ माझीकरुणानुपजेचित्तीं ॥ कैसास्नेहसांडोनीरघुप
ती ॥ निष्ठुरझालासीमजवरी ८५ मीअज्ञानबाळभोळें ॥ सहजपुसलेंकृपाकल्होळें ॥ त्याचेंफळकींत्यागिलें ॥ महावनींनि
कटपैं ८६ आतांजाऊंकोणीकडे ॥ कवणवनींजिवलगसांपडे ॥ जेंमाझेंजन्मसांकडे ॥ निवारीलदर्शनीं ८७ रामातूंची
मायबाप ॥ बंधूगोत्रआचरणतप ॥ ममअपराधसंताप ॥ अभयदेमजआतां ८८ करुणासागररघुवीरा ॥ मातेंउद्धरींद
यासमुद्रा ॥ तुझेंध्यानअसंख्यमुद्रा ॥ चित्तींवसोमाझिया ८९ तंवअयोध्येसीलक्ष्मण ॥ पावलातेव्हांम्लानवदन ॥
तोगुणसिंधूरघुनंदन ॥ एकांतसदनींबैसलाअसे ९० तोंउन्मिळावरयेउनी ॥ शोकाश्रुआणिलेनयनीं ॥ रघुपतीचे
चरणवंदोनी ॥ बोलताझालातेधवां ९१ सौमित्रह्मणेरघुराया ॥ चित्रींच्यावृक्षछाया ॥ स्वप्नवतसंसारमाया ॥ लट
कीजैसीमुळींहूनी ९२ वानरांसागरलंघनदुस्तर ॥ परीअगस्तीपुढेंलघुसाचार ॥ आचमनेंएकेसमग्र ॥ रिताकेला

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

नवलहें ९३ असोइकडेजनकनंदिनी ॥ निघालीचालतदुःखेंवनीं ॥ मूर्च्छनायेऊनिक्षणक्षणीं ॥ अवनीवरीपडतसे
९४ मागुतीउठेहस्तटेंकुनी ॥ रुदनकरीधायमोकलूनी ॥ ह्मणेकोण्याठायाजाउनी ॥ राहूंआतांराघवेंद्रा ९५ मीअत्यं
तअन्यायीदीन ॥ जरीआतांचयेथेंदेऊप्राण ॥ तरीआत्महत्यायेतसेंपूर्ण ॥ दुसरीगर्भहत्यापडेल ९६ कळपांतूनयेनुचुक
ली ॥कींजीवनेंवीणमासोळी॥ कींहरणीवनींएकली॥ तळमळेजैसीकां ९७ कींनैषधरायाचीराणी ॥ पूर्वीपडिलीघोरवनीं ॥
कींभिल्लीविषेंभवानी ॥ एकलीकाननींजेविहिंडे ९८ एकमार्गनदिसेतेथ ॥ सव्यअपसव्यवनींहिंडत॥ दीर्घस्वरेंकरूनिरड
त ॥ तोंनवलवर्तलें ९९ तेथेंकंदमूळेंन्यावयासी ॥ वनाआलेवाल्मिकऋषी ॥ जोत्रिकाळज्ञानीतिजोराशी ॥ ज्याचेज्ञानासी
सीमानाहीं १०० अवताराआदिजन्मचरित्र ॥ कथनकेलेंजेणेंपवित्र ॥ तेणेंजगन्मातेचाशोकस्वर॥ कर्णीऐकिलाहिंडतां १०१
सीतादेखिलीदुरोनी ॥ जवळीआलावाल्मिकमुनी ॥ ह्मणेकोणतूंयेवनीं ॥ प्रगटलीसयेणेंरूपें २ ह्मणेकोणहेंशुभकल्या
णी ॥ कींमूळपुरुषस्वामिणी ॥ कींअनादिपीठनिवासिनी ॥ दर्शनद्यावयाप्रकटलीहे ३ मगह्मणेजवळीयेऊन ॥ सांगमा
तेआहेसतूंकोण ॥ कांसेविलेंघोरवन ॥ कोणेदुःखेंकरूनियां ४ मगबोलेजगन्माता ॥ मिथिलेश्वराचीमीदुहिता ॥ रावणां
तकाचीअसेंकांता ॥ सौमित्रेंसोडिलेंयेवनीं ५ अन्यायनसतांकिंचित ॥ टाकिलेंघोरअरण्यांत ॥ परदेसीआहेंवनांत ॥ तरी
माझातातकेवळतूं ६ मगऋषीह्मणेवोजननी ॥ माझेनामवाल्मिकमुनी ॥ अयोध्यानायककोदंडपाणी ॥ मजबरवेंजाणतसे
७ त्याचेंभाष्यकरींनिरंतर ॥ मजजाणतसेमिथिलेश्वर॥ तुझापिताआमचामित्र ॥ कन्यासाचारतूंमाझी ८ तुजहोतीलदोनपु

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

त्र ॥ पित्याहूनपराक्रमीथोर ॥ तुजघातलेंजेंबाहेर ॥ त्याचासूडघेतीलते ९ मगजानकीसहातींधरून ॥ गेलाआश्रमाघेऊन
भोंवतेमिळालेऋषिजन ॥ कायवचनबोलिलेते १० ह्मणतीहेकोणआहेताता ॥ येरूह्मणेजानकीजगन्माता ॥ ऋषीह्मणती
अनर्थतत्वता ॥ घराआणिलासाक्षेपें ११ आह्मीअत्यंतभोळेब्राह्मण ॥ टाकोनिग्रामकुटिळजन ॥ वसविलेंघोरकानन ॥ ये
थेंहीविघ्नआणिलें १२ इचेंसुंदरपणअत्यंत ॥ इजवरीअपवादआलेबहुत ॥ इचेपायींआमुचाघात ॥ होईलअनर्थएकदां १३
एकह्मणतीसीतासती ॥ जरिहेअसेलनिश्चिती ॥ तरीयेथेंभागीरथी ॥ अकस्मातदावील १४ हेंजरीनव्हेइचेनी ॥ तरीदव
डावीयेक्षणीं ॥ ऐसेंऐकतांजनकनंदिनी ॥ भागीरथीसप्रार्थित १५ ह्मणेसगरकुलतारकमाये ॥ हरिचरणोद्भवजन्हुतनये॥
ब्रह्मकटाहफोडूनिस्वयें ॥ प्रकटहोसीअद्भुत १६ कमळोद्भवकमळावर ॥ शिवइंद्रादिसकळनिर्जर ॥ सत्यवतीसुतसनत्कु
मार ॥ निरंतरतुजस्तवीती १७ तुझेंअणुमात्रस्पर्शतांनीर भस्महोतीपापेंआपार ॥ शुभ्रसुमनाचादिव्यहार ॥ मुकुटशुभ्र
स्वच्छदिसे १८ हिमनगभेदोनिसाचार ॥ एकसरेंभरलासागर ॥ तरीमजकारणेंवेगवक्र ॥ जननीधांवयापंथें १९ तो
यामाजीबुडतीपर्वत ॥ ऐसावोघलोटलाअद्भुत ॥ ऋषीझालेभयाभीत ॥ पळतीआश्रमटाकुनी २० मगऋषीसीतेसकरिती
नमन ॥ मातेआमुचेआश्रमजातीबुडोन ॥ आह्मासिरक्षावयातुजविण ॥ जगज्जननीकोणीदिसेना २१ मगसीतेनेंप्रार्थूनि
तेवेळां ॥ वोघनिश्चळचालविला ॥ सत्यसतीजनकबाळा ॥ ऋषीगर्जतीसर्वही २२ सकळऋषीमिळोन ॥ करितीजानकी
चेंस्तवन ॥ ह्मणतीमातेतुजछळून ॥ जवळीआणिलीभागीरथी २३ असोआपलेआश्रमासी ॥ वाल्मिकेंठेविलीसीतेसी ॥ ४

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

हेंवर्तमानकोणासी ॥ बाह्यप्रकटनव्हेपैं २४ नवमासभरतांपूर्ण ॥ शुभनक्षत्रशुभदिन ॥ माध्यान्हींआलाचंडकिरण ॥ तों
प्रसूतजाहलीजानकी २५ वृध्दऋषिपत्न्याधांवोनी ॥ जवळीआल्यातयेक्षणीं ॥ तोंदोघेपुत्रदेखिलेनयनीं ॥ शशिसूर्यज्या
परी २६ प्रथमउपजेतोधाकुटाबाळ ॥ मागुतींउपजेतोंवडील ॥ असोदोघेजन्मलेबाळ ॥ सांवळेजावळेतेक्षणीं २७ वा
ल्मिकगेलेहोतेस्नानासी ॥ शिष्यधांवतगेलेतयांपासी ॥ दोघेपुत्रजानकीसी ॥ झालेह्मणूनसांगत २८ ऐसेंऐकतांवचन॥
येरेंकुशलहूहातींघेऊन ॥ जानकीजवळीयेऊन ॥ केलेंविधानशास्त्रविधी २९ कुशेंकरूनअभिषेकीबाळ ॥ त्याचेंनावठेवि
लेंकुशनिर्मळ ॥ आकर्णनेत्रघननीळ ॥ प्रतिमाकेवळरामाची ३० लवावरीनिजवूनी ॥ अभिषेकिलामंत्रेंकरूनी ॥ तयाना
मलहूठेउनी ॥ सोहळाकेलावाल्मिकें ३१ शुक्लपक्षींवाढेचंद्र ॥ कींपळपळावाढेदिनकर ॥ तेविदोघेराघवेयसत्वर ॥ वाढूं
लागलेतेसमयीं ३२ दोघांचेंहीपालन ॥ वाल्मिककरीअनुदिन ॥ ऋषिबाळांतदोघेजण॥ क्रीडाकरितीनिरंतर ३३ सप्तसं
वत्सरहोतांपूर्ण ॥ वाल्मीकयोजीमौजीबंधन ॥ तेसमयींसुरभीआणोन ॥ ऋषीसर्वमेळविले ३४ चारदिवसपर्यंत ॥ जो
जोपाहिजेपदार्थ ॥ सर्वहीकामधेनुपुरवित ॥ झालेतृप्तअवघेऋषी ३५ बाळसुंदरदेखोन ॥ बहूऋषीदेंतीवरदान ॥ वाल्मीकें
वेदाध्ययन ॥ दोघांकडूनकरविलें ३६ षट्शास्त्रींप्रवीणझाले ॥ सकळपुराणेंकरतळामलें ॥ मगरामचरित्रपुढेंठेविलें ॥ श
तकोटीग्रंथकेलाजो ३७ बाळांचेंज्ञानअत्यद्भुत ॥ अधिकाधिकतर्कफुटत ॥ मगमंत्रशास्त्रसमस्त ॥ वाल्मिकमुनीसांगतसे
३८ मगधनुर्वेदपढवून ॥ हातीदेतधनुष्यबाण ॥ युध्दगतींसांगेपूर्ण ॥ तेदोघेधरितीमनीं ३९ ॥ असोचतुर्दशविद्याचौस

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

रा०वि० ष्टीकळा ॥ वाल्मीकशिकवीदोघांबाळां॥ ऋषिपुत्रांचासवेंमेळा॥ घेऊनिदोघेहिंडती १४० नानागोष्ठीकौतुकेंबोलोन ॥ रं अ० ३७
५ जवितीजानकीचेंमन ॥ कंदमुळेंआणुन ॥ जगन्मातेपुढेंठेविती ४१ सत्समागमेंदेख ॥ प्राणीविसरेसंसारदुःख ॥ तैसेंजान
कीविसरेसकळिक ॥ खेदमागीलआपुले ४२ दशवर्षेंहोतांपूर्ण ॥ मृगयेसजातीदोघेजण ॥ नानाश्वापदेंमारून॥ आणिती
वोढूनदाखवावया ४३ एकेदिवसींवनींहिंडत ॥ तोंपर्वतमस्तकींध्यानस्थ ॥ एकशृंगीतपकरित ॥ वाल्मीकाचाबंधूतो ४४
तोंमृगवेषदेखोनिपूर्ण ॥ कुशेंवधिलाटाकूनबाण ॥ त्याचातत्काळगेलाप्राण ॥ प्रेतवोढूनदोघेनेती ४५ वाल्मीकपुसेजव
ळीयेऊन ॥ तेंकायआणितावोढून ॥ येरूह्मणतीमृगवधून ॥ आणिलातुह्माकारणें ४६ त्याचेंआतांचर्मकाढून ॥ करूंतुह्मा
कारणेंआसन ॥ वाल्मीकपाहेविलोकून॥ तंवबंधूवधियेला ४७ वाल्मिकह्मणेहेदोघेजण ॥ अनिवारझालेपूर्ण ॥ ब्रह्महत्या
करून ॥ कैसेंआलांवनांतरीं ४८ बंधूचेंउत्तरकार्यसकळिक ॥ विधियुक्तकरीवाल्मिक॥ जानकीजवळतत्काळिक ॥ वर्तमा
नसांगीतलें ४९ तवबोलेजानकीहांसोन ॥ तातासूर्यवंशअतितीक्ष्ण ॥ त्यावरीसकळकळाप्रवीण ॥ तुह्मीचकेलींबाळकें ॥
१५० परमधीटअनिवार ॥ तुमचातुह्माफळलामंत्र ॥ आतांयादोषासपरिहार ॥ करावाजीअविलंबें ५१ वाल्मीकबोलेव
चन ॥ ब्रह्मकमळेंआणून ॥ भावेंअर्चावाउमारमण ॥ तरीनिवारेंब्रह्महत्या ५२ तंवतेदोघेबोलिले ॥ तातकोठेंतींब्रह्मकम
ळें ॥ तींसांगावींयेवेळे ॥ घेऊनयेऊंतत्काळ ५३ मगबोलेमुनीश्वर ॥ अयोध्येसमीपब्रह्मसरोवर ॥ परीतींरक्षावयाअपार॥ ५
वीरअसतीरामाचे ५४ तींकमळेंनेऊन ॥ राघवकरितोशिवार्चन ॥ महाबळवंतरक्षितीपूर्ण ॥ रात्रदिवससभोंवते ५५ गद

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

गदांहांसतीदोघेजण ॥ कमळेंआणूंनलागतांक्षण ॥ तरींचतुमचेशिष्यजाण ॥ निश्चयेंसीऋषिवर्या ५६ तेथेंकृतांतअसेल
रक्षण ॥ त्यासहीशिक्षालाऊंपूर्ण ॥ निश्चयेंजरीआलारघुनंदन ॥ त्यासहीधरूनआणूंयेथें ५७ धनुष्यासीलाऊनिबाण ॥
चपळचालिलेदोघेजण ॥ जैसेसिंहदिसतीलाहान ॥ परीप्रतापआगळा ५८ कींशशिसूर्यलघूदिसती ॥ परीप्रकाशेंउजळे
क्षिती ॥ लाहानदिसेविप्रअगस्ती ॥ परिअपांपतीशोषिला ५९ तैसेतेधाकुटेवीर ॥ वेगेंपावलेब्रह्मसरोवर ॥ कुशेंप्रवेशोनि
समग्र ॥ कमळेंतेव्हांतोडिलीं १६० तंवतेवीरखवळले ॥ लहूनेंतेव्हांशरसोडिले ॥ रक्षकसर्वसंहारिले ॥ उरलेगेलेअयो
ध्ये ६१ रामासीसांगतीवर्तमान ॥ ऋषिबाळआलेदोघेजण ॥ त्याहींयुत्धकरूनिजाण ॥ कमळेंत्याणींसर्वनेलीं ६२ आश्च
र्यकरीरघुपती ॥ केवढीबाळांचीशक्ती ॥ असोइकडेदोघेनिघती ॥ कमळेंघेऊनित्वरेनें ६३ वाल्मिकापुढेंकमळेंठेविती ॥ ऋ
षिआश्चर्यकरीचित्तीं ॥ तटस्थपाहेसीतासती ॥ अद्भुतकर्तव्यबाळकांचें ६४ मगनूतनशिवलिंगनिर्मून ॥ सहस्त्रकमळेंकेलेंपू
जन ॥ ब्रह्महत्येचेंपापपूर्ण ॥ निरसोनिगेलेंतेधवां ६५ एकेदिवसींदोघेजण ॥ चुरीतजानकीचेचरण ॥ तंवतोकुशवचन ॥ बो
लतसेतेकाळीं ६६ आह्मीजन्मलोंकोणेदेशीं ॥ कोणग्रामकोणवंशीं ॥ आमुचापितानिश्चयेसीं ॥ सांगकोणअंबेतूं ६७ सीता
ह्मणेअयोध्यानगर ॥ सूर्यवंशींअजपुत्र ॥ दशरथनामेंनृपवर ॥ प्रचंडप्रतापजयाचा ६८ त्याचेरामलक्ष्मणभरत ॥ चौथाशत्रु
घ्नविख्यात ॥ त्यांतरावणांतकप्रतापवंत ॥ तुमचापिताजाणिजे ६९ रजकेंनिंदिलेंह्मणोनी ॥ बारेमजसोडिलेंवनीं ॥ तेव्हां
जगन्मातेचेनयनीं ॥ अश्रुआलेबोलतां १७० वर्तमानऐकोनिसमस्त ॥ दोघेहीझालेपरमतप्त ॥ मगसीतेचेंसमाधानव

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

ष्टीकळा ॥ वाल्मीकशिकवीदोघांबाळां ॥ ऋषिपुत्रांचासवेंमेळा ॥ घेऊनिदोघेहिंडतीं १४० नानागोष्टीकौतुकेंबोलोन ॥ रं
जवितीजानकीचेंमन ॥ कंदमुळेंआणुन ॥ जगन्मातेपुढेंठेविती ४१ सत्समागमेंदेख ॥ प्राणीविसरेसंसारदुःख ॥ तैसेंजान
कीविसरेसकळिक ॥ खेदमागीलआपुले ४२ दशवर्षेंहोतांपूर्ण ॥ मृगयेसजातीदोघेजण ॥ नानाश्वापदेंमारून ॥ आणिती
वोढूनदाखववावया ४३ एकेदिवसींवनींहिंडत ॥ तोंपर्वतमस्तकींध्यानस्थ ॥ एकशृंगीतपकरित ॥ वाल्मीकाचाबंधूतो ४४
तोंमृगवेषदेखोनिपूर्ण ॥ कुशेंवधिलाटाकूनबाण ॥ त्याचातत्काळगेलाप्राण ॥ प्रेतवोढूनदोघेनेती ४५ वाल्मीकपुसेजव
ळीयेऊन ॥ तेंकायआणितावोढून ॥ येरूह्मणतीमृगवधून ॥ आणिलातुह्माकारणें ४६ त्याचेंआतांचर्मकाढून ॥ करूंतुह्मा
कारणेंआसन ॥ वाल्मीकपाहेविलोकून ॥ तंवबंधूवधियेला ४७ वाल्मिकह्मणेहेदोघेजण ॥ अनिवारझालेपूर्ण ॥ ब्रह्महत्या
करून ॥ कैसेंआलांवनांतरीं ४८ बंधूचेंउत्तरकार्यसकळिक ॥ विधियुक्तकरीवाल्मिक ॥ जानकीजवळतत्काळिक ॥ वर्तमा
नसांगीतलें ४९ तवबोलेजानकीहांसोन ॥ तातासूर्यवंशअतितीक्ष्ण ॥ त्यावरीसकळकळाप्रवीण ॥ तुह्मीचकेलींबाळकें ॥
१५० परमधीटअनिवार ॥ तुमचातुह्माफळलामंत्र ॥ आतांयादोषासपरिहार ॥ करावाजीअविलंबें ५१ वाल्मीकबोलेव
चन ॥ ब्रह्मकमळेंआणून ॥ भावेंअर्चावाउमारमण ॥ तरीनिवारेंब्रह्महत्या ५२ तंवतेदोघेबोलिले ॥ तातकोठेंतींब्रह्मकम
ळें ॥ तींसांगावींयेवेळे ॥ घेऊनयेऊंतत्काळ ५३ मगबोलेमुनीश्वर ॥ अयोध्येसमीपब्रह्मसरोवर ॥ परीतींरक्षावयाअपार ॥ ५
वीरअसतीरामाचे ५४ तींकमळेंनेऊन ॥ राघवकरितोशिवार्चन ॥ महाबळवंतरक्षितीपूर्ण ॥ रात्रदिवससभोंवते ५५ गद

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

गदांहांसतीदोघेजण ॥ कमळेंआणूंनलागतांक्षण ॥ तरींचतुमचेशिष्यजाण ॥ निश्चयेंसीऋषिवर्या ५६ तेथेंकृतांतअसेल
रक्षण ॥ त्यासहीशिक्षालाऊंपूर्ण ॥ निश्चयेंजरीआलारघुनंदन ॥ त्यासहीधरूनआणूंयेथें ५७ धनुष्यासीलाऊनिबाण ॥
चपळचालिलेदोघेजण ॥ जैसेसिंहदिसतीलाहान ॥ परीप्रतापआगळा ५८ कींशशिसूर्यलघूदिसती ॥ परीप्रकाशेंउजळे
क्षिती ॥ लाहानदिसेविप्रअगस्ती ॥ परिअपांपतीशोषिला ५९ तैसेतेधाकुटेवीर ॥ वेगेंपावलेब्रह्मसरोवर ॥ कुशेंप्रवेशोनि
समग्र ॥ कमळेंतेव्हांतोडिलीं १६० तंवतेवीरखवळले ॥ लहूनेंतेव्हांशरसोडिले ॥ रक्षकसर्वसंहारिले ॥ उरलेगेलेअयो
ध्ये ६१ रामासीसांगतीवर्तमान ॥ ऋषिबाळआलेदोघेजण ॥ त्याहींयुत्धकरूनिजाण ॥ कमळेंत्याणींसर्वनेलीं ६२ आश्च
र्यकरीरघुपती ॥ केवढीबाळांचीशक्ती ॥ असोइकडेदोघेनिघती ॥ कमळेंघेऊनित्वरेनें ६३ वाल्मिकापुढेंकमळेंठेविती ॥ ऋ
षिआश्चर्यकरीचित्तीं ॥ तटस्थपाहेसीतासती ॥ अद्भुतकर्तव्यबाळकांचें ६४ मगनूतनशिवलिंगनिर्मून ॥ सहस्त्रकमळेंकेलेंपू
जन ॥ ब्रह्महत्येचेंपापपूर्ण ॥ निरसोनिगेलेतेधवां ६५ एकेदिवसींदोघेजण ॥ चुरीतजानकीचेचरण ॥ तंवतोकुशवचन ॥ बो
लतसेतेकाळीं ६६ आह्मीजन्मलोंकोणेदेशीं ॥ कोणग्रामकोणवंशीं ॥ आमुचापितानिश्चयेसीं ॥ सांगकोणअंबेतूं ६७ सीता
ह्मणेअयोध्यानगर ॥ सूर्यवंशींअजपुत्र ॥ दशरथनामेंनृपवर ॥ प्रचंडप्रतापजयाचा ६८ त्याचेरामलक्ष्मणभरत ॥ चौथाशत्रु
घ्नविख्यात ॥ त्यांतरावणांतकप्रतापवंत ॥ तुमचापिताजाणिजे ६९ रजकेंनिंदिलेंह्मणोनी ॥ बारेमजसोडिलेंवनीं ॥ तेंव्हां
जगन्मातेचेनयनीं ॥ अश्रुआलेबोलतां १७० वर्तमानऐकोनिसमस्त ॥ दोघेहीझालेपरमतप्त ॥ मगसीतेचेंसमाधानब

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

द्भुत ॥ करितेझालेतेधवां १७१ तोंद्वादशवर्षेंपर्यंत ॥ अवर्षणपडिलेंअयोध्येंत ॥ सीताक्षोभलीबहुत्त ॥ श्रीसमस्तगेली
पैं १७२ जैसेंकांदग्धकांतार ॥ तैसेंकळाहीननगर ॥ घननवर्षेंचअणुमात्र ॥ गाईविप्रगांजले १७३ वसिष्ठासपुसे
रघुनंदन ॥ कांहोपडिलेंअवर्षण ॥ येरूह्मणेअपराधाविण ॥ सीताबाहेरघातली १७४ जानकीऐसेंचिद्रत्न ॥ सक
ळपतिव्रतामंडण ॥ लक्ष्मीगेलीनिघोन ॥ अवर्षणतरीचपडलें १७५ तरीअश्वमेधमहायज्ञ ॥ राघवाकरावासंपूर्ण ॥
घोडापाहूनिश्यामकर्ण ॥ पृथ्वीवरीसोडावा ७६ मगशरयूतीरींएकयोजन ॥ मंडपघातलाविस्तीर्ण ॥ दूतपाठवूनसंपूर्ण ॥
मुनेश्वरमेळविले ७७ बिभीषणआणिसुग्रीवास ॥ बोलावूंपाठवीराघवेश ॥ तेदळासहितअयोध्येस ॥ येतेझालेतेकाळीं
७८ नळनीळअंगदजांबुवंत ॥ शरभगवाक्षबळअद्भुत ॥ वानरपातलेसमस्त ॥ अष्टादशपद्मेंही ७९ सर्वसामग्रीकेलीपूर्ण
मगवसिष्ठरघुनंदन ॥ अश्वशाळेंतूनिश्यामकर्ण ॥ निवडिलापूर्णसुलक्षणी १८० सुवर्णपत्रिकातेकाळीं ॥ बांधिलीश्यामकर्णा
चेभाळीं ॥ वसिष्ठेंत्यावरीलिहिल्यावोळी ॥ ऐकासकळश्रोतेहो ८१ अयोध्याप्रभूदशरथनंदन ॥ रावणांतकजगन्मोहन ॥
सकळनृपरविकुळमंडण ॥ श्यामकर्णसोडिलातेणें ८२ जोकोणीअसेलबळिवंत ॥ तेणेंहाघोडाधरावायथार्थ ॥ षोडशपद्में
दळासहित ॥ शत्रुघ्नरक्षीपाठीसीं ८३ घोडापूजोनिराजीवनेत्र ॥ मस्तकींबांधिलेंदिव्यपत्र ॥ शत्रुघ्नेंकरूनीनमस्कार ॥ द
ळभारेंसीनिघाला ८४ शत्रुघ्नासीह्मणेरघुनंदन ॥ सोळावेदिवसींयावेंपरतोन ॥ सकळपृथ्वीजिंकोन ॥ नृपसांगातीआणि ६
जे ८५ मगसुवर्णप्रतिमासुंदर ॥ जानकीचीनिर्मिलीपरिकर ॥ मगतेप्रतिमेसहितरघुवीर ॥ यज्ञदीक्षाघेतपैं ८६ जैसाकिर

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

णचक्रांतदिवाकर ॥ कींनिर्जरांतअमरेश्वर ॥ तैसायज्ञमंडपींरघुवीर ॥ ऋषींसहशोभला ८७ सुग्रीवबिभीषणमारुती ॥
यज्ञभं‍ऽपाभोंवतेरक्षिती ॥ सुमंतभरतउन्मिळापती ॥ सदांतिष्ठतराघवापासीं ८८ आतांसामग्रीलागेलपूर्ण ॥ तेतत्काळदे
तीआणून ॥ तोसोहळादेवगण ॥ विमानींबैसोनपाहती ८९ इकडेछप्पन्नदेशजिंकितपूर्ण ॥ जातमहावीरशत्रुघ्न ॥ सकळरा
जेयेतीशरण ॥ करभारदेऊनिसांगातें १९० तेचकाळींपाताळींवरुण ॥ आरंभिताझालामहायज्ञ ॥ तेणेंवाल्मीकबोलावून
नेलाहोताआधींच ९१ पाताळासगेलाजेंव्हांऋषी ॥ तेणेंआज्ञाकेलीलहुवासी ॥ बारेमाझियाउपवनासी ॥ रक्षावेंत्वांनिरंतर
९२ ऐसेंबोलूनिपाताळीं वाल्मिकगेलेतयेवेळीं ॥ कुशप्रवेशलावनांतरीं ॥ कंदमूळेंआणावया ९३ लहूउपवनरक्षित ॥ स
वेंअसतींबाळेंबहुत ॥ नानाक्रीडाविनोदकरित ॥ वृक्षच्छायेसबैसले ९४ अष्टवर्षीदशवर्षीतेकुमर ॥ कटीकोपीनमौंजीसुं
दर ॥ मस्तकींशिखापरिकर ॥ खेळतांउडेसाजिरी ९५ तोंश्यामकर्णधांवत ॥ आलात्याचपंथेंअकस्मात ॥ ऋषिपुत्रांसल
हुदावित ॥ पाहारेयेतोअश्वकैसा ९६ मगसीतासुतेंधांवून ॥ शीर्षींधरिलाश्यामकर्ण ॥ कपाळींचेंपत्रतोडून ॥ वाचीतसेते
काळीं ९७ पत्रार्थपाहूनिसमस्त ॥ लहूगदगदांहांसत ॥ बळियाकायरघुनाथ ॥ त्रिभुवनींथोरजाहला ९८ कायत्यासच
व्यालीजननी ॥ कायनिर्वीरझालीअवनी ॥ तरींकैसाअश्वसोडोनी ॥ नेईलपुरुषार्थेंपाहूंपां ९९ माझीप्रतिज्ञाहेचआ
तां ॥ धरिलाअश्वनसोडींमागुता ॥ तरींचसीतेउदरींतत्वता ॥ जन्मघेऊनसार्थक २०० अश्वाचेनेत्रपुसोन ॥ कौतुकेंकरून
थापटीमान ॥ उत्तरीवस्त्रगळांघालून ॥ बांधीनेऊनकर्दळी १ ऋषिपुत्रांसलहूह्मणत ॥ पाहारेघोडाकैसानाचत ॥ तोंऋषि

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

बाळसमस्त ॥ भयेंपोटबडविती २ कोण्यारायाचाघोडाआला ॥ तोतुवांबळेंचिधरिला ॥ तरीआह्मींसांगूतयाला ॥ लहुवें
बांधिलाह्मणोनी ३ लहूतयांप्रतीबोलत ॥ आमचीचनिश्चयेंहेवस्त ॥ आपुलीआपणघेतांसत्य ॥ शंकायेथेंकायसी ४ लहु
बोलेशिक्षाकरूनियां ॥ लयापाववीनसर्वक्षत्रियां ॥ तोंवीरआलेधाऊनियां ॥ अश्वरक्षकपुढीलजे ५ विप्रकुमरदेखोन ॥
वीरपुसतीदटावून ॥ कोणेंरेहाश्यामकर्ण ॥ कर्दळीसबांधिला ६ लेंकरेंबोलतीभिऊन ॥ हापैलकिशोरआकर्णनयन ॥ ये
णेंचबांधिलाआणून ॥ त्याचेंकारणत्यापुसा ७ रामविजयग्रंथपावन ॥ त्यामाजीलहुकुशआख्यान ॥ कथागोडअमृताहु
न ॥ भक्तचतुरींपरिसावी ८ ब्रह्मानंदश्रीधरवर ॥ जानकीहृदयकमळभ्रमर ॥ अगाधतयाचेंचरित्र ॥ सविस्तारशतको
टी ॥ ९ ॥ स्वस्तिश्रीरामविजयग्रंथसुंदर ॥ संमतवाल्मिकीनाटकाधार ॥ सदांपरिसोंतभक्तचतुर ॥ सप्तत्रिंशतिमोध्याय
गोडहा ॥ २१० ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ श्रीसीतारामचंद्रार्पणमस्तु ॥ छ ॥

॥ इति सप्तत्रिंशोऽध्यायः समाप्तः ॥

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

॥अथ अष्टत्रिंशाध्याय प्रारंभः॥

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

श्रीगणेशायनमः ॥ श्रीसीतारामचंद्राभ्यांनमः॥ हातींघेऊनिचापशर ॥ उभामंळभगिनीकुमर ॥ तोंमागूनिचतुरंगदळभार॥
अतीगजरेंपातला १ सर्वेसकळपृथ्वीचेनृपवर ॥ मध्येंशत्रुघ्नप्रचंडवीर ॥ तंवमातऐकेलीसत्वर ॥ घोडाधरिलाह्मणोनियां
२ भूसंकेतदावीशत्रुघ्न ॥ तंवलोटलेंअपारसैन्य ॥ तेव्हांकर्दळीसश्यामकर्ण ॥ वस्त्रेंकरूनबांधिलाअसे ३ तेथेंऋषींचींबाळें
खेळतीं ॥ त्यांप्रतीतेवीरपुसती॥ वारूकोणीबांधिलाह्मणती ॥लेंकुरेंबोलतीभिऊनियां ४ कानावरीहातठेविती॥ आह्मींधरि
लानाहींह्मणती ॥ पैलदिसेधनुष्यहातीं ॥ कलागतीकरितोतो ५ लेणेंबांधिलाश्यामकर्ण ॥ तोंवीरबोलतीहांसोन ॥ ह्मणती
हेंबालकलाहान ॥ घोडाबांधिलाकौतुकें ६ सोडारेआताश्यामकर्ण ॥ जवळउरलेंअयोध्यापट्टण॥ वाटपाहातसेरघुनंदन ॥
सत्वरचलावेगेंसी ७ सोडावयापातलेवीर ॥ तोंबोलेजानकीकुमर ॥ कोणरेतुह्मींतस्कर ॥ घोडासोडूंपातलां ८ घोडाध
रिलातोचमीयेथ ॥ उभालक्षीतयुद्धपंथ ॥ तुमचाकोणआहेरेरघुनाथ ॥ त्यासीजाऊनसांगावें ९ मजह्मणतातुह्मीबाळ ॥ प
रीमीआहेंसर्वांचाकाळ ॥ तुमचींगर्वकवचेंसकळ ॥ फोडीनआजसमरंगणीं १० तटस्थपाहातीसकळवीर ॥ ह्मणतीहाबा
ळसकुमार ॥ लीलाचापघेऊनिपरिकर ॥ धीटगोष्टीबोलतो ११ यावरीशस्त्रधरितांनिश्चितीं ॥ सकळयोद्धेआह्माहांसती ॥
तुह्मीवारूसोडूनसत्वरगती ॥ पुढेंचलासत्वर १२ घोडासोडूंधांवलेवीर ॥ लहूचापवोढीसत्वर ॥ शतांचेशतसोडूनिशर ॥
तोडिलेकरतितुक्यांचे १३ जैसींवटपत्रेंतुटोनिपडती ॥ तैसींमणगटेंपडलीक्षिती ॥ तोंमागुतीवीरधांवती ॥ घेघेशब्देंकरू
नियां १४ खड्गासहभुजदंड॥ लहूवेंपाडिलेउदंड जैसेशाखारहिततरूप्रचंड ॥ तैसेवीरउभेतेथें १५ झालाएकचिहाहाकार

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

सेनालोटलीतेव्हांआपार ॥ लक्षांचेलक्षवीर ॥ धांवतेझालेतेकाळीं १६ जैसाधारावर्षेजलधर ॥ तैसाशरवर्षेंभूमिजाकुमर ॥
शिरांच्याराशीअपार ॥ पाडिल्यातेव्हांपुरुषार्थें १७ दुरोनिपाहातीवीरसकळ ॥ बारावर्षींचादिसेबाळ ॥ परीप्रचंडवीर
समोर ॥ उभाठाकूंनशंकेची १८ एकह्मणतीसमर्थ ॥ याचागुरूयथार्थ ॥ तरीचएवढेंसामर्थ्य ॥ कोणासहीनाटोपेहा १९ सो
ळापद्मेंदळभार ॥ एकदांचउठावलेसमग्र ॥ परीत्यावीराचेंसंधानथोर ॥ खिळिलेंतत्काळसर्वांसी २० मयूरपिच्छेंपसर
ती ॥ तैसेवीरसकळदिसती ॥ मगहांकदेऊनिमहारथी ॥ शत्रुघ्नपुढेंलोटला २१ गजकलेवरेंपडलींसधट ॥ रथचाला
वयानाहींवाट ॥ वीरपडिलेमहासुभट ॥ नाम्मांकितपुरुषार्थी २२ सकळपडलेमागेंटाकून ॥ पुढेंधावलाशत्रुघ्न ॥ बाळपाहे
विलोकून ॥ तंवरघुनंदनदुसरापैं २३ ह्मणेकोणाचातूंकिशोरयेथ ॥ दळपाडिलेंससंख्येरहित ॥ शिक्षालावीनतुजयथार्थ
पाहेंपुरुषार्थतूंमाझा २४ लहुह्मणेसिंहदरींतवारण ॥ आलामदभरेंकरून ॥ परितोक्षेमरूपवांचून ॥ केवींजाईलमाघारा
२५ विष्णुवाहनाचेकवेंतून ॥ उरगकेवींजायवांचून ॥ ऐसेंऐकूनशत्रुघ्न ॥ लावीबाणचापासी २६ इतुकेंउत्तरऐकतां ॥
शत्रुघ्नाचेदळासतत्वता ॥ मूषकटवकारूनिअवचिता ॥ उरगावरीपातला २७ आकर्णवरीवोढीवोढून ॥ लहूवरीसोडिलाबा
ण ॥सीतापुत्रेंनलागतांक्षण ॥ तोडोनियांटाकिला २८ आणिकसोडिलेपांचबाण ॥ तेहीटाकिलेछेदून ॥ सवेंचरागेंशत्रुघ्न
शंभरशरसोडित २९ तेहीलहूतोडीसत्वर ॥ सवेंचकायकरीसीताकुमर ॥ बाणसोडोनियांअपार ॥ झांकिलेंअंबरप्रतापें
३० सेनेसहितकैकेयीनंदन ॥ बाणींजर्जरकेलापूर्ण ॥ जेंजेंशस्त्रप्रेरीशत्रुघ्न ॥ तेंतेंलहूसवेंचतोडित ३१ मगनिर्वाणबाणजो

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

शत्रुघ्नातें ॥ दिधलाहोतारघुनाथें ॥ परमसंकटदेखोनितेथें ॥ तूणीरांतूनिकाढिला ३२ वीजनिघेनभाबाहेर ॥ तैसाझळक तसेदिव्यशर ॥ तोधनुष्यासीयोजूनसत्वर ॥ लहूवरीसोडिला ३३ तीक्ष्णबाणदेखोनिसीताकुमर ॥ ह्मणेहाआलाअनिवार ॥ याचेंनिवारणसमग्र ॥ कुशएकजाणतसे ३४ फळेंआणावयाकुशगेला ॥ माझापाठिराखादुरावला ॥ हातोंअनिवार शरआला ॥ निवारणमजनव्हे ३५ परिधीरवंतसीतानंदन ॥ वेगींसोडिलादिव्यबाण ॥ तेणेंशत्रुघ्नाचानिर्वाणबाण ॥ अर्ध खंडिलाअंतराळीं ३६ परीअर्धजोउरला ॥ तोलहुवाचेहृदयींभरला ॥ मूर्च्छनायेऊनिपडिला ॥ बाळतेव्हांधरणीवरी ३७ भडभडांचालिलेंरुधिर ॥ आरक्तवर्णझालेनेत्र ॥ श्वासोश्वासकोंडलेसमग्र ॥ शिखारुधिरेंथबथबिली ३८ लहूपासोनिउर लेवीर ॥ त्याणींसिंहनादकेलाथोर ॥ पडिलापडिलाकिशोर ॥ ह्मणोनिसमग्रधाविन्नले ३९ दुरोनिपाहातीतिवेळे ॥ एकह्मण तीमिसघेतलें ॥ मगशत्रुघ्नेंरथाखालें ॥ उतरूनिजवळीपातला ४० शत्रुघ्नजवळीबैसोन ॥ पाहेबाळविलोकून ॥ धन्यजन नीप्रसवलीरत्न ॥ ह्मणोनिउचलूनिघेतला ४१ परमसुंदरआकर्णनयन ॥ अजानबाहूसुहास्यवदन ॥ शत्रुघ्नेंउदकआणून मुखाचेंअशुद्धधुतलें ४२ आश्चर्यकरितिअवघेवीर ॥ आतांयाचीमायअपार ॥ शोकार्णवींबुडेलसाचार ॥ ऐसेंसकळबोल ती ४३ स्नेहाचापूरअत्यंत ॥ शत्रुघ्नाचेहृदयींलोटत ॥ नयनींआलेअश्रुपात ॥ बाळकदृष्टीविलोकितां ४४ रामचंद्रासी दाखवूंह्मणून ॥ रथावरीघातलानेऊन ॥ घेउनियांश्यामकर्ण ॥ शत्रुघ्नचालिलात्वरेनें ४५ लागलावाद्यांचाएकचिनाद ॥ म नीनसमायेआनंद ॥ महासिद्धीसाधूनिसिद्ध ॥ घवघवीतपरतेजैसा ४६ इकडेलेंकुरेंधांवोन ॥ जानकीससांगतीयेऊन ॥

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

मातेतुझालहूधरून ॥ नेलाघालूनिरथावरी ४७ ऐकतांसकळवर्तमान ॥ जानकीपडिलीमूर्च्छायेऊन ॥ जैसेंलोभियाचेंगेलें
धन ॥ तैसींगतीझालीपैं ४८ जैसीकाष्ठाचीबाहुली ॥ तैसीनिचेष्टितसीतापडिली ॥ पुढतीआक्रंदतउठिली ॥ वक्षस्थळब
डवित ४९ मीअनाथअतिदुर्बळ ॥ परदेशींभणंगकेवळ ॥ माझेंधरूनियांबाळ ॥ कोणींनिर्दयेंपैंनेलें ५० माझींदुर्बळाचीं
दोनबाळें ॥ त्यांतएकधरूनिनेलें ॥ पूर्वकर्मफळासआलें ॥ आह्माझालेंवोखटेंकीं ५१ बाळमाझेंअत्यंतकोमळ ॥ घायेंदुः
खीझालेंअसेल ॥ मुखचंद्रत्याचाअतिनिर्मळ ॥ नयनविशाळसुरेख ५२ तयालागोनियांबाण ॥ फुटोनगेलेअसतीलनयन
सुहास्यवदनछिन्नभिन्न ॥ झालेंअसेलबाळाचें ५३ माझीबाळेंअत्यंतदीन ॥ असतीकंदमूळेंभक्षून ॥ तयांसीबळकैंचेंपूर्ण ॥
जुंझावयाकारणें ५४ बाळावरीशत्रुउचंबळती ॥ तेक्षत्रियनव्हतीपापीदुर्मती ॥ परिकोणाचेचचित्तीं ॥ दयाउपजलीनसेकीं
५५ माझेंदरिद्रीयाचेंकिंचितधन ॥ कोणेंनिर्दयेंनेलेंचोरून ॥ मजअंधाचीकाठीहिरून ॥ कोणेंवनींभिरकाविली ५६ को
णीमाझावृक्षछेदिला ॥ कोणीमाझानेत्रफोडिला ॥ माझाकल्पवृक्षउपडिला ॥ कोण्यापापियेंयेऊनी ५७ वाल्मीकताततये
वेळां ॥ तोहीगेलाअसेपाताळा ॥ मजवरीअनर्थझाला ॥ कोणासांगूंजाऊनी ५८ कुशवनासगेलातत्वता ॥ कोणधांवणें
करीलआतां ॥ माझालहूमागुता ॥ कोणमजभेटवील ५९ तोंकुशपरतलावनींहून ॥ मार्गींहोतातअपशकुन ॥ जडझालेचा
लतांचरण ॥ तैसाचधांवूनयेतसे ६० कौपीनमौंजीकटींशोभत ॥ मस्तकींचीशिखावातेंउडत ॥ माताझालीअसेलक्षुधित ॥
ह्मणोनधांवतयेतसे ६१ पर्णकुटींतप्रवेशला ॥ ह्मणेमातेबंधूकोठेंगेला ॥ सामोरामजनाहींआला ॥ कोठेंगुंतलाखेळाव

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

या ६२ मगत्रिभुवनपतीचीराणी ॥ बोलेआक्रोशेंहांकफोडूनी ॥ बारेएकचक्रयेऊनी ॥ नेलाधरूनबंधूतुझा ६३ तूंत्या
चापाठिराखापूर्ण ॥ तुझेंकरीतगेलास्मरण ॥ सांडिलाअसेलतेणेंप्राण ॥ तूंलवकरीधांवआतां ६४ कुशेंघेतलेंधनुष्यबा
ण ॥ जानकीसकेलेंसाष्टांगनमन ॥ जयजयगुरूवाल्मीकह्मणून ॥ केलीगर्जनातेकाळीं ६५ गुरुनाममंत्रेंतेवेळीं ॥ सर्वां
गींविभूतचर्चिली ॥ उभाराहूनबाळबळी ॥ जानकीप्रतीबोलत ६६ अंबेइंद्रचंद्रकुबेर ॥ अथवाब्रह्माविष्णुमहेश्वर ॥ जरी
मीअसेनतुझाकुमर ॥ बाणेंकरूनविभांडीन ६७ समरंगणींसर्ववीर ॥ आटोनियांरथकुंजर ॥ बंधूसोडवीनसत्वर ॥ शि
क्षालावीनवैरियांसी ६८ आजिदाखवीनबळाचीप्रौढी ॥ तरीचजन्मलोंतुझेपोटीं ॥ ह्मणोनिचालिलाउठाउठी ॥ नमूनमाता
सत्वर ६९ कुंजरांचामार्गकाढीतपूर्ण ॥ आवेशेंधांवेजैसापंचानन ॥ कींसर्पशोधावयासुपर्ण ॥ क्रोधेंकरूनधांवत ७० अ
सोदुरीदेखोनिभार ॥ दिधलीहांकप्रचंडथोर ॥ ह्मणेकोणरेतुह्मीतस्कर ॥ चोरूननेतावस्तूमाझी ७१ तस्करासिहेंचिशास
न ॥ आतांखंडीनहस्तचरण ॥ कर्णनासिकछेदोन ॥ शिक्षालावीनयेथेंची ७२ खळबळलासेनासमुद्र ॥ आलामागुताह्म
णतीवीर ॥ तोराजसश्यामसुंदर ॥ दिसेराघवदूसरा ७३ द्वादशवर्षांचाकिशोर ॥ देखोनिचळचळांकांपतीवीर ॥ एकह्म
णतीसकळसंहार ॥ करीलआतांउरलेयांचा ७४ तोंकुशेंकोदंडचढवून ॥ सोडिताझालातीक्ष्णबाण ॥ जैसावर्षतपर्जन्य
तेवीबाणसोडित ७५ तोंसेनापतीदळघेऊन ॥ मुरडलातेव्हांवर्षतबाण ॥ ह्मणेबाळातुजनलागतांक्षण ॥ धरूननेईनअयो
ध्ये ७६ मगनिर्वाणींचेदाहाबाण ॥ कुशावरीसोडीशत्रुघ्न ॥ येरेंएकशरसोडून ॥ निवारिलेदाहाही ७७ जैसेमूढाचेबोल

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

अपार ॥ एकशब्देंछेदीचतुर ॥ कींस्पर्शतांजान्हवीनीर ॥ पापेंसमस्तसंहारती ७८ तैसेकुशेंशरछेदून ॥ तत्काळकाढिले
नवबाण ॥ चारीवारूआणिस्यंदन ॥ सेनापतीचेतोडिले ७९ सवेंचतनिबाणसोडिले ॥ चापसेनापतीचेंछेदिलें ॥ कवच
आंगींचेंउडविलें ॥ विरथकेलेंतेकाळीं ८० पुढेंचरणचालींचालत ॥ कुशावरीआलाअकस्मात जैसागजउन्मत्त ॥ मृगेंद्राव
रीचौताळे ८१ तोंकुशेंसोडूनिदोनबाण ॥ दोनिहस्तटाकिलेछेदून ॥ सवेंचदिव्यबाणसोडून शिरतयाचेंउडविलें ८२ सेना
पतीपडतांचतेवेळां ॥ एकचिहाहाकारजाहाला ॥ तोंत्याचाबंधूसरसावला ॥ नागेंद्रनामतयाचें ८३ विद्युत्प्रायवीसबाण ॥
नागेंद्रसोडीचापींयोजून ॥ त्याशरतेजेंप्रकाशलेंगगन ॥ मगसीतानंदनकायकरी ८४ एकशरेंतेवेळे ॥ वीसबाणपिष्टकेले ॥
जैसींएकानामेंसकळें ॥ महापातकेंभस्महोती ८५ मगसोडूनअर्धचंद्रशर ॥ उडविलेंनागेंद्राचेंशिर ॥ सोडीतबाणाचेपूर ॥
नयेसमोरकोणीही ८६ तोंसेनामागेंटाकून ॥ पुढेंधांवलाकैकेयीनंदन ॥ चपळेहूनसतेजबाण ॥ वर्षताझालातेकाळीं ८७ तं
वतोराघवेयचतुर ॥ येतांचपिष्टकरीतशर ॥ सवेंचबाणआपार ॥ वर्षतमेघासारिखा ८८ उरलेंशत्रुघ्नाचेंदळ शिरेंछेदोनपाडी
सकळ ॥ जेवीअपारजळदजाळ ॥ प्रभंजनविभांडी ८९ मगआठवूनवाल्मीकाचेचरण ॥ सद्गुरुदत्तकाढीबाण ॥ सोडिला
जेवींपंचानन ॥ वारणावरीसाक्षेपें ९० वज्रपडेशैलशिखरीं ॥ तैसाशत्रुघ्नाचेहृदयावरी ॥ बाणआदळतांतेअवसरीं ॥ पडि
लाधरणीशत्रुघ्न ९१ मगभोंवतेंपाहेकुशवीर ॥ तंवएकहीनयेसमोर ॥ जैसादिनकरासअंधकार मुखपरतोननदाखवी ९२
षोडशपद्मेंदळभार ॥ आणिकदेशोदेशींचेनृपवर ॥ तितुकेहीसंहारिलेसमग्र ॥ जैसेंतृणअग्निसंगें ९३ मगकुशचापासि ३

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

घालीगंवसणी ॥ जैसायाज्ञिकआच्छादीअग्नी ॥ कींमेघामाझीसौदामिनी ॥ गुप्तजैसीराहिली ९४ जैसीउद्वसग्रामाचीं
मंदिरें ॥ व्यर्थशून्यदिसतीएकसरें ॥ लहूकारणेंकुशेंद्रें ॥ रणशोधिलेंतत्काळ ९५ व्हावयावस्तूचासाक्षात्कार ॥ साधकशो
धितीसमग्र ॥ तैसेरथशोधीकुशेंद्र ॥ बंधुरत्नाकारणें ९६ तोंशत्रुघ्नाचामुख्यरथ ॥ त्यावरीलहूअसेमूर्छागत ॥ तयासकुशेंउ
चलूनित्वरित ॥ हृदयकमळींधरियेला ९७ तोंलहूनेंउघडोनिनयन ॥ विलोकीनिजबंधूचेंवदन ॥ तत्काळउभाठाकलाउठो
न ॥ ह्मणेशत्रुघ्नकोठेंगेला ९८ चारीदेहजाणोनिविशद ॥ संतअंतरींबोधितीबोध ॥ तैसाचकुशहोऊनिसद्गद ॥ बंधूसहृदयीं
धरियेला ९९ मगकुशतयासीह्मणत ॥ बारेश्रमलासीतूंबहुत ॥ येरूह्मणेकष्टसमस्त ॥ हरलेतुजदेखतां १०० मगह्मणेघे
ऊनिश्यामकर्ण ॥ चलाआश्रमासकरूंगमन ॥ तोंकुशबोलिलावचन ॥ कदांयेथूनिजाऊंनये १ आतांयुद्धासयेतीलबहुत ॥
तेसमरींजिंकूनिसमस्त ॥ मगवारूघेऊनित्वरित ॥ जाऊंजननीदर्शना २ लहूह्मणेघालूनिपैज ॥ घ्यावेंअयोध्येचेंराज्य ॥ धरू
निआणावारघुराज ॥ वाल्मीकचरणाजवळीपैं ३ असोवृक्षींबांधोनिश्यामकर्ण ॥ हातींघेऊनिधनुष्यबाण ॥ अयोध्यापंथल
क्षितपूर्ण ॥ दोघेजणउभेअसती ४ घायाळउरलेकिंचित ॥ तेअयोध्येसगेलेधांवत ॥ राघवासीसकळमात ॥ श्रुतकेलीते
धवां ५ दळभारासहितपूर्ण ॥ रणींपडलावीरशत्रुघ्न ॥ विप्रबाळदोघेजण ॥ द्वादशवर्षांचेअसतीपैं ६ यज्ञमंडपींरघुनंदन
बंधूचासमाचारऐकोन ॥ टाकोनिहातींचेंअवदान ॥ भूमीवरीउलंडला ७ नेत्रींढळढळांवाहेनीर ॥ गजबजिलेभरतसौमि
त्र ॥ बिभीषणहनुमंतामित्र ॥ हडबडलेतेधवां ८ ह्मणतीयज्ञासिझालेंविघ्न ॥ पडिलामहावीरशत्रुघ्न ॥ सौमित्राप्रतीराजीव

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

रा०वि० नयन ॥ कायबोलेतेधवां ९ ह्मणेशत्रुघ्नाऐसावीरजाण ॥ ऋषीकिशोरेंआटिलारण ॥ तरिसवेंघेऊनिअपारसेना ॥ धां अ०३९
४ वण्याधांवेंबंधूच्या ११० श्रीरामचरणांबुजनमून ॥ वायुवेगेंनिघालालक्ष्मण ॥ सवेंचतुरंगसैन्य ॥ अपारतेव्हांनिघा
लें ११ चवदागांवेंरुंदथोर ॥ मार्गींचालिलासेनासागर ॥ वायुवेगेंउन्मिळावर ॥ रणमंडळासीपातला १२ तोंसेनापती
काळजित ॥ सौमित्रापासींपावलात्वरित ॥ तोंदोघेदेखीलेअकस्मात ॥ शशिआदित्यज्यापरी १३ श्यामसुंदरदोघेजण ॥
द्वादशवर्षांच्यामूर्तीलाहान ॥ हातींघेऊनिधनुष्यबाण ॥ धीटदोघेविलोकिती १४ पाहावयाबंधूचेंमानस ॥ बोलताझाला
वीरांकुश ॥ ह्मणेसेनापतलीविशेष ॥ प्रतापकारदिसतसे १५ सेनापतीबळेंसंपन्न ॥ चपळेसमत्याचास्यंदन ॥ आतांयुद्ध
करीलदारुण ॥ आह्मासससर्वथानाटोपे १६ मगबोलिलालहुवीर ॥ तूंपाठिराखाआलासिसत्वर ॥ आतांमजबळअपार ॥ ये
थोनियांविशेष १७ जैसीसाह्यहोतांसरस्वती ॥ सकळकठिणार्थउमजती ॥ तेविआजिकरीनानिर्वैरक्षिती ॥ तुझ्याबळेंकरू
नियां १८ तुजसींयोद्धाराहेसमोर ॥ ऐसाकोणअसेवीर ॥ जरीस्वयेंआलारामचंद्र ॥ तरितूंत्यासीकदांनाटोपसी १९ तोंवरी
गर्जेजलार्णव ॥ जोंदेखिलानाहींकलशोद्भव ॥ तूंपंचाननहेसर्व ॥ जंबुकयुद्धापातले २० जरीतमजिंकीलसूर्यासी ॥ कींभूतें
गिळितीलकाळासी ॥ तरीसमरंगणींयुद्धासी ॥ तुजसींहेपुरतीकेवीं २१ जरीआकाशबुडेलमृगजळीं ॥ वाराकोंडिजेलभूगोळीं
तरीचतुजसींरणमंडळीं ॥ भिडोंसकतीबंधुराया २२ परीएकेसंशयेंगोंविलें ॥ जेंमाझेंधनुष्यभंगिलें ॥ उपवनाजवळीयुद्धझालें ४
आसमासप्रथमची २३ मगसैन्यदळभार ॥ धराधराह्मणतीकिशोर ॥ आतांजातीलहेकोठवर ॥ पाहूंनयनीआह्मीचकीं २४

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

वीरदोघेउभेठाकुनी ॥ दळभारविलोकितीनयनीं ॥ सैन्यजैसेंतृणप्रायकरुनी ॥ उभेठाकतीतैसेचते २५ कुशह्मणेऐसियासमयासी ॥ कोणचापदेईलआह्मासी ॥ तरीआतांप्रार्थूंसूर्यासी ॥ धनुष्यप्राप्तीकारणें २६ मगराघवेंयकरीध्यान ॥ एकनिष्ठेंमांडिलेंसूर्यस्तवन ॥ ऊर्ध्ववदनकरून ॥ सूर्यमंडळविलोकिती २७ जयजयतमनाशकासहस्त्रकिरणा ॥ अंबरचूडामणीसूर्यनारायणा ॥ राजीवमिलिंदबंधमोचना ॥ त्हदयदळप्रकाशका २८ एकचक्रकनकभूषित ॥ रथसुरेखवेगबहुत ॥ निमेषार्धामाजीअपारपंथ ॥ क्रमोनिजातमनोवृत्ती २९ आदिपुरुषतूंनिर्विकार ॥ ब्रह्माविष्णुमहेश्वर ॥ हींस्वरूपेंतुझींचसाचार ॥ सर्वप्रकाशकआदित्या ३० सकळरोगदुःखकारणा ॥ विश्वपालनाविश्वदीपना ॥ त्रिभुवनप्रकाशकागहना ॥ काळात्मयाकाळरूपा ३१ परिसोनिबाळकांचीस्तुती ॥ तत्काळप्रसन्नझालागभस्ती ॥ अक्षयधनुष्यक्षिती ॥ ऊर्ध्वपंथेंटाकिलें ३२ सूर्यासससाष्टांगनमून ॥ घेतलेंतत्काळधनुष्यबाण ॥ ह्मणतीवाल्मीकगुरूधन्य ॥ सूर्यआराधनदिधलेंजेणें ३३ आह्मासिसद्गुरूदयाअखंड ॥ क्षणेंजिंकुंहेंब्रह्मांड ॥ लहूह्मणेआजिकोड ॥ पुरवीनयाचेंसंग्रामीं ३४ सूर्यदत्तकोदंडघेऊनसत्वरसरसावलातेव्हांलहूवीर ॥ तोंसौमित्राचेंदळसमग्र ॥ चतुरंगलोटलें ३५ अचुकलहूचेंसंधान ॥ वायांनजायटाकिलाबाण ॥ पदातीअश्वगजवारण ॥ तोडूनिपाडितिएकसरें ३६ कोणीधनुष्याचीवोढीकाढित ॥ तोंभुजतोडीअकस्मात ॥ मणगटेंअसिलतेसहित ॥ तोडोनिपाडीक्षितीवरी ३७ शिरांच्यालाखोल्यातेक्षणीं ॥ भूलिंगासमर्पिल्यादोघांजणीं ॥ रक्ताचेनद्यांतुनी ॥ जातीवाहूनकलेवरें ३८ वीरसंहारिलेअपार ॥ कालजितासह्मणेसौमित्र ॥ हेदोघेअसतांएकत्र ॥ काळासहीनाटोप

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

ती ३९ तरीबहुतकटकघेऊन ॥ थोरासीधरींतूंवेढून ॥ धाकट्याभोंवतेंआवरण ॥ मीघालूनधरितोंतया ४० मगदोनभागक
टककेलें ॥ दोघांदोहींकडेफोडिलें ॥ चोवीसवेढेघातले ॥ सभोंवतेसैन्याचे ४१ सौमित्रेंवेढिलालहुवीर ॥ जैसातृणेंझांकिला
वैश्वानर ॥ कींअजानींकोंडिलामहाव्याघ्र ॥ कींखगेश्वरसर्पानीं ४२ परितोलहुवीरप्रतिमारघुवीर ॥ चापासलाऊनसोडी
शर ॥ फिरतफिरतचक्राकार ॥ सोडीपूरबाणाचा ४३ धन्यवाल्मीकाचेंदिव्यमंत्र ॥ एकाबाणाचेकोटीशर ॥ हाणोनिशिरेंतो
डीसत्वर ॥ धन्यवीरराघवी ४४ रघुपतीचामंत्रीविशेष ॥ रुधीनामेंधांवलाराक्षस ॥ तोबळिष्ठगगनास ॥ उडोनिगेलाते
धवां ४५ खालींअकस्मातउतरूनी ॥ लहूचेंचापहिरोनी ॥ अंतरिक्षगेलाउडोनी ॥ फळघेऊनपक्षीजैसा ४६ हातींचेंहिरो
रूननेलेंचाप ॥ लहूपाहेतटस्थरूप ॥ तस्करापाठींलागतांसर्प ॥ खंडीजैसावारण ४७ व्यालमूषकधरूंजातां ॥ वणव्यांत
सांपडेअवचिता ॥ कींरिसामागेंधांवतां ॥ बोरांटीआंगाअडकली ४८ निधानसाधावयासगेला ॥ तोंविवर्सीपडिलीयेऊनग
ळां ॥ तैसेंलहूसझालेंतेवेळां ॥ धनुष्यनेतांरुधीनें ४९ असोसीतासुतपरमरणधीर ॥ जैसानिराळींउडेखगेश्वर ॥ तैसाउ
डोनियांसत्वर ॥ रुधिराक्षासधरियेला १५० हातींचेंधनुष्यहिरूनिघेतलें ॥ असुराचीझोंटीधरिलीतेवेळे ॥ गरगरांफिरवू
नबळें ॥ पृथ्वीवरीआपटीला ५१ मृत्तिकेचाघटफुटला ॥ तेवीअसुरदेहचूरझाला ॥ रुधीनेंप्राणसोडिला ॥ सकळांदेखतां
तेकाळीं ५२ मागुतीकटकांतयेऊन ॥ युद्धकरीसीतानंदन ॥ चोवीसवेढेसंहारून ॥ टाकिलेतेव्हांसैन्याचे ५३ महाजुंझार ५
येऊन ॥ हातींचींशस्त्रेंदेतीटाकून ॥ धरितीतेव्हालहूचेचरण ॥ आमचेप्राणरक्षींकां ५४ एकपळतीरणसांडून ॥ एकदां

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

तीधरितीतृण ॥ मगसिंहनादेंलक्ष्मण ॥ गर्जोनपुढेंधांवला ५५ जैशापांचविजाअतितीक्ष्ण ॥ तैसेसौमित्रेंपांचबाण ॥ ल
हूवरीसोडिलेपूर्ण ॥ महाक्रोधेंकरूंनियां ५६ अतिचपळलहूवीर ॥ तत्काळसोडीदिव्यशर ॥ पांचबाणकेलेचूर ॥ लोहपि
ष्टन्यायेंसी ५७ लहूसौमित्राप्रतीबोलत ॥ त्वांपूर्वींमारिलाइंद्रजित ॥ तीतुझीविद्यासमस्त ॥ आजिदावींमजलागीं ५८
चतुर्दशवर्षेंनिराहार ॥ काननींश्रमलासितूंफार ॥ आजसमरींसाचार ॥ सावकाशनिद्राकरीं ५९ सौमित्रह्मणेतूंकोणाचाको
ण ॥ तंवलहूबोलेहांसोन ॥ तुजपुसावयाकायकारण ॥ आलाबाणसांभाळीं ६० लहूनिधडाप्रचंडवीर ॥ सोडीएकसबळ
शर ॥ रथासहीतसौमित्र ॥ अकाशपंथेंउडविला ६१ गरगरांगगनींभोंवेरथ ॥ भूमीवरीपडेअकस्मात ॥ मगदुजेरथींसुमि
त्रासुत ॥ आरूढलालवलाहें ६२ जैसाकांवर्षेघन ॥ तैसाबाणसोडीलक्ष्मण ॥ लहुत्याहूनित्रिगुण ॥ शरसोडीतिकाळीं ६३
उन्मिळापतीचेबाण ॥ तटतटांटाकींतोडून ॥ मगमंत्रजपोनिलक्ष्मण ॥ शरसोडोनीदेतसे ६४ त्याशरापासूनिएकदां ॥ नि
घाल्याकोट्यावधीगदा ॥ विमानारूढदेववृंदां ॥ आश्चर्यतेंव्हांवाटलें ६५ तोंलहूजपेगुरुमंत्र ॥ चक्रेसोडिलींतेंव्हांअपार ॥
गदाछेदोनिसमग्र ॥ सर्वेंचगुप्तजाहालीं ६६ तोंसौमित्रेंसोडिलेंपर्वतास्त्र ॥ त्यावरीलहूसोडीवज्र ॥ फोडिलेअचळसमग्र
वज्रजातस्वस्थळा ६७ मंगळाचाभाचालहुवीर ॥ सूर्यवंशमंडणाचाकुमर ॥ शरमुखींद्वादशदिनकर ॥ स्थापोनियांबाण
सोडी ६८ निघतांद्वादशादित्यतेजाळ ॥ प्रतापेंउजळलाविरिंचीगोळ ॥ तेंदेखतांफणिपाळ ॥ राहुअस्त्रसोडीतसे ६९ सू
र्यआणिराहुअस्त्र ॥ दोनीझालींअसतांएकत्र ॥ सर्वेंचगुप्तझालींसमग्र ॥ नलागतांक्षणतेकाळीं १७० कामास्त्रसोडीअहि

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

इति रामविजय अष्टत्रिंशोध्यायः समाप्तः

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

॥ अथ रामविजय ~~[illegible]~~ नवत्रिंशतितमोध्याय प्रारंभः ॥

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri



CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

श्रीगणेशायनमः ॥ श्रीसीतारामचंद्राभ्यांनमः ॥ देवाधिदेवराजीवनेत्र ॥ पुराणपुरुषघनश्यामगात्र ॥ लीलादाखविली
विचित्र ॥ भक्तजनतारावया १ सौमित्रपडिलारणांगणीं ॥ श्रवणींऐकतांकोदंडपाणी ॥ शोकाकुलितपडिलाधरणी ॥ सु
मंतेंसावरूनधरियेला २ भरतआणिहनुमंत ॥ दळघेऊनअपरिमित ॥ रणाप्रतीधांवलेत्वरित ॥ पवनवेगेंकरूनियां ३ स
मागमेंघेऊलहनुमंत ॥ रणविलोकीभरत ॥ तोंसीतासुतधांवत ॥ दोघेहिपुढेंपातले ४ हनुमंताचेकर्णींत्वरित ॥ भरतसांगे
गुह्यमंत्र ॥ ह्मणेहेराघवाऐसेदिसतीपुत्र ॥ सीतासुतनिश्चयें ५ जानकीहोतीगर्भिणी ॥ तैसीचरामचंद्रेंसोडिलीवनीं ॥ हनु
मंतह्मणेमजहीमनीं ॥ ऐसेंचगमेनिश्चयें ६ वैरागरावांचूनीरत्न ॥ सहसानहोयनिर्माण ॥ हेजानकीचेनंदन ॥ मजहीपूर्णक
ळोंआलें ७ तोंलहूह्मणेकुशवीरा ॥ पाहूंजातोंनरवानरा ॥ हळूचकरितातविचारा ॥ तेंतुजकांहींसमजलें ८ आह्मांदोघांसींयु
द्धींगोवुनी ॥ श्यामकर्णन्यावासोडोनी ॥ हेंचत्याणींधरिलेंमनीं ॥ सांगतीकानींएकमेंकां ९ तरितूंरक्षीश्यामकर्ण ॥ यांसीं
युद्धकरितोंमीनिर्वाण ॥ ऐसेंकुशवीरबोलोन ॥ सरसाऊनपुढेंआला १० धनुष्यासीलाऊनबाण ॥ भरताप्रतीबोलेवचन ॥ तूं
वडीलकायलक्ष्मणाहून ॥ तुझेंआंगवणथोरदिसे ११ तुझेंनामकायसांगसत्वर ॥ पितातुझाकोठीलनृपवर ॥ त्वांपूर्वीयुद्धदु
र्धर ॥ कोणासिंकेलेंसांगपां १२ माझेंनामपुससीलयेक्षणीं ॥ तरीमीवीरकुशेंद्रचूडामणी ॥ याउपरिभरतवाणी ॥ कायबोलता
जाहला १३ ह्मणेलेंकरातूंजाययेथोन ॥ तुजदीधलेंजीवदान ॥ भरतेंसोडिलेंह्मणोन ॥ सांगआपुलेमातेसी १४ मगकुशबोले
हांसोन ॥ तुझेबंधूपडलेदोघेजण ॥ त्यांचासूडघ्यावयाश्रीरामेंपूर्ण ॥ पाठविलेंतुह्मारणासी १५ युद्धसांडूनिसांगसीगोष्टी ॥

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

बंधूचासूडघेउठाउठी॥ आतांरणींदाऊनपाठी ॥ अयोध्येसीपळूनजा १६ पाठमोऱ्यासीनमारींजाण ॥ तुजअभयदीधलेंपू
र्ण ॥ कोणतुझाआहेरघुनंदन ॥ त्यासघेऊन येईंवेगें १७ ऐसेंबोलतांसीतानंदन ॥ भरतेंचापासीलाऊनिबाण ॥ आकर्णपर्यं
तवोढून ॥ कुशावरीसोडिलावेगें १८ सीतात्मजेंशरटाकून ॥ मध्येंचतोडिलातोबाण ॥ सवेंचशरजाळघालून ॥ कटकबहुत
संहारिलें १९ भरतशरजेसोडित ॥ कदांतेनमानीसीतासुत ॥ युद्धविद्याबळेंयथार्थ ॥ सीतासुतनाटोपे २० भरतसोडीकार्त
वीर्यास्त्र ॥ सहस्त्रकरांचेप्रकटलेवीर ॥ बाणसोडितीअपार ॥ हांकेअंबरगाजविती २१ ऐसेंऐकोनिराघवकुमरें ॥ भार्गवास्त्र
सोडिलेंत्वरें ॥ कार्तवीर्यएकसरें ॥ आटोनिगेलेनिःशेष २२ मगभरतप्रेरीकाळरात्री ॥ तमेंदाटलीसर्वधरित्री ॥ तंवसीतापु
त्रेंतेअवसरीं ॥ द्वादशसूर्यप्रकटविले २३ त्याप्रकाशेंतेवेळां ॥ ब्रह्मांडगोळउजळला ॥ भरतयोजीत्र्यंबकास्त्राला ॥ येरेंभस्मा
सुरास्त्रसोडिलें २४ मगकुशेंद्रेंतेवेळां ॥ सूर्यमुखतोबाणकाढिला ॥ जैसीमेघांतूननिघेचपळा ॥ तैसागेलात्वरेनें २५ भरताचे
त्हृदयींयेऊन खडतरलातोदिव्यबाण स्यंदनावरूनउलथोन भरतखालींपडियेला २६ दळपूर्वींचपाडिलेंबहुत दृष्टींदेखो
निहनुमंत॥ घेऊनएकविशाळपर्वत ॥ कुशेंद्रावरीधांवला २७ भोवंडूनबळेंभिरकाविला ॥ कुशेंद्रेंवज्रमुखबाणसोडिला ॥ अच
ळफोडोनिपिष्टकेला धुळोराउडालाचहूंकडे २८ मारुतीचेंत्हृदयलक्षोन सोडिलेतेव्हांपाचबाण वज्रदेहीमूर्च्छायेऊन धरणी
वरीपडियेला २९ इकडेबिभीषणआणिरघुनंदन ॥ विचारकरीतबैसलेपूर्ण ॥ बाळकहेकवणाचेकोण ॥ युद्धनिर्वाणकरितातीं
३० तोंअकस्मातआलीमात ॥ रणींपडिलावीरभरत ॥ मूर्च्छनायेऊनिहनुमंत ॥ धरणीवरीपडियेला ३१ तोंबिभीषणह्मणे १

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

रघुनाथा ॥ आतांकासयायज्ञकरितां ॥ परमाश्चर्यतत्वता ॥ जाऊनियांपाहावें ३२ रघुवीरतेव्हांबोलेवचन ॥ काळकैसापर
सकठिण ॥ बंधूपडिलेतिघेजण ॥ कुळक्षयपूर्णमांडिला ३३ परमक्रोधावेरघुनंदन ॥ तोडोनिटाकिलेंयज्ञकंकण ॥ होमद्रव्यें
उलंडून ॥ सीतारमणउठिलासे ३४ हडबडलीअयोध्यासर्व ॥ निशाणींघातलाघाव ॥ रथारूढहोऊनिसर्व ॥ पवनवेगेंधांव
ले ३५ बिभीषणसुग्रीवजांबुवंत ॥ नळनीळशरभवाळीसुत ॥ अयोध्येचेंदळसमस्त ॥ परमवेगेंधांवतसे ३६ वर्षाकाळींगंगे
चेपूर ॥ सागराप्रतीजातीसत्वर ॥ तेवीनरवानराचेभार ॥ रणसिंधूजवळीआले ३७ तिघेबंधूपडिलेरणीं ॥ नयनींविलोकी
चापपाणी ॥ कींनमस्कारघातलेधरणी ॥ तिघेमिळूनएकदां ३८ तुझेकन्येसगांजिलेंयथार्थ ॥ ह्मणोनिपृथ्वीसनमस्कारक
रित ॥ असोप्रेतेंदेखोनिरघुनाथ ॥ मनींपरमक्षोभला ३९ तोंदोघेदेखिलेनयनीं ॥ श्यामसुंदरबाळेंतेक्षणीं ॥ एकाकडेएकपा
होनी ॥ गोष्टीकरितीकौतुकें ४० कौपीनमौंजीयज्ञोपवीत ॥ शोभतीकिशोरअद्भुत ॥ माथांचियाशिखाउडत ॥ दृष्टीनाणिती
परदळातें ४१ असोवृक्षपाषाणघेऊन ॥ धांवलेतेव्हांवानरगण ॥ तोंदोघांहींधनुष्यचढवून ॥ सरसावूनपुढेंआले ४२ आ
श्चर्यकरीरघुनंदन ॥ सोडीतबाणापाठीबाण ॥ मृगेंद्राऐसेगर्जोन ॥ दोघेवचनबोलती ४३ असंख्यघातलेंबाणजाळ ॥ जर्ज
रकेलेंवानरदळ ॥ शिळावृक्षफोडोनिसकळ ॥ परदळावरीटाकिती ४४ अनिवारबाळकांचामार ॥ नसोसवतीदारुणशर ॥
प्रेतेंपडतीअपार ॥ उरलेवानरपळतीभयें ४५ हनुमंतभावीहर्षेंमनांत ॥ ऊर्ध्वपंथेंउतरूनअकस्मात ॥ पुच्छेंबांधोनदोघेत्व
रित ॥ राघवापासींआणावे ४६ उडोनिपाहेजंवअंजनीकुमर ॥ तोंकुशेंटाकिलासबळशर ॥ त्यासआदळोनिसत्वर ॥ बाण

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

पृथ्वीवरीपडियेला ४७ कुशेंद्रबोलेगर्जोन ॥ मर्कटाउभाराहेंएकक्षण ॥ त्वांविध्वंसिलेंअशोकवन ॥ तेंयेथेंनचालेसर्वथा ४८
टाकावेवृक्षपाषाण ॥ हेंराक्षसयुद्धनव्हेजाण ॥ तोनव्हेरेगिरिद्रोण ॥ उपटोनिबळेंन्यावया ४९ गोवत्सपदींजीवन ॥ पुरुषार्थ
भोगिसीसमुद्रउडोन ॥ रावणाचेंनगरजाळिलेंपूर्ण ॥ तेंयेथेंनचालेआह्मासीं ५० त्यासमयींउडोनिसमुद्र ॥ रावणालयापाव
विलासीतुंवानर ॥ आमचेजननीसअपार ॥ स्नेहतुझालागलाअसे ५१ तेक्षणक्षणाआठवित ॥ ह्मणोनितुजरक्षिलेंयथार्थ ॥
उगाचराहेंनिवांत ॥ अचळवतहनुमंता ५२ तोंवृक्षघेऊनिसत्वर ॥ पुढेंधांवलामित्रपुत्र ॥ बाणघातेंतरुवर ॥ लहूनेंतोडिला
हातींचा ५३ ह्मणेऐकरेचंडसुता ॥ मागीलकाळराहिलाआतां ॥ तुह्मापतितासीतत्वता ॥ लावीनाशिक्षाआजयेथें ५४ वाळी
ज्येष्ठबंधूमारून ॥ त्याचेस्त्रियेसींकरिसीगमन ॥ ज्याचेबळेंकर्मकेलेंपूर्ण ॥ त्याचेंज्ञानकळोंआलें ५५ तुह्मामर्कटासीकैंचेंज्ञान ॥
परीतुजगुरूभेटलासुजाण ॥ उत्तमन्यायकरून ॥ तारातुजदीधली ५६ गुरुअमंगळचाल्हेसदां ॥ मगकैंचीशिष्यांसमर्यादा ॥
असोप्रायश्चित्तएकदां ॥ देईनआजीरणांगणीं ५७ मगघालूनिसहस्त्रबाण ॥ रणींपाडिलासूर्यनंदन ॥ फणसफळावरीकंट
कपूर्ण ॥ तैसेशरभेदले ५८ तोंपुढेंधांवलाजांबुवंत ॥ तयाप्रतीकुशबोलत ॥ ह्मणेआस्वलातूंनिर्बळबहुत ॥ वृद्धअत्यंतपादही
न ५९ सोडोनियांसहस्त्रबाण ॥ तोहीपाडिलाउलथोन ॥ तोंघेऊनिपाषाण ॥ नळवानरधांविन्नला ६० तयाप्रतीलहूबोलेवच
न ॥ हेंनव्हेसेतूबंधन ॥ पांचवाबाणसोडून ॥ तोडूनपाडिलारणभूमी ६१ तंवअंगदधांवलासकोप ॥ तयासीबोलेरविकुळदी
प ॥ रावणाचासभामंडप ॥ येथेंनाहींउचलावया ६२ आतांतूंयेईंमजशरण ॥ तुझेपित्याचासूडघेईन ॥ शत्रूचीसेवाकरितांपू

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

र्ण ॥ लाजनवाटेमर्कटा ६३ तुझेमातेनेंकेलाव्यभिचार ॥ त्याचेंप्रायश्चित्तदेईनसत्वर ॥ ह्मणोनिपांचशतशर ॥ टाकोनिंअंग
दपाडिला ६४ असोअष्टजुत्पतीआणिहनुमंत ॥ रणींपाडिलेवीरसमस्त ॥ मगकोदंडचढवूनित्वरित ॥ बाणलावीतराघव ६५
वेगेंसोडिलेंदशबाण ॥ कुशेंशतसोडिलेनिर्वाण ॥ सहस्त्रसोडीरघुनंदन ॥ कुशेंद्रावरीतेधवां ६६ कुशेंलक्षबाणसोडिले ॥ रा
घवेंकोटीमोकलिले ॥ बाणमंडपेंतेवेळे ॥ झांकिलेंदोघींसूर्यबिंब ६७ रघुपतीचाहस्तवेगबहुत ॥ त्याहूनिविशेषकुशवीर
दावित ॥ बाणाचेंतेव्हांगणित ॥ शेषातेंहीनकरवे ६८ अनिवारतेबाळकदोनी ॥ नाटोपतीरामासीरणीं ॥ यावरीकोदंडपाणी
कायबोलेतेधवां ६९ ह्मणेऋषिबाळहोऐकावचन ॥ तुह्मासभातुकेंदेईन ॥ करावयासीदुग्धपान ॥ धेनूदेईनसवत्स ७० मीतु
ह्मासिझालोंप्रसन्न ॥ जेंमागालतेंदेईनपूर्ण ॥ सकळदुःखदरिद्रहरून ॥ देईनदानवाजीगज ७१ मगतेदेतीप्रतिवचना ॥ आ
ह्मासमागावयानसेवासना ॥ तूंचमागमनकामना ॥ पूर्णकरूंतुझीआह्मी ७२ तुझीतूंचभोगींसंपत्ती ॥ आह्मीऐकिलीतुझीकी
र्ती ॥ शोधितांहेत्रिजगती ॥ निर्दयनाहींतुजऐसा ७३ तुजऐसानाहींकठोरकोण ॥ वाळीमारिलाकपटेंकरून ॥ जानकीसारि
खेंचिद्रत्न ॥ अन्यायाविणदवडिलें ७४ निःपापजैसीभागिरथी ॥ तैसीपवित्रसीतासती ॥ घोरवनींटाकिलीहीख्याती ॥ तुज
नशोभेराघवा ७५ ऐसेंदोघेहीबाळबोलती ॥ प्रत्युत्तरदेतरघुपती ॥ मनांतउपजेबहुप्रीती ॥ कींदोघांप्रतीआलिंगावें ७६ बा
ळभाषणऐकोन ॥ वाटेतयासीद्यावेंचुंबन ॥ याउपरीतेदोघेजण ॥ ह्मणतीबाणसोडींवेगें ७७ तूंक्षत्रियह्मणविसीपूर्ण ॥ गोष्टी
सांगसीयुद्धटाकून ॥ लीलावतारीरघुनंदन ॥ कायबोलेथावरी ७८ तुह्मीदोघेकोणाचेकोण ॥ विद्यादोघांचीसमसमान ॥ वे

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

दशास्त्रपुराणरामायण ॥ कोण्यागुरूनेंपढविलें ७९ धनुर्वेदमंत्रास्त्र ॥ कळाकौशल्ययुक्तीविचित्र ॥ सद्गुरूकोणतुमचापवित्र
नामत्याचेंसांगपां ८० ऐसेंबोलतांरघुनाथ ॥ दोघेगदगदांहांसत ॥ रणींबंधूपडिलेसमस्त ॥ त्याचाखेदसांडिलायेणें ८१ वि
द्यासरलीतुझीसकळिक ॥ रणींपुससीआतांसोयरिक ॥ बंधूपडिलेहाधाक ॥ मनींदचकबैसला ८२ तुजपुसावयाकायकार
ण ॥ सोडींवेगेंनिर्वाणबाण ॥ बंधूंचासूडघेईंपूर्ण ॥ मगसोयरीकविचारीं ८३ ह्मणतीअयोध्येचानृपवर ॥ वधिलेरावणादिअ
सुर ॥ तीअवघीविद्याबाहेर ॥ काढींआजपाहूंदे ८४ आह्मींतंवअसोंकिशोर ॥ तूंपूर्वींचाजुंझार ॥ धनुर्वेदपढविलासमग्र ॥ गु
रुवसिष्ठेंतुजलागीं ८५ तुजएकपत्नीव्रतपूर्ण ॥ सत्कीर्तीजानकीतेसोडून ॥ अपकीर्तीकांवरिलीदाटून ॥ हेंतोंदूषणजाहालें
८६ युद्धकेल्याविणसर्वथा ॥ आह्मीतुजनसोडूंआतां ॥ भयवाटतअसेलचित्ता ॥ तरीपळूनजायअयोध्ये ८७ दाराकुटुंबतुज
नाहीं ॥ आतांसंन्यासघेऊनसुखेंराहीं ॥ मगत्याजनकाचाज्येष्ठजांवाई ॥ कायबोलताजाहला ८८ दोघांचेंतेवढेंचठाण ॥ ह्मा
लाकोणेवंशींउत्पन्न ॥ मातापित्याचीनामखुण ॥ सांगसंपूर्णआह्मासी ८९ तुह्मीसांगाआपुलेंवर्तमान ॥ मगमीतुह्मासीजुंझे
न ॥ यावरीकुशबोलेहांसोन ॥ ऐकेंसावधह्मोउनी ९० जानकीउदरकमळशुद्ध ॥ त्यांतदोघेजन्मलोंमिलिंद ॥ शत्रुकाष्ठेंकोरू
नसुबद्ध ॥ पिष्टकरितोंरणांगणीं ९१ वाल्मीकतातगुरुपूर्ण ॥ तेणेंआमुचेंकेलेंपालन ॥ त्यानंतरेंमौंजीबंधन ॥ करूनवेदपढविले
९२ सकळशास्त्रेंरामचरित्र ॥ धनुर्वेदपढविलासमग्र ॥ तोआमचेमातेचातातपवित्र ॥ वाल्मीकऋषीजाणपां ९३ मातेचे ३
कैवारेंकरूनी ॥ भार्गवेंकेलीनिःक्षत्रअवनी ॥ तैसेंचआह्मीधरिलेंमनीं ॥ करूंअवनीनिर्वीर ९४ कींमातेचेकैवारेंविनतासुत ॥

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

उरगसंहारीतेव्हांसमस्त ॥ तैसेंचकारणयेथ ॥ अह्मासहींनिर्धारें ९५ वनींधाडिलीसीतासती ॥ तैंपासुनिगळालीतुझीश
क्ती ॥ अविवेककेलानिश्चिती ॥ पुनःमागुतींआवरेना ९६ ऐसेंऐकतांरामचंद्र ॥ सीताआठवूनिदयासमुद्र ॥ हृदयपिटूनस
र्वेश्वर ॥ धरणीवरीपडियेला ९७ मूर्छासांवरोनिपुढती मागुतीउठिलारघुपती ॥ पुढेंबिभीषणमारुती ॥ तयांप्रतीपुसतसे ९८
ह्मणेहेकवणाचेनंदन ॥ मगतेबोलतीविचारून ॥ तुझेंप्रतिबिंबपरिपूर्ण ॥ जानकीउदरींजन्मले ९९ चारघटिकासंपूर्ण ॥ नि
वांतराहिलारघुनंदन ॥ सीतासोडिलीत्यादिवसापासून ॥ संपूर्णदिवसमोजिले १०० द्वादशवर्षेंतीनमासपूर्ण ॥ उगाचरा
हिलाजानकीजीवन ॥ तोंलहूकुशदोघेजण ॥ एकाप्रतीएकबोलती १ ह्मणतीवृक्षाआडबैसोन ॥ कायकरीतरघुनंदन ॥ तों
कुशेंसोडिलाएकबाण ॥ वृक्षछेदोनीपाडिला २ हस्तकौशल्यदेखोन ॥ हास्यकरीजगन्मोहन ॥ ह्मणेआह्मालागून ॥ वशन
व्हेतकदापी ३ आतांयुद्धाचिकरावेंयथार्थ ॥ ह्मणोनउभाराहिलारघुनाथ ॥ जेजेबाणसोडित ॥ तेनिर्फळजातआकाशीं ४ वि
मानींइंद्रादिदेवसुरवर ॥ आश्चर्यकरितीतेव्हांथोर ॥ ह्मणतीरामाचेंसामर्थ्यअपार ॥ कायझालेंयासमयीं ५ आकाशींचींअ
स्त्रेंव्यर्थपूर्ण ॥ तैसेनिर्फळजातीरामबाण ॥ मगकुशेंमोहनास्त्रजाण ॥ निजबाणींस्थापिलें ६ तेंमोहनास्त्रयेऊन ॥ रघुनाथहृद
यींभेदलेंपूर्ण ॥ मोहेंविलोकितांपुत्रवदन ॥ मूर्च्छायेऊनपडियेला ७ रघुनाथपडतांभूमंडळीं ॥ एकचिहाकचहुंकडेझाली ॥
पर्वतघेऊनितेवेळीं हनुमंतपुढेंधाविन्नला ८ त्यावरीटाकोनिबाण ॥ मूर्छागतपाडिलानलागतांक्षण ॥ तोंगदाघेऊनबिभीषण ॥
हांकदेतपुढेंआला ९ तोंकुशेंबाणसोडिला ॥ लंकापतीचेहृदयींबैसला ॥ तोंमूर्छितपडियेला ॥ नाहींउरलाकोणीतेथें ११०
मगलहूकुशदोघेजण ॥ आलेरामाजवळीधावोन पितापाहिलाअवलोकून ॥ वंदिलेचरणप्रेमभावें ११ रघुपतीचामुकुटकाढि

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

ला ॥ कुशेंआपुलेमस्तकींघातला ॥ कुंडलेंकौस्तुभकटीमेखला ॥ सर्वहीलेइलाकुशतेव्हां १२ सौमित्राचींभूषणेंकाढोनी ॥
लहुलेइलातेचक्षणीं ॥ मगश्यामकर्णघेऊनी ॥ दिव्यरथींबैसले १३ लहुह्मणेदादापर्येसीं ॥ वानरधरूनआश्रमासी ॥ नेऊन
दाखऊंमातेसी ॥ खेळावयाहोतीलआह्मा १४ मगनळनीळसुग्रीवमारुती ॥ यांचींपुच्छेंधरूनहातीं ॥ जांबुवंतअंगदतेचरिती
वोढीतत्यांसीचालविले १५ आंगेंखरडतभूमीवरी ॥ जांबुवंतह्मणेमारुतीअवधारीं ॥ ऊठवेगेंझडकरी ॥ युद्धकरूंतयासीं १६
मगह्मणेहनुमंत ॥ पुढेंआहेबहुतकार्यार्थ ॥ त्रिभुवननाथसीताकांत ॥ तोहिमूर्छितपडियेला १७ आतांमेलियाचेंमिसिघेऊन
राहाहोईलसीतादर्शन ॥ शक्तीचेंसामर्थ्यदारुण ॥ केलेंविंदाणअतर्क्य १८ आश्रमाआलेकिशोर ॥ रथाखालींउतरलेसत्वर
अळंकारमंडितसुंदर ॥ आश्रमामाजीप्रवेशले १९ कुशसन्मुखदेखिला ॥ जानकीसऐसाभावगमला ॥ कींरघुनाथचिआला
सरसावलामगअंचळ १२० तंवदोघेहीकुमर ॥ साष्टांगघालितीनमस्कार ॥ सीतेसीदाटलागहिंवर ॥ दोघेहीत्हृदयींधरिये
ले २१ सीतेचेकंठींमिठीघालून ॥ दोघेसांगतीवर्तमान ॥ रामासहितबंधूचौघेजण ॥ रणांगणींपाडिले २२ ऐकतांचऐसीमा
त ॥ सीतापडलीमूर्छागत ॥ सवेंचउठलीआक्रंदत ॥त्हृदयपिटीततेवेळे २३ ह्मणेत्रिभुवनेश्वरसांवळा ॥ तोरणींतुह्मांकैसापडि
ला ॥ अरेपितृवधकैसाकेला ॥ जाणोनियांबाळहो २४ मत्स्येंकैसासागरशोषिला ॥ मृगेंद्रजंबुकेंकैसावधिला ॥ दीपतेजेंकाळ
वंडिला ॥ वासरमणिकैसाहो २५ तृणप्रहारेंभंगिलेंवज्र ॥ कींपतंगेंगिळिलावैश्वानर ॥ सर्षपभारेंभोगेंद्र ॥ ग्रीवाकैसीदडप
ली २६ मक्षिकेचापक्षवातसुटला ॥ तेणेंमेरूकैसाउलथोनिपडिला ॥ मुंगीचेमुखवातेंविदारला ॥ प्रळयमेघजैसापां २७ तां
दूळभारेंऐरावत ॥ कैसापडिलाउलथोनिदंत ॥ पुष्पप्रहारेंअद्भुत ॥ पाताळींकूर्मदुखावला २८ तोंकुशतेव्हांबोलत ॥ मातेते

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

आहेतमूर्छागत ॥ आतांउठतीलसमस्त ॥ चिंताकांहींनकरावी २९ आह्मींआणिलींवानरें ॥ उड्याघेतीबहुतसुंदरें ॥ वृक्षास
बांधिलींसमग्रें ॥ पाहींबरेंअंबेतूं १३० मगजगन्मातायेऊनपाहत ॥ तोंहनुमंतनळनीळजांबुवंत ॥ वीरदेखोनिसमस्त ॥ आ
श्चर्यकरीअंतरीं ३१ ह्मणेबाळकांचेंसामर्थ्यदारुण ॥ महावीरआणिलेधरून ॥ आतांयांसवोळखीदेतांपूर्ण ॥ लज्जायमानहो
तीलहे ३२ मगपुत्रांसीह्मणेतेअवसरीं ॥ अरेहेवानरठेवूंनयेघरीं ॥ सोडजाऊंदेवनांतरीं ॥ आपुलियास्वस्थाना ३३ मगभो
वंडिलेपुच्छेंधरून ॥ दूरदीधलेभिरकावून ॥ मगतेमहावीरउठोन ॥ राघवाकडेपळाले ३४ रणींसावधझालारघुवीर ॥ तोंप
डतचिआलेवानर ॥ सांगतीसर्वसमाचार ॥ वाल्मीकाचेआश्रमींचा ३५ आह्मीमूर्छितमीसघेउनी ॥ जाऊनिपाहिलीजनक
नंदिनी ॥ श्यामकर्णदोघांनींनेउनी आश्रमांगणींपूजिला ३६ तुमचामुकुटअलंकार ॥ घेऊनिगेलेदोघेकुमर ॥ जैसासुपर्णेजिं
किलाश्रीवर ॥ तैसेंचयेथेंजाहलें ३७ कींनंदीनेंजिंकिलाउमारमण ॥ कींआपुलेफळभारेंकरून ॥ वृक्षजायजैसामोडोन ॥
तैसेंचयेथेंजाहलें ३८ सूर्यापासूनझालेंआभाळ ॥ तेणेंत्यासआछादिलेंतत्काळ ॥ ऐसेंबोलतांतमाळनीळ ॥ उगाचराहिलाक्ष
णभरी ३९ इकडेवर्तलावृत्तांत ॥ राजासीजुंझलेसुत ॥ उपवनाजवळीबहुत ॥ अपाररणपडियेलें १४० समाचारऐकोनीवि
परीत ॥ तोंपाताळाहूनअकस्मात ॥ वाल्मीकमुनीआलाधांवत ॥ आश्रमापासींआपुल्या ४१ सीतेनेंसांगितलेंसर्ववर्तमान ॥
श्यामकर्णआणिलाधरून ॥ मगवाल्मीकमुनीहांसोन ॥ घेऊनमुनीसहउठिला ४२ रणांगणाप्रतीयेऊन ॥ अद्भुतकरणीके
लीपूर्ण ॥ कमंडलूचेंउदकशिंपोन ॥ दळअवघेंउठविलें ४३ लक्ष्मणभरतशत्रुघ्न ॥ आदिकरूनथोरलाहान ॥ निद्रिस्थाप
रीउठोन ॥ उभेकेलेतेकाळीं ४४ यावरीवाल्मीकेंयेऊन ॥ श्रीरामासीदिधलेंआलिंगन ॥ ह्मणेराघवातूंसर्वज्ञ ॥ कर्तृत्वपूर्ण

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

 तुझेंचहें ४५ सर्वांचागर्वझाडावया ॥ लीलाकेलीत्वांरघुराया ॥ येरवींसीतातुजपासोनियां ॥ दूरकोठेंगेलीपां ४६ अनंत
ब्रह्मांडांचाकर्ता ॥ तोतूंपुरुषरघुनाथा ॥ लटकेंचबाहेरआतां ॥ नेणतपणधरिसीतूं ४७ श्रीरामह्मणेयुद्धकरुनी ॥ दोघांस
जिंकोनसमरंगणीं ॥ म्याआपुलीनिर्वाणकरणी ॥ दाविलीनाहींतयातें ४८ हांसोनिबोलेवाल्मिकऋषी ॥ हस्ताचाढका
लागलानेत्रासी ॥ तरींक्रोधधरूनमानसीं ॥ हस्तकायछेदावा ४९ भोजनकरितांनकळत ॥ जिव्हेसीरुतलादंत ॥ तरीको
णावरीक्षोभतेथ ॥ करावासांगराघवा ५० कनकरुसेकांतीवरी ॥ रत्नप्रभाघालूंइच्छीबाहेरी ॥ काष्ठघेऊनियांमारी ॥ वृ
क्षकायफळातें ५१ गूळगोडीवरीरुसला ॥ प्रवाहासीगंगाधरीअबोला ॥ प्रभेवरीदीपकोपला ॥ तैसादिसेविचारहा ५२
हेजगदात्मयाअयोध्यापती ॥ तववीर्याचीअगाधगती ॥ आत्मैवपुत्रवदेनिश्चिती ॥ वेदश्रुतीराघवा ५३ वाल्मीकाचेबोल
ऐकोन ॥ झालेंराघवाचेंसमाधान ॥ तेदिवसींसीतारमण ॥ राहिलातेथेंपरिवारेंसी ५४ कुशलहूभेटतीरघुनंदना ॥ तोसो
हळापाहावयानयना ॥ सकळराजयांसहितसेना ॥ त्वरेंकरूनधांवती ५५ शत्रुघ्नसुमंतधांवती ॥ हेममयशिबिरेंउभींकरि
ती ॥ अयोध्याजनवेगेंयेती ॥ महोत्साहपाहावया ५६ वसिष्ठादिमुनेश्वर ॥ कौतुकपाहूंआलेसत्वर ॥ हेमांबरसभेसीरघु
वीर ॥ सकळांसहीतबैसला ५७ नित्यनेमसारूनरघुवीर ॥ नूतनवस्त्रेंअळंकार ॥ लेवोनियांश्रीरामचंद्र ॥ सभामंडपींबैस
ला ५८ वाल्मीकआश्रमाप्रतीजाऊन ॥ लहूकुशआणिश्यामकर्ण ॥ राघवापासींआणून ॥ उभेकेलेतेधवां ५९ इंद्रादिदे
वगणपाहती ॥ सर्वत्रसादरविलोकिती ॥ ह्मणतीकेवळरघूत्तमाच्यामूर्ती ॥ दोघेपुत्रदिसतीहे ६० श्यामसुंदरसीतारमण ॥
विशाळभाळसुहास्यवदन ॥ पुत्रांसहितरघुनंदन ॥ समसमानमूर्तित्रय ६१ तोंझालीआकाशवाणी ॥ राघवातवपुत्रह्मणो

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

नी ॥ जयजयकारकरूनी ॥ मस्तकडोलवितीसुरवर ६२ वस्त्रालंकारमंडितपूर्ण ॥ लहुकुशश्रीरामाजवळीयेऊन ॥ हातीं तेसेधनुष्यबाण ॥ घालितीलोटांगणपित्यासी ६३ झालाएकाचिजयजयकार ॥ वृंदारकवर्षतीसुमनसंभार ॥ रामासप्रार्थितीनृपवर ॥ पुत्रासीक्षेमदेइंजे ६४ मगउठोनियांरघुनंदन ॥ हृदयींधरिलेदोघेजण ॥ मस्तकेंकरूनिअवघ्राण ॥ पुढेंघेऊनिबैसला ६५ सकलवेदशास्त्रप्रवीण ॥ वाल्मीकेंकेलेदोघेजण ॥ शतकोटीरामायण ॥ बाळह्मणोनदाविती ६६ त्यावरीआरंभिलेंगायन ॥ अवतारचरित्रेंगहन ॥ तींऐकतांरघुनंदन ॥ सप्रेमझालातेकाळीं ६७ चवदाविद्याचौसष्टीकळा ॥ बाळांहींअभ्यासिल्यासकळा ॥ जैसाकरतळींचाआंवळा ॥ आकळिल्याविद्यातैशाच ६८ वाल्मीकासह्मणेरघुनाथ ॥ धन्यधन्यतुझेंगुरुत्व ॥ दीक्षाभ्यासविधियुक्त ॥ बाळकांसकरविला ६९ वाल्मीकदेतप्रत्युत्तर ॥ तुझेंवीर्यपरमतीव्र ॥ माझेंगुरुत्वासाचार ॥ कायकरीनुसतेंची ७० सौमित्रभरतशत्रुघ्न ॥ सुमंतसुग्रीवबिभीषण ॥ हनुमंतसकळसैन्य ॥ सीताआणावयाचालिले ७१ आश्रमापुढेंयेऊन ॥ घालितिसर्वलोटांगण ॥ वाल्मीकेंबहुतप्रार्थून ॥ सीताआणिलीबाहेरी ७२ सकळहीसद्गदहोऊन ॥ धरितीजगन्मातेचेचरण ॥ पुढेंठेविलेंसुखासन ॥ जानकीसबैसवाया ७३ सकळऋषिपत्न्यांचीपूजाकरूनी ॥ जानकीआरूढेसुखासनीं ॥ समुद्रासभेटावयामंदाकिनी ॥ वेगेंकरूनचालिलीजैसी ७४ ज[illegible]ळीदेखोनिरघुनाथा ॥ खालींउतरलीजगन्माता ॥ वाल्मीकयेऊनितत्वता ॥ रघुनाथाप्रतीबोलतसे ७५ पंचभूतेंशशीआदित्य ॥ रामातूंसाक्षआहेसीत्वहृदयस्थ ॥ निःपापजानकीनिश्चित ॥ आदिमध्यवासिनी ७६ माझीधर्मकुमारीजनककन्या ॥ आजिवरीपाळिलीपरममान्या ॥ आतांतवदर्शनेंझालीधन्या ॥ घरींअर्धांगीइयेतें ७७ मागुतीवदलीआकाशवाणी ॥ सत्यसतीहेजनकनं

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

दिनी ॥ मगश्रीरामें आलिंगोनी ॥ अंकावरी बैसविली १७८ लागलावाद्यांचागजर ॥ मगवाल्मीकासप्रार्थीरघुवीर ॥ घेऊ
निसमागमेंऋषेश्वर ॥ अयोध्येसीचलावें ७९ पूर्णकरावयायज्ञ ॥ सकळीकांमानलेंतेंवचन ॥ मगवाल्मीकादिमुनिजन ॥
दिव्यवहनींबैसविले १८० जानकीसहितरघुनंदन ॥ रथींबैसेजैसाचंडकिरण ॥ दोघेदोहींकडेनंदन ॥ विराजमानपाहाती
८१ मस्तकींविराजेदिव्यछत्र ॥ मित्रपत्रेंअतिविचित्र ॥ निजभक्तअपार ॥ चामरेंवरीढाळिती ८२ मकरब्रिदेंपुढेंचालती ॥
भाटसूर्यवंशवाखाणिती ॥ परमगजरेंरघुपती ॥ अयोध्येप्रतीप्रवेशला ८३ कौसल्यासुमित्राप्रेमेंकरूनी ॥ सीतेसआलिंगि
तीतयेक्षणीं ॥ लहुकुशावरुनी ॥ मुदवोंवाळीकौसल्या ८४ सामग्रीपूर्वींचसिद्धहोती ॥ यज्ञदीक्षाघेऊनरघुपती ॥ पूर्णकेली
पूर्णाहुती ॥ यज्ञसमाप्तजाहला १८५ वस्त्रालंकारदक्षिणाअपार ॥ देऊनिगौरविलेऋषीश्वर ॥ तेवर्णितरघुवीरचरित्र ॥ आ
पुलेआश्रमाप्रतीगेले ८६ रायांसदीधलीपाठवणी ॥ श्रीरामाचीआज्ञाघेऊनी ॥ सीतेचीमहिमावर्णितवदनी ॥ निजनगरा
प्रतीगेले ८७ बिभीषणसुग्रीवप्राणसखे ॥ गौरऊनियांरघुनायकें ॥ आपुलेस्वस्थळाप्रतीसुखें ॥ पाठविलेतेकाळीं ८८ जान
कीकुमारांसमवेत ॥ अयोध्येचेंराज्यकरीरघुनाथ ॥ हीकथाश्रवणकरितांबहुत ॥ अक्षयसुखातेंपाविजे ८९ परमसंकटहरि
णीहेकथा ॥ विजयीहोयश्रोतावक्ता ॥ पाहातांश्रीरामविजयग्रंथा ॥ सर्वचिंताहरेपैं १९० यावरीकथागोडबहुत ॥ लीलाकै
सीदावीरघुनाथ ॥ शेवटींचाअध्याययथार्थ ॥ सादरआतांपरिसावा ९१ चाळीसअध्यायअवघाग्रंथ ॥ त्यांतउत्तरकांडगोडब
हुत ॥ जैसामुकुटावरीमणीझळकत ॥ तैसाअध्यायचाळिसावा ९२ ब्रह्मानंदस्वामीसमर्था ॥ श्रीधरवरदापंढरीनाथा ॥ हा
ग्रंथवाचित्याभक्ता ॥ तूंचरक्षीनिजांगें ९३ स्वस्तिश्री० संमतवा० सदांप० नवत्रिंशतिमो० १९४ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

॥ अथ रामविजय चत्वारिंशोध्याय प्रारंभः ॥

ाअजितकमळा ॥ असुरदमना
ा ॥ मायाचक्रचाळकावि
हरणा ॥ उन्मिळा
नाथाराघवा
यायींक
को

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

अध्याय ४०वा.



लाके
डगोडव
ढरानाथा ॥ हा
० श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

६

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

श्रीगणेशायनमः ॥ श्रीसीतारामचंद्राभ्यांनमः ॥ जयजयरामादीनदयाळा ॥ वृंदारकरकवंद्याअजितकमळा ॥ असुरदमना
परमसंगळा ॥ अचळअढळअविनाशा १ मन्मथवारणविदारकमृगेंद्रा ॥ क्रोधजलदविदारकसमीरा ॥ मायाचक्रचाळकावि
श्वंभरा ॥ भूमिजावराभयनाशका २ अहंकारद्विपंचवक्रदर्पहरणा ॥ मोहघटश्रोत्रसंहारणा ॥ शक्रजितगर्वहरणा ॥ उन्मिळा
जीवनाग्रजारामा ३ जयजयरामासमरधीरा ॥ दुष्टांतकारजनीचरसंहारा ॥ विश्वपाळकाविश्वोद्धारा ॥ अयोध्यानाथाराघवा
४ तवकृपेच्याबळेंसमस्त ॥ संपतआलाश्रीरामविजयग्रंथ ॥ शेवटींचाअध्यायरसभरित वदवींआतांयेथोनी ५ गताध्यायींक
थानिरूपण ॥ संपलेंलहुकुशाख्यान ॥ जानकीआणूनयज्ञ ॥ अश्वमेधसंपविला ६ याउपरीएकेदिनीं ॥ सिंहासनींबैसलाको
दंडपाणी ॥ बंधुवर्गकरजोडूनी ॥ स्वस्थानींउभेराहिले ७ तोंकृतांतभगिनीतीरवासी ॥ द्विजप्रजापातल्यावेगेंसीं ॥ जैसेसुर
क्षीरसागरासी ॥ गाऱ्हाणेंजातीसांगावया ८ तंवभक्तजनसभाभूषित ॥ मुक्तमंडपींबैसलारघुनाथ ॥ जोकोटीकंदर्पतात ॥ दी
नबंधूगुणसिंधू ९ दूतजाणवितीरघुराया ॥ प्रजागांजिल्यातुझिया ॥ येऊंद्याह्मणेलवलाह्यां कोणीपीडिल्यामाझ्याप्रजा १०
तोंमुक्तमंडपासमोर ॥ पातलेतेव्हांप्रजांचेभार ॥ करूनियांजयजयकार ॥ नमस्कारसर्वघालिती ११ उभेराहिलेसमोर ॥ भ्रू
संकेतेंविचारीजगदोद्धार ॥ ह्मणतीदैत्येंगांजिलेंयमुनातीर ॥ क्रूरलवणासुरमाजला १२ महापातकीअत्यंतक्रूर ॥ मरुदैत्याचा
कुमर ॥ भानुजेचेंपैलतीर ॥ तेथेंअसुरअसेसदां १३ प्रजागाईआणिब्राह्मण ॥ चांडाळभक्षीनित्यमारून रघुनाथायासवधून ॥
प्रजाजनसुखीकरीं १४ ऐसेंऐकतांकोदंडपाणी ॥ कोदंडआणवीतयेक्षणीं ॥ आरक्तताउदेलीनयनीं ॥ क्रोधमनींनसांवरे १५

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

तोंशत्रुघ्नपुढेंयेउनी ॥ मस्तकठेविलेंचरणी ॥ ह्मणेमजआज्ञादेउनी ॥ लवणासुरवधाविंजे १६ घेऊनिचतुरंगदळ ॥ वेगेंजायह्म
णेतमाळनीळ ॥ लवणवधोनितत्काळ ॥ प्रजासुखीराखिंजे १७ मंत्रशक्तीदिव्यबाण ॥ बंधूसदेतरघुनंदन ॥ सीताधवाचेचरण
वंदोन ॥ शत्रुघ्नवीरचालिला १८ संग्रामसंकेतभेरी ॥ सेवकींठोकिल्यातेअवसरीं ॥ तीनअक्षोहिणीदळबाहेरी ॥ परमवेगेंनि
घालें १९ नौकाआणोनियांअपार ॥ भानुकन्येचेंलंघिलेंतीर ॥ तोंचहूंकडूनअपार ॥ ऋषीश्वरपातले २० ऋषीह्मणतीहादैत्य
दारुण ॥ पूर्वींमांधातारायासीमरण ॥ याचेहस्तेंआलेंजाण ॥ बळेंकरूननाटोपेहा २१ शत्रुघ्नतेव्हांबोलेवचन ॥ याचेंसंपूर्णसां
गाकथन ॥ ऋषीह्मणतीउमारमण ॥ येणेंपूर्वीआराधिला २२ शंकरेंहातींचादिधलात्रिशूळ ॥ तेणेंबळेंसंहारीविश्वसकळ ॥ त
रीतोत्रिशूळघेतांतत्काळ ॥ मरणत्यासतेणेंची २३ तोशूळठेऊनिवनकांतारीं ॥ आहारालागींहिंडेदिवसरात्री ॥ श्वापदेंगोब्रा
ह्मणामारी ॥ शोधूनियांसाक्षेपें २४ तरितोकाळसाधून ॥ आदींच्यावेंत्याचेंसदन ॥ त्रिशूळहातींचढलियाजाण ॥ बळक्षीणन
होयत्याचें २५ त्याचियाभयेंकरून ॥ वोसपडिलेंमथुरापट्टण ॥ शत्रुघ्नेंऋषिवाक्यऐकून ॥ काळसाधूनचालिला २६ लवणा
सुरनसतांसदनीं ॥ मंदिरतयाचेंउघडोनी ॥ त्रिशूळठेविलाहोतापूजोनी ॥ उचलीतेक्षणींदाशरथी २७ त्रिशूळघेऊनिकैकेयी
नंदन ॥ दळभारसिद्धकरीसंपूर्ण ॥ उभाठाकलातोलवण ॥ वनाहूनपातला २८ गोब्राह्मणमारुनी ॥ प्रेतभारमस्तकींघेउनी ॥
सदनवेष्टिलेंदेखेनयनीं ॥ मानववीरींतेधवां २९ देखोनियांमानवभार ॥ परमआनंदलालवणासुर ॥ ह्मणेईश्वरेंमजआहार ॥
सदनाप्रतीपाठविला ३० कृतांतवतहांकफोडुनी ॥ परमक्रोधेंआलाधांउनी ॥ तोंत्रिशूळदेखिलानयनी ॥ शत्रुघ्नहातींतेधवां

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

३१ मगक्रोधावलालवण ॥ ह्मणेतूंमनुष्याचानंदन ॥ तुजमारूनअयोध्यापट्टण ॥ क्षणमात्रेंघेईनआतां ३२ मातुळमाझारावण
शमेंमारिलाकपटेंकरून ॥ परीत्याराघवासीआतांवधून ॥ सीताआणीनबळेंची ३३ तुह्माचौघांसमारून ॥ मातुळाचासूडघेई
न ॥ आतांप्रथमअवदान ॥ तुझेंचघेईनशत्रुघ्ना ३४ लवणासीह्मणेशत्रुघ्न ॥ मशकातुजयेथेंचिवधीन ॥ जैसामरावयामत्कुण ॥
उशीरकांहींनलागेची ३५ वृक्षउपडोनीसत्वर ॥ वेगींधांवलालवणासुर ॥ तोंशत्रुघ्नेंसोडिलाशर ॥ चापावरीलावूनियां ३६ ते
णेंवृक्षछेदिला ॥ असुरेंपर्वतभिरकाविला ॥ तोहीकैकेयीनंदनेंपाडिला ॥ क्षणमात्रनलागतां ३७ कोट्यानकोटीबाण ॥ शत्रु
घ्नेंमोकलिलेदारुण ॥ परितेनमानीचलवण ॥ बाणतृणवतज्याअसती ३८ जैसाअपारवर्षतघन ॥ तैसालवणवर्षेबाण ॥ तेवर
चेवरतोडोन ॥ शत्रुघ्नवीरटाकीतसे ३९ मगशत्रुघ्नेंतयेवेळां ॥ बाणविचारूनकाढिला ॥ जोकमळासनेंनिर्मिला ॥ मधुकैटभव
धालागीं ४० रघुपतीसतोबाणतत्वता ॥ कमळासनेंदिधलाहोता ॥ तोलवणवधावयासीनिघतां ॥ रामेंदिधलाशत्रुघ्ना ४१ तो
बाणशत्रुघ्नेंसोडिला ॥ जैसीअकस्मातप्रकटेचपळा ॥ तैसाचापापासोनिसुटला ॥ वेगेंआलालवणावरी ४२ तेणेंडळमळिलें
भूमंडळ ॥ विमानदेवांससुटलापळ ॥ वज्रेंचूर्णहोयअचळ ॥ तैसाहृदयींभेदला ४३ मेरूवरूनिपडेऐरावत ॥ तैसाझालाअ
सुरदेहपात ॥ प्राणनिघोनिगेलात्वरित ॥ पडिलेंप्रेतधरेवरी ४४ जयपावलाशत्रुघ्न ॥ सुमनेंवर्षतीसुरगण ॥ तत्काळमथुराप
ट्टण ॥ प्रजानेऊनभरियेलें ४५ जैसेंअयोध्यापुरपट्टण ॥ तैसेंचमथुरानगरजाण ॥ देशभरलेसमग्रपूर्ण ॥ दुःखदरिद्रपळालें ४६
जयपावलाशत्रुघ्न ॥ कळलेंरघुपतीसवर्तमान ॥ छत्रचामरादिसंपूर्ण ॥ राजचिन्हेंपाठविलीं ४७ शत्रुघ्नावरीधरूनछत्र ॥ केला

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

मथुरेचानृपवर ॥ समुद्रपर्यंतसमग्र ॥ देशतयासीदीधला ४८ तोंअयोध्येमाजीतेवेळे ॥ एकनवलपरमवर्तलें ॥एकादशसह
स्रवर्षेंकेलें ॥अयोध्येचेंराज्यश्रीरामें ४९ रामराज्यामाजीमृत्य ॥ अकाळींनसेचसत्य ॥ परीएकब्राह्मणाचासुत ॥ मरणअक
स्मातपावला ५० झालेंत्याचेंव्रतबंधन ॥ तोसवेंचपावलामरण ॥ तंवपित्यानेंउचलोन ॥ राजद्वाराआणिला ५१ राघवासह्म
णेब्राह्मण ॥ त्वांकायकेलेंदोषाचरण ॥अकाळींपावलामरण॥ करींप्रयत्नलवकरी ५२ परमचिंताक्रांतरघुनाथ॥ तंवपातलाक
मळोद्भवसुत ॥ सीताकांतेंवृत्तांत ॥ नारदासीसांगीतला ५३ नारदह्मणेजानकीपती ॥ कोणीतपकरितोशूद्रजाती ॥ त्यातपें
करूननिश्चिती ॥ द्विजकुमरनिमाला ५४ तपकरणेंहाब्राह्मणाचाधर्म ॥ इतरांसीतोसहजचिअधर्म॥ शूद्रतपआचरतांपरम॥
अकाळींमरणहोयपैं ५५ ऐसेंबोलतांब्रह्मनंदन ॥ रामचिंतीपुष्पकविमान ॥ तोंतत्काळआलेंधांवोन ॥ रामेंबाहिलेंह्मणोनी ५६
प्रधानसेनेसहिततात्काळ ॥ वरीआरूढेतमाळनीळ ॥ शोधूंलागलापृथ्वीमंडळ ॥ गुहाअचळकठीणस्थानें ५७ जोजोतपस्वी
दृष्टींदिसे ॥ त्यासकोणजातीराघवपुसे ॥ तंवतेबोलतीत्यासरसे ॥ श्रेष्ठवर्णब्राह्मणपैं ५८ तयांसराघवनमून ॥ मगकरीतयांचें
पूजन ॥ याचपरीऊर्वीसंपूर्ण ॥ रघुनंदनशोधीतसे ५९ मगदक्षिणपंथेंशोधीश्रीराम ॥ तोंवृक्षलागलेपरम ॥ गिरिकंदरींएक
अधम ॥ किराततपकरीतसे ६० आरंभिलेंधूम्रपान ॥ तयासपुसेजनकजारमण ॥ ह्मणेंवदेंकांकोणवर्ण तपकिमर्थआरंभिलें
६१ मगतोह्मणेमीकिरात ॥ स्वर्गानिमित्ततपकरितोंयेथ ॥ ऐकतांकोपलाजानकीकांत ॥ ह्मणेहाआचरेपरधर्म ६२ बाणती २
क्ष्णपरमचपळ ॥ काढोनिछेदिलेकंठनाळ ॥ तोउद्धरूनितत्काळ ॥ स्वर्गलोकपावला ६३ तोंविमानींबैसोनिअमरनाथ ॥ रघु

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

नाथासीयेऊनिभेटत ॥ ह्मणेबरावधिलाकिरात ॥ पुरलेमनोरथदेवांचे ६४ सीतावल्लभरघुनंदना ॥ पुराणपुरुषागुणसंपन्ना ॥
मजकांहींकरावीआज्ञा ॥ तेंमीसिद्धीपाववीन ६५ रघुनाथह्मणेऋषिनंदन ॥ अयोध्येंतपावलामरण ॥ तयासीद्यावेंजीवदान
स हस्त्रनयनअवश्यह्मणे ६६ इंद्रआज्ञेंकरून ॥ परतलाद्विजपुत्राचाप्राण ॥ जैसाग्रामाजायपंथींहून ॥ येईपरतोनमाघारा
६७ बहुतांचेसुतत्यावेळे ॥ पूर्वींहोतेनिमाले ॥ तेहींइंद्रेंआणोनिदीधले ॥ तद्रुपतैसेचपूर्ववत ६८ उसणीजेवीवस्तूनेत ॥
ती परतोनीतैसीचदेत ॥ तेवीतयांचेसुत ॥ अमरेश्वरेंदीधलें ६९ असोइकडेअयोध्यापती ॥ अगस्तीच्याकाननाप्रती ॥ जाता
झालासहजगती वनेंउपवनेंविलोकित ७० तोंपुढेंदोनपक्षीयेऊन ॥ राघवासीघालितीलोटांगण ह्मणतीआमचावादनिवडो
न ॥ पुढेंगमनकरावें ७१ तेंरघूत्तमेंऐकोन ॥ स्थीरकेलेंविमान ॥ तोंउलूकगृध्रदोघेजण ॥ बोलतेझालेतेधवां ७२ दिवाभीतबो
लेवचन ॥ गृहमाझेंपूर्वींहूनं ॥ हागृध्रमजदवडून ॥ बळेंचयेथेंनांदतो ७३ मगगृध्रबोलत ॥ उगेंचमजपीडीदिवाभीत ॥ गृहमा
झेंयथार्थ ॥ बहुकाळयेथेंची ७४ प्रधानासह्मणेसीतावर ॥ याचावादनिवडावासत्वर ॥ सत्यनिवडोनमंदिर ॥ ज्याचेंत्यासदेइं
जे ७५ तोंगृध्रबोलेपापमती ॥ जीयेथेंपृथ्वीनवती ॥ तोंयावृक्षावरीनिश्चिती ॥ गृहमाझेंम्यांरचियेलें ७६ दिवाभीतबोलेवचन
ईश्वरेंपृथ्वीकेलीनिर्माण ॥ मगवृक्षवाढलापूर्ण ॥ मगम्यागृहनिर्मिलें ७७ प्रधानह्मणेगृध्रसत्य ॥ बहूतकाळाच्यागोष्टीसां
गत ॥ ऐकोनिहांसलारघुनाथ ॥ ह्मणेंकेंविहाअर्थनिवडिला ७८ पृथ्वीवृक्षासआधार ॥ पृथ्वीचेंआश्रयेंतरुवर ॥ दुरात्मा
गृध्रसाचार ॥ उलूकालागींपीडीतसे ७९ निवडूनियथार्थव्यवहार ॥ श्रीरामउलूकासीदेतमंदिर ॥ ह्मणेंहागृध्रचांडाळस

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

त्वर ॥ त्यासवधीनमीआतां ८० बाणकाढिलातीक्ष्णतेक्षणीं ॥ तंवगर्जेआकाशवाणी ॥ ह्मणेहेरामकोदंडपाणी ॥ यासीनमारा
सर्वथा ८१ हापूर्वींभूपतीब्रह्मदत्त ॥ गौतमऋषीचाअंकित ॥ तोंयाचेंसदनाअकस्मात ॥ भोजनाआलागौतमगुरू ८२ तयासी
याणेंमांसदिधलें ॥ देखोनिगुरूचेंमनक्षोभलें ॥ तयानेंयासशापिलें ॥ गृध्रहोयह्मणोनी ८३ मगहालागलागुरूचेचरणीं ॥ उ
शापबोलेगौतममुनी ॥ रामदर्शनहोतांतयेंक्षणीं ॥ जासीउद्धरुनसर्वथा ८४ ऐसेंदेववाणीजंवबोलत ॥ तोंविमानपातलें
अकस्मात ॥ दिव्यदेहपावलादेवदत्त ॥ भावेंनमीरामचंद्रा ८५ स्तवोनियांकोदंडपाणी ॥ तत्काळबैसलाविमानीं ॥ रघु
वीरप्रतापेंकरुनी ॥ दिव्यदेहपावला ८६ असोकलशोद्भवाचेआश्रमाप्रती ॥ येताझालाअयोध्यापती ॥ साष्टांगनमूनऋषी
प्रती ॥ राघवउभाराहिला ८७ बहूतकरूनआदर ॥ आश्रमींपूजिलारघुवीर ॥ हस्तकंकणएकसुंदर ऋषीनेंदीधलेंराघवा
८८ पृथ्वीचेंमोलसंपूर्ण ॥ एकएकजडलेंरत्न ॥ सीतावल्लभेंदेखोन ॥ घटोद्भवाप्रतीपुसे ८९ ह्मणेयासीनिर्मिताचतुरानन ॥
हेस्वर्गवस्तुप्रभाघन ॥ मनुष्यासीदुर्लभपूर्ण ॥ तुह्मासकैसीलाभली ९० मगअगस्तीकथासांगत पैलतेंसरोवरींप्रेत ॥ हावि
दर्भदेशींचानृपनाथ पुण्यवंततपोराशी ९१ दानकेलेंअपरिमित ॥ श्रीरामातपआचरलाबहुत परीअन्नदानाकिंचित ॥ घडलें
नाहींत्यापासुनी ९२ स्वर्गासगेलातोनृपनाथ ॥ परीक्षुधेनेंपीडिलाअत्यंत ॥ मगतयासीह्मणेपद्मजात ॥ नाहींभिक्षार्थतुजयेथें
९३ तूंनाहींकेलेंअन्नदान ॥ येथेंनपाविजेदिधल्याविण ॥ तरीतूंभूतहोऊन ॥ आपुलेंप्रेतभक्षींकां ९४ तूंभक्षितांनित्यकाळ ॥
मांसवाढेलबहुसाल ॥ मगतोविमानींबैसोनभूपाळ ॥ नित्यकाळयेततेथें ९५ आपुलेंप्रेतभक्षून ॥ स्वर्गासजायपरतोन ॥ अ

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

न्नोदकाएवढेंदान ॥ दुजेनाहींराघवा ९६ भाग्यवैराग्यनिश्चित ॥ दैवततेंसद्गुरुनाथ॥ शांतिसुखाहूनअद्भुत ॥ दुजेंसुखनसे
ची ९७ तिथीमाजीद्वादशीश्रेष्ठ ॥ कींमंत्रामाजीगायत्रीवरिष्ठ ॥ कींतीर्थामाजीसुभट ॥ प्रयागथोरजैसाकां ९८ तैसेंदानामा
जीअन्नदान राघवाअत्यंतश्रेष्ठपूर्ण ॥ असोरायासीकमळासन ॥ बोलताझालातेकाळीं ९९ ह्मणेअगस्तीचेंदर्शन ॥ होतांतुझें
कर्मखंडेलजाण ॥ तोंएकेदिवसींयेऊन ॥ प्रेतभक्षीतसेनृपवर १०० तेंम्याअकस्मातदेखिलें ॥ कृपेनेंहृदयमाझेंद्रवलें ॥ मग
म्यातयावरदानदीधलें ॥ कर्मखंडलेंतयाचें १ मगतोवैदर्भराजातेथून ॥ करीस्वर्गींअमृतपान ॥ तेणेंगुरुपूजनसंपूर्ण ॥ मजहें
कंकणदीधलें २ देवांचेअंशरत्नावरी ॥ चिंतितमनोरथसिद्धकरी ॥ ऐसेंऐकोनिअयोध्याविहारी ॥ घालीकरींकंकणतें ३ राघ
वह्मणेमहाऋषी ॥ दंडकारण्यह्मणतीतयासी ॥ याचीपूर्वकथाअसेकैसी ॥ तेंमजपासींसांगिजे ४ अगस्तीह्मणेराघवाऐक ॥
मनूचापुत्रविश्वक ॥ तयाचापुत्रदंडक ॥ रावनिघालामृगयेसी ५ काननींऋषीआश्रमबहुत ॥ दंडकजायपाहातपाहात ॥ तं
वभृगुआश्रमदेखत ॥ शोभिवंतअत्यंतजो ६ तेथेंरावबैसलाक्षणभरी ॥ तंवभृगूनवतांमंदिरीं ॥ घरींतयाचीहोतीकुमरी ॥ आ
राजानामतयेचें ७ देखोनियांएकांत ॥ कामातुरझालानृपनाथ ॥ परीतिबाळकुमारीअसत ॥ दशवर्षवयाची ८ दंडकेधरूनियां
बळें ॥ ऋषिकन्येसीभोगिलें ॥ शरीरातियेचेंअचेतनपडलें ॥ दंडकगेलातेथुनीं ९ भृगुआश्रमाजंवयेत ॥ तंवदेखेकन्यामूर्च्छि
त ॥ ऋषीसवार्तासांगतीसमस्त ॥ दंडकेअनर्थकेलाहा १० ऋषीक्षोभलाजैसाकृतांत ॥ दंडकासितेव्हांशापित ॥ सेनाप्रजा
देशसमस्त ॥ वनेंपट्टणेंसर्वही ११ वृक्षतोयतृणधान्य ॥ तुझेंवंशासहितप्रधान ॥ चांडाळाजायरेभस्महोऊन ॥ सप्तदिननला

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

गतां १२ ऐसेंबोलिलाविप्रोत्तम ॥ तैसेंचसर्वहीझालेंभस्म ॥ नाहींउरलेंवृक्षाचेंनाम ॥ पक्षीतो यमगकैंचें १३ बहुतकाळपर्यं
त ॥ शून्यदेशपडलासमस्त ॥ पुढेंनारदें कलहबहुत ॥ पर्वतांमाजीलाविला १४ मेरूआणिविंध्याचळ उंचावलेभांडतीसबळ
खळबळलेंसूर्यमंडळ॥हाहाःकारसृष्टीवरी १६ विंध्याद्रीनाटोपेसाचार ॥ सूर्याविणपडिलाअंधःकार ॥ मगमिळोनीऋषीनिर्जं
र॥ मजप्रतीयेऊनिप्रार्थिती १६ तुजविणाविंध्याचळ॥ कोणासीनाटोपेसबळ॥ तूंदक्षिणेसजायींतत्काळ॥ तीर्थयात्राकराव
या १७ मगमीवाराणसीटाकूनित्वरित ॥ दक्षिणेसआलोंऋषींसहित ॥ मजदेखतांविंध्याचळपडत ॥ आडवापृथ्वीवरी १८
तयासबोलिलोंवचन ॥ जोंमीमाघारायेईनपरतोन ॥ तोंवरीनउठावेंयेथून ॥ उठल्याशापीनक्षणार्धें १९ शापधाकेंपर्वत ॥
अद्यापीनंउठेचयथार्थ ॥ मगउगवलाआदित्य ॥ लोकसमस्तसुखीझाले १२० तेहेंदंडकारण्यवोस ॥ ऋषींसहम्याकेलावास
इंद्रासांगूनबहुवस ॥ मेघवृष्टीकरविली २१ आणिधनधान्यबीजेंबहुत ॥ तेंहींवर्षलाअमरनाथ ॥ मगहादेशवसलाअद्भुत ॥
दोषदुष्काळनसेची २२ त्यापासूनिदंडकारण्य ॥ राघवाह्मणतीयालागुन ॥ असोऋषीचीआज्ञाघेऊन ॥ रघुनंदननिघाला
२३ पुष्पकारूढहोऊन ॥ अयोध्येसीआलापरतोन ॥ तोंऋषीश्वरकुमरघेऊन ॥ रामदर्शनापातला २४ ह्मणेधन्यधन्यरघु
वीराकेलें ॥ मृतपुत्रामाघारेंआणिलें ॥ यशाचेपर्वतउंचावले ॥ मेरूहूनिआगळे २५ मुक्तमंडपींरघुनाथ ॥ शोभलातेव्हांजान
कीसहित ॥ भोंवतेबंधूवेष्टित ॥ पुढेंहनुमंतउभासदां २६ श्रीरामविजयग्रंथपावन ॥ उत्तरकांडसुरसगहन ॥ पुढेंनिजधामागे
लारघुनंदन ॥ हेंअनुसंधाननवर्णावें २७ तोंमाध्यान्हींप्रकटोनीरघुनाथ ॥ ह्मणेयेथोनिकरींग्रंथसमाप्त ॥ अवतारसंपलाहेंचरि ४

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

मीजन्ममरणातीत ॥ अभंगअक्षयशाश्वत ॥ तोंचमीब्रह्मानंदपंढरीनाथ ॥ भीमातीरींउभाअसें
त्र ॥ रामविजयींनसांगावें २८ मीजन्ममरणातीत ॥ अभंगअक्षयशाश्वत ॥ तोंचमीब्रह्मानंदपंढरीनाथ ॥ भीमातीरींउभाअसें
२९ टाकूनियांचापशर ॥ दोनीजंघांवरीठेवूनिकर ॥ समपादसमनेत्र ॥ उभासाचारमीयेथें १३० ऐसीआज्ञाहोतांसत्वर ॥
श्रीधरेंघातलानमस्कार ॥ करूनियांजयजयकार ॥ रामविजयग्रंथसंपविला ३१ चाळीसअध्यायग्रंथतत्वता ॥ तुजप्रतीपावो
पंढरीनाथा ॥ ब्रह्मानंदपददेईंआतां ॥ जगदात्मयाजगद्गुरू ३२ वाल्मीकिकृतमूळग्रंथ ॥ हनुमंतकाव्यगोडबहुत ॥ आणिक
सत्यवतीसुत ॥ रामकथाबोलिला ३३ तेर्थींचेंसंमतघेउनी ॥ पंढरीनाथेंकृपाकरूनी ॥ सांगीतलेंकर्णींयेऊनी ॥ तेंचलिहिलेंसा
क्षेपें ३४ रामविजयवरदग्रंथ ॥ याचाकर्तापंढरीनाथ ॥ श्रीधरनामहेंनिमित्त ॥ पुढेंकेलेंउगेंची ३५ याग्रंथासवरदान ॥ पंढरी
नाथेंदिधलेंआपण ॥ वाचितीपढतीजेअनुदिन ॥ होयज्ञानअद्भुततयां ३६ ज्यासवोढवतांसंकटमहाविघ्न ॥ तरीतेणेंकरितांए
कआवर्त्तन ॥ तत्काळसंकटजायनिरसोन ॥ वातेंकरूनअभ्रजैसें ३७ पांचआवर्त्तनेंकरितांपूर्ण ॥ जायमहाव्याधीनिरसोन ॥
संततीसंपत्तीधन ॥ पावेलसत्यनिर्धारीं ३८ होऊनियांशुचिर्भूत ॥ दाहाआवर्त्तनेंकरितांसत्य ॥ पोटींहोईलदिव्यसुत ॥ रघुना
थभक्तप्रतापी ३९ जरीनहोयश्रवणपठण ॥ नित्यकरितांग्रंथपूजन ॥ त्यागृहींचेंसंकटपूर्ण ॥ आंगेंहनुमंतनिवारी १४० अ
द्यापीचिरंजीवहनुमंत ॥ जेरघुनाथकथावाचितभक्त ॥ त्यांसअंतरबाह्यरक्षित ॥ उभातिष्ठतत्यांपासीं ४१ करितांरामकथा
श्रवण ॥ सप्रेमसदांवायुनंदन ॥ ग्रंथवाचितांपुढेंजाण ॥ करजोडूनिउभाराहे ४२ शुचिर्भूतहोउनी ॥ रामविजयउसांघेउनी
निद्राकरितांस्वप्नीं ॥ मारुतीदर्शनदेतसे ४३ ऐसाग्रंथाचायाचमत्कार ॥ जाणतीरामउपासकनर ॥ आधिव्याधीदुःखदरिद्र ॥

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

जायसमस्तग्रंथसंग्रहें ४४ बाळकांडआठअध्यायवरी ॥ अयोध्याकांडअध्यायचारी ॥ चारअध्यायनिर्धारीं ॥ अरण्यकांडप्रचंड ४५ दोनअध्यायकिष्किंधाकांड ॥ तेथोनिपांचवाअध्यायवितंड ॥ सुंदरकांडप्रचंड ॥ लीलाचरित्रमारुतीचें ४६ दहाअध्यायसंपूर्ण ॥ युद्धकांडरसाळगहन ॥ सातअध्यायपावन ॥ उत्तरकांडजाणावें ४७ ऐसेअध्यायचाळीस ॥ मिळूनरामविजयझालासुरस ॥ श्रवणकरितांआसमास ॥ ब्रह्मानंदउचंबळे ४८ प्रथमाध्यायींमंगळाचरण ॥ गणेशसरस्वतीगुरुस्तवन ॥ वाल्मीकाचीउत्पत्तीसांगोन ॥ प्रथमाध्यायसंपविला ४९ बंधूसहितनिश्चिती ॥ सांगीतलीरावणाचीउत्पत्ती ॥ दशरथलग्नाचीगती ॥ द्वितीयाध्यायींनिरूपिली १५० श्रावणवधशृंगींचेंआगमन ॥ यागदशरथेंकेलापूर्ण यांवरीहनुमंतजन्मकथन ॥ तृतीयाध्यायीं हेचिकथा ५१ कौसल्यासुमित्राकैकेयीप्रती ॥ डोहळेपुसोगेलानृपती ॥ श्रीरामजन्मध्यानास्थिती ॥ चतुर्थाध्यायींहेचिकथा ॥ ५२ श्रीरामाचेंमौंजिबंधन ॥ ब्रह्मचर्यतीर्थाटण ॥ विश्वामित्रमागेरघुनंदन ॥ हेंनिरूपणपंचमध्यायीं ५३ योगवासिष्ठकथून ॥ मायेनेंगाधिजकेलादीन वेदांतकेलानिरूपण ॥ सहावासंपूर्णजाणावा ५४ ताटिकामर्दूनियागरक्षिला ॥ अहिल्याउद्धारपुढें केला ॥ सीतेचाजन्मसांगितला ॥ सातव्यामाजीसंपूर्ण ५५ आठव्यामाजीसीतास्वयंवर ॥ अपमानिलादशकंधर ॥ लग्नलागोनिजिंकिलापरशधर ॥ आलारघुवीरअयोध्ये ५६ राज्यींबैसतांरघुनाथ ॥ कैकेयीनेंकेलाअनर्थ ॥ त्याकरितांदुःखीदशरथ नवमोध्यायींहेकथा ५७ श्रीरामवनासीनिघाला ॥ कौसल्येनेंशोककेला ॥ जान्हवीतीराश्रीरामआला ॥ दशमाध्यायींहेचिकथा ५८ मगदशरथेंत्यागिलाप्राण ॥ भरतआलामातुळगृहाहून ॥ भक्तिरसदिव्यनिरूपण ॥ गोडबहुतअकरावा ५९ चित्रकू

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

टपर्वतींभेटलारघुनंदन ॥ भरतेंबहुतकेलेंस्तवन ॥ नंदिग्रामींभरतस्थापून ॥ हेंचिकथनद्वादशाध्यायीं ६० बहुतऋषींचेंद
र्शन ॥ घेताझालारघुनंदन ॥ अगस्तीचामहिमापूर्ण ॥ तेराव्यांतकथियेला ६१ शूर्पनखेचेंविटंबन वधिलात्रिशिराखरदूषण
दशमुखासीवर्तमान ॥ हेचिकथाचवदाव्यांत ६२ मृगवधूंगेलारघुनंदन ॥ सीताघेऊनिजायरावण ॥ जटायूवधिलाकपटेंक
रून ॥ पंधराव्यांतहेचिकथा ६३ सीताविरहेंरामव्यापिला ॥ त्यावरीजटायूउद्धरिला ॥ पंपासरोवरींरामआला ॥ सोळावा
झालायेथुनी ६४ वाळीसुग्रीवाचीउत्पत्ती ॥ शक्रसुतावधीरघुपती ॥ सत्रावेंअध्यायींनिश्चिती ॥ हेचिकथरसाळपरिकर ६५
तारेप्रतीबोधकरून ॥ शुद्धीसगेलावानरगण ॥ समुद्राचेतीरींसंपातीदर्शन ॥ हेंनिरूपणअठराव्यांत ६६ समुद्रउल्लंघूनिलं
काशोधून ॥ रावणसभाविटंबून ॥ विजयीझालारघुनंदन ॥ हेंचरित्रएकुणिसाव्यांत ६७ हनुमंतासर्सीतादर्शन ॥ विध्वंसि
लेंअशोकवन ॥ वधिलाअखयाआणिराक्षससंपूर्ण ॥ हेचिकथाविसाव्यांत ६८ इंद्रजिताचेंविटंबन ॥ पुच्छेंकेलेंलंकादहन ॥
किष्किंधेसीआलाअंजनीनंदन ॥ हेचिकथाएकाविसाव्यांत ६९ ब्रह्मपाशबंधन ॥ मीसघेऊनिवायुनंदन ॥ सागरींपुच्छविझ
वून ॥ सुवेळेसीपातला ७० ब्रह्मपत्रवाचून ॥ समुद्रतीरासआलारघुनंदन ॥ मगबिभीषणेंबोधिलारावण ॥ हेचिकथाबाविसा
व्यांत ७१ मगबिभीषणभेटेश्रीरामासयेऊन ॥ सागरदर्शनसेतुबंधन ॥ सुवेळेसीआलारघुनंदन ॥ हेंचिनिरूपणतेविसाव्यां
त ७२ कापट्यदाविलेंसीतेसी ॥ मंदोदरीभेटलीजनककन्येसी ॥ मगसुग्रीवेंत्रासिलेंरावणासी ॥ कथाहेचिचोविसाव्यांत
७३ अंगदआलारावणाबोधून ॥ नंतरयुद्धझालेंदारुण ॥ नागपाशींबांधिलेंरामलक्ष्मण ॥ हेंचरित्रपंचविसाव्यांत ७४ ग्रह

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

स्तवधमंदोदरीनीती ॥ मगयुद्धाआलालंकापती ॥ तोपराभवलानिश्चितीं ॥ हेंचरित्रसव्विसाव्यांत ७५ जागाकेलाकुंभक
र्ण ॥ त्यावरीयुद्धझालेंदारुण ॥ समरींघटश्रोत्रेंदिधलाप्राण ॥ हेंनिरूपणसत्ताविसाव्यांत ७६ नरांतकादिसाहजणपाडि
ले ॥ शक्रजितेंशरजाळसोडिलें ॥ मारुतीद्रोणाचळआणितेवेळे ॥ अठ्ठाविसाव्यांतहेचकथा ७७ निकुंबळेसीजाऊन ॥ वान
रींहोमाविध्वंसून ॥ शक्रजितासमारिलक्ष्मण ॥ एकुणातिसाव्यांतहेचकथा ७८ तिसाव्यांतसुलोचनागाहिवर एकतिसाव्यां
तअहिमहीसंहार ॥ शक्तीभेदोनिनिर्धार ॥ बत्तिसावासंपूर्ण ७९ रावणाचाहोमविध्वंसून ॥ अपारमाजविलेंरण ॥ रावण
वधोनिस्थापिलाबिभीषण ॥ हेंचपूर्णतेहेतिसाव्यांत ८० जानकीसादिव्यदेऊन ॥ मगइंद्रवर्षलाअमृतपर्जन्य ॥ देवस्वस्थाना
गेलेस्तवून ॥ हेकथाचौतिसाव्यांत ८१ पुष्पकींबैसोनिरघुनंदन ॥ घेतलेंअगस्तीचेंदर्शन ॥ त्यावरीभरतभेटीपूर्ण ॥ हेंच
रित्रपस्तिसाव्यांत ८२ मगराघवनंदिग्रामास ॥ जाऊनकेलाअयोध्याप्रवेश ॥ राज्यींस्थापिलाश्रीरामास ॥ उत्तममुहूर्त्तपाहू
नियां ८३ छत्तिसावेअध्यायींजाण ॥ हेचिकथाअसेपूर्ण ॥ त्यावरीतीनअध्यायगहन ॥ लहूकुशाख्यानगोडपैं ८४ चालि
साव्यांतरघुवीरें ॥ मृत्युपावलींऋषीचींबाळें ॥ किरातवधोयांनित्वरें ॥ बाळेंमाघारींआणिलीं ८५ चाळीसअध्यायपर्यंत ॥
रामविजयसंपूर्णग्रंथ ॥ श्रवणमननेपुरेंअर्थ ॥ जाणतीपंडितविवेकी ८६ रामविजयग्रंथनृपनृपती ॥ चाळीसअध्यायवीरनि
श्चिती ॥ दोषदळसंहारिती ॥ प्रचंडप्रतापीवीरहे ८७ रामविजयग्रंथसुंदर ॥ हेंचाळीसखणाचेंमंदिर ॥ सितेसहितरघुवीर ॥
क्रीडाकरीततयावरी ८८ कींहेंचाळीसखणाचेंवृंदावन ॥ रघुनाथकथातुळसीपूर्ण ॥ दृष्टांततींपत्रेंजाण ॥ आवर्तप्रदक्षिणा

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

भक्तकरिती ८९ रामविजयग्रंथमंदिर ॥ चाळीसकोठड्याअतिसुंदर ॥ साहित्यद्रव्यअपार ॥ त्यामाजींभरलेंनगणवें ९०
कींग्रंथहावासरमणी ॥ वेष्टिलाअसेदृष्टांतकिरणी ॥ कींसाहित्यतारांगणीं ॥ अर्थचंद्रेंवेष्टिला ९१ कींग्रंथहाचिरघुवीर ॥
दृष्टांतत्याचेवानर ॥ मारुतीअसेअजरामर ॥ विजयरूपसर्वदा ९२ रामविजयमांदुसआणिली ॥ आंतहोतींचाळीसकोह
ळीं ॥ नवरत्नद्रव्येंपूर्णभरलीं ॥ मजदीधलींब्रह्मानंदें ९३ पळालेंभवदुःखदरिद्र ॥ भाग्यघराआलेंअपार ॥ कींग्रंथहापं
ढरीनगर ॥ दृष्टांतअपारयात्रातेथें ९४ रामविजयग्रंथखाणी ॥ वर्णितांधन्यझालीवाणी ॥ ब्रह्मानंदकृपेकरुनी ॥ ग्रंथसिद्धी
सपावला ९५ आनंदसांप्रदायपूर्ण ॥ वाढतआलेंमुळींचेंज्ञान ॥ सृष्टीआदिचतुरानन ॥ उपदेशिलानारायणें ९६ पद्मोद्भ
वेंतेंचिज्ञान ॥ अत्रीसदिधलेंसंपूर्ण ॥ त्याचेपोटींआदिपुरुषजाण ॥ दत्तात्रयअवतरला ९७ दत्तात्रयेंज्ञानशुद्ध ॥ सांगूनिबो
धिलासदानंद ॥ तेथूनिरामानंदप्रसिद्ध ॥ यतीश्वरअगाधजो ९८ तेथोनिमंगळानंदईश्वर ॥ गर्भींज्ञानानंददिवाकर ॥ सह
जानंदयोगेश्वर ॥ कल्याणधामवासीजो ९९ तेथूनिपूर्णानंदयतिराज ॥ जोमहाज्ञानीतेजःपुंज ॥ तेथूनिदत्तानंदयतिराज ॥
पूर्वदत्तात्रयअवतार २०० त्यादत्ताचेंहृदयशुद्ध ॥ अवतरलाब्रह्मानंद ॥ पिताआणिगुरुप्रसिद्ध ॥ तोचिमाझाजाणिजे १
पंढरीहूनिचारयोजनेदूरी ॥ नैर्ऋत्यकोनींनाझरेंनगरीं ॥ तेथीलदेशलेखकअवधारी ॥ ब्रह्मानंदपूर्वाश्रमी २ मगश्रीपंढरीस
येऊन ॥ विधीनेंकेलेंसंन्यासग्रहण ॥ भीमातिरींसमाधिस्थपूर्ण ॥ ब्रह्मानंदयतिराज ३ तोब्रह्मानंदपूर्णपिता ॥ सावित्रीना
मेंमाझीमाता ॥ वंदोनियांउभयतां ॥ रामविजयग्रंथसंपविला ४ शकेसोळाशेंपंचविस ॥ सुभानुनामसंवत्सरास ॥ भानुस

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

त्रमीशुद्धविशेष ॥ श्रावणमासविख्यातपैं ५ पंढरीक्षेत्रींनिश्चयेसी ॥ रामविजयसंपविलातेदिवसीं ॥ लेखकआणिश्रोतयांसी ॥ असोकल्याणसर्वदां ६ सुभानुसंवत्सरभानुवार ॥ भानुवंशींउपजलारघुवीर ॥ भानुआणिरोहिणीवर ॥ तोंवरीग्रंथअसोहा ७ ब्रह्मानंदापांडुरंगा ॥ श्रीधरवरदापूर्णअभंगा ॥ पुराणपुरुषाभक्तभवभंगा ॥ श्रोतावक्तातूंचिपैं ८ स्वस्तिश्रीरामविजयग्रंथसुदर ॥ संमतवाल्मिकीनाटकाधार ॥ सदांपरिसोतपंडितचतुर ॥ चत्वारिंशतिमोध्यायगोडहा २०९ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ श्रीसीतारामचंद्रार्पणमस्तु ॥ ॥ श्रीमज्जगदीश्वरार्पणमस्तु ॥ ॥ शुभंभवतु ॥ ॥ ॥

॥ इति चत्वारिंशतिमोध्यायः समाप्तः ॥

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

॥ श्रीरामविजयग्रंथाचे अध्याय ४० चाळीस मिळून एकंदर ओव्या खालीं लिहिलेल्याआहेत· तो तपशील येणेंप्र० ॥

	अध्याय.	ओवी		अध्याय.	ओवी.		अध्याय.	ओवी.		अध्याय.	ओवी.		अध्याय.	ओवी.
१	अध्याय.	२०६	९	अध्याय.	२३२	१७	अध्याय.	२१७	२५	अध्याय.	२६३	३३	अध्याय.	२२४
२	अध्याय.	२३३	१०	अध्याय.	२४०	१८	अध्याय.	२५४	२६	अध्याय.	२१९	३४	अध्याय.	२१०
३	अध्याय.	२८९	११	अध्याय.	२७०	१९	अध्याय.	२१४	२७	अध्याय.	१८७	३५	अध्याय.	२२१
४	अध्याय.	२७८	१२	अध्याय.	१७८	२०	अध्याय.	२१९	२८	अध्याय.	२१७	३६	अध्याय.	२०३
५	अध्याय.	२९५	१३	अध्याय.	२४२	२१	अध्याय.	२१५	२९	अध्याय.	१९३	३७	अध्याय.	२१०
६	अध्याय.	२५५	१४	अध्याय.	२४३	२२	अध्याय.	२२३	३०	अध्याय.	२१२	३८	अध्याय.	२००
७	अध्याय.	२५७	१५	अध्याय.	२४१	२३	अध्याय.	२२५	३१	अध्याय.	२४७	३९	अध्याय.	१९४
८	अध्याय.	३११	१६	अध्याय.	२०६	२४	अध्याय.	२१७	३२	अध्याय.	२६२	४०	अध्याय.	२०९
		२१२४			१८५२			१७८४			१८००			१६७१

पांच रकमा मिळून एकंदर संख्या ९२३१

हें पुस्तक मुंबईमध्यें कृष्णशास्त्री गुरजर याणी आपल्या छापखान्यांत छापिलें शके १७८८ क्षयनाम·माघवद्यपंचमी

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

॥ इति रामविजय समाप्तः ॥

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri